मेहता मराठी ग्रंथजगत

फेब्रुवारी, २०१५ | किंमत १५ रुपये

अल्पावधीत
लोकप्रिय ठरलेले
ग्रंथप्रसाराला
वाहिलेले
दर्जेदार मासिक

आमची वाचनीय पुस्तके





'प्लेइंग इट माय वे'
सचिन तेंडुलकर याच्या
आत्मचरित्राचा मराठी अनुवाद
'मेहता पब्लिशिंग हाऊस' तर्फे
रसिक वाचकांसाठी
लवकरच उपलब्ध.

पुणे मराठी ग्रंथालयाच्यावतीने
दिला जाणारा
राजेंद्र बनहट्टी पुरस्कार
स्वाती चांदोरकर लिखीत
'आणि विक्रमादित्य हरला'
या कथासंग्रहास प्रदान करण्यात आला.
'मेहता पब्लिशिंग हाऊस' कडून हे पुस्तक
प्रकाशित करण्यात आले होते.
भारत सासणे यांच्याहस्ते
चांदोरकर यांना
पुरस्काराचे वितरण
करण्यात आले.

मेहता मराठी ग्रंथजगत

। फेब्रुवारी २०१५ । वर्ष पंधरावे । अंक दुसरा ।

मांडणी-अक्षरजुळणी

मेहता पब्लिशिंग हाऊस

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर,
पुणे - ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४
२४४७५४६२
Extension
(ग्रंथजगत विभाग) - २२४/२२५

E-mail : info@mehtapublishinghouse.com

संपादक
सुनील मेहता

कार्यकारी संपादक
शंकर सारडा

अंकाची किंमत **१५ रु.**

वर्गणी
मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस

अनुक्रमणिका

संवाद	४
संपादकीय	६
साहित्यवार्ता	१०
सातारा ग्रंथ महोत्सव	३६
पुरस्कार	४२
स्मृतीची चाळता पाने	५१
अभिप्राय	५५
पुस्तक परिचय	
टेक मी होम	५८
सफारी आफ्रिकेतली	७६
श्रद्धांजली	८८
बालनगरी	९४

डिजिटल अंकाची वर्गणी : तीन वर्षांची ३००रु., पाच वर्षांची ४००रु.

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

संवाद.....

दाटून आलेल्या संध्याकाळी, अवचित सोनेरी ऊन पडतं..
तसंच काहीसं पाऊल न वाजवता आपल्या आयुष्यात प्रेम येतं...

प्रेम... प्रत्येक माणसाच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा घटक. पण प्रेमाचा अर्थ मात्र प्रत्येकासाठी वेगळा. कुणी प्रेमात सर्वस्व गमावतं तर, कुणाला प्रेमातच सर्वस्व सापडतं. कधी प्रेम अवचित समोर येतं आणि डोळे दिपवतं तर कधी ते नकळत येतं आणि सगळं आयुष्यच व्यापून टाकतं. प्रेमात मोठी शक्ती असते असे म्हणतात, जग जिंकता येतं प्रेमाने!

फक्त,

कुणीतरी असावे गालातल्या गालात हसणारं
भरलेच डोळे कधी तर ओल्या आसवांना पुसणारं !
कुणीतरी असावे क्षितिजापार नेणारं
अंधारलेल्या वाटेवर आपल्या सोबत येणारं !

या मानवी भावनेवर कित्येक प्रेमकाव्ये, प्रेमपत्रे, नाटके जगात लिहिली गेली. जगभर आपल्याला हीर-रांझा, रोमिओ-ज्युलिएट, लैला-मजनू ते वासु-सपनापर्यंतच्या जोड्या प्रत्येक संस्कृतीत सापडतात. प्रेम म्हणजे एक अशी भावना जिथे वेळेचे, काळाचे कशाचेच बंधन नसते. असते ती फक्त नजरेतून जाणवणारी अनामिक ओढ स्पर्शातून जाणवणारा आपलेपणा, सहवासातून उमलणारी जवळीक. आयुष्याच्या कोणत्या वेळी, कोणत्या टप्प्यावर नकळत प्रेमाची पावले या उनाड रस्त्यावर उतरतील काहीच सांगता येत नाही. पण मग सध्याच्या काळात प्रेमाच्या या साऱ्या भावना किंवा ते व्यतीत करणंही हे १४ फेब्रुवारीशी म्हणजेच 'व्हॅलेंटाइन डे'शी निगडित झालंय?

'तिसऱ्या शतकातील रोम सम्राट क्लॉडियसने सैन्यातील शिपायांनी लग्न करू नये, असा फतवा काढला होता. सम्राटाच्या मते, ज्यांचे लग्न झालेले

असते, ते जिवावर उदार होऊन लढत नाहीत. परंतु संत व्हॅलेंटाइनने राजाच्या या धोरणाविरोधात जाऊन या सैनिकांची गुप्तपणे लग्ने लावून देण्याचा धडाका लावला. राजाला व्हॅलेंटाइनच्या त्या कृतीचा खूप राग आला. त्यामुळे चिडून त्याने व्हॅलेंटाइनला देहदंड दिला. ज्या दिवशी व्हॅलेंटाइनला मरण आले, तो दिवस 'व्हॅलेंटाइन डे' अर्थात प्रेमदिन म्हणून साजरा करण्याची पद्धत युरोपीय देशांत सुरू झाली. ऊर्जा, प्रेम आणि आपुलकी यांचं प्रतीक म्हणून 'व्हॅलेंटाइन डे' त्या काळी साजरा होऊ लागला.

पण गेल्या काही वर्षात पाश्चात्य देशांमधील काही हुशार व्यावसायिकांनी 'व्हॅलेंटाइन डे' हा एक 'इव्हेंट' आहे, त्या मध्ये बौद्धिक आणि आर्थिकदृष्ट्या सबळ व स्वतंत्र असणारी तरुणाई गुंतू शकते, असा अंदाज बांधला आणि हळूहळू या दिवसाला 'प्रेम उत्सव दिन' बनवण्यासाठी वातावरण निर्मिती केली, आणि 'व्हॅलेंटाइन डे'ची महागडी भेटकार्डे, चॉकलेट्स, गुलाबाच्या फुलांचा व्यापार फोफावला.

तुम्ही जर एकमेकावर खरं प्रेम करत असाल तर, या बाजारू वस्तूंना काडीची ही किंमत नाही..१४ फेब्रुवारी काय प्रेमाचा मुहूर्त आहे? आणि या १४ फेब्रुवारीला प्रपोज केलेलं प्रेम किती दिवस टिकतं..? आणि प्रेम व्यक्त करायला किंवा सेलिब्रेशनला हवा कशाला एकच दिवस? असे प्रेम करा ज्यात स्वार्थ असणार नाही.. असे हृदय बनवा की ज्याला तडा जाणार नाही.. असे हास्य फुलवा ज्यात रहस्य असणार नाही.. असा स्पर्श करा ज्याने जखम होणार नाही.. आणि असे नाते बनवा ज्याला कधीच मरण नाही.

आपल्याही काही भावना असतील, स्वप्ने असतील, काही नाजुक क्षणांच्या हळव्या, ओल्या आठवणी असतील, तर त्या तुम्ही आमच्यापर्यंत पोहचवू शकता.

आपले लेखन इ-मेलने खालील पत्त्यावर पाठवा.

mmgj@mehtapublishinghouse.com

निवडक लेखांचा अंकात समावेश करण्यात येईल. तसेच उत्तम लेखासाठी पारितोषिक म्हणून कोणत्याही एका पुस्तक खरेदीवर ४०टक्के सवलत देण्यात येईल.

तुमच्या पत्रोत्तराच्या अपेक्षेत
मेहता मराठी ग्रंथजगत

जयपूर लिटररी फेस्टिव्हल

यंदाचे वर्ष महाराष्ट्र तसेच भारताच्या दृष्टीने विशेष लँडमार्क म्हणून इतिहासात नोंदवले जावे. पॅरिसच्या 'शार्ली हेब्दो' साप्ताहिकातील बारा पत्रकारांची हत्या, बराक ओबामांची भारत भेट, जयपूर लिटररी फेस्टिव्हल, गावोगावच्या ग्रंथजत्रा, पीके चित्रपटाचे ६७० कोटींचे विक्रमी उत्पन्न, मूर्ती क्लासिक लायब्ररीचा आरंभ इत्यादी.

पंजाबमधील घुमान येथे होऊ घातलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या कार्यक्रमाचा तपशील नुकताच जाहीर झाला आहे. परिसंवाद, कथाकथन, कविसंमेलन, मुलाखती वगैरे उपक्रम या संमेलनातही असणार आहेत. त्यात सहभागाची संधी कोणाकोणाला मिळणार हे अजून गुलदस्त्यात ठेवण्यात आले आहे. ते थेट निमंत्रणपत्रिकेतच वाचायला मिळावे, असे महामंडळाचे मत दिसते. महाराष्ट्र सरकारकडून मिळणारे पंचवीस लाखांचे अनुदान यावेळी पुरणार नसल्यामुळे ते वाढवून द्यावे, अशी विनंती मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली आहे. संमेलनासाठी दोन स्पेशल रेल्वेगाड्यांची व्यवस्था केली गेली आहे. त्या जवळजवळ पूर्ण भरल्याचेही सांगण्यात आले आहे. त्यामुळे संमेलनाच्या भव्य मंडपात खुर्च्या मोकळ्या दिसणार नाहीत, असे मानायला हरकत नाही. संमेलनाच्या निमित्ताने उत्तर भारतातील प्रेक्षणीय स्थळांचा दौरा करण्याचा योग साधावा, असा विचार करणाऱ्या प्रतिनिधींनी तीन दिवसांच्या संमेलनातील कार्यक्रमांना हजर राहून मग हवे ते करावे, असे आयोजक-निमंत्रक यांचे मत आहे. ते व्यवहारधर्माला अनुसरूनच असल्यामुळे कोणी कपाळावर आठ्या आणू नयेत. साहित्य संमेलनाच्या कार्यक्रमात सध्या फारसे नावीन्य नसते आणि त्यात तेच तेच लोक सहभागी होतात. अखिल भारतीय असे नावातच अंतर्भूत असल्यामुळे

संलग्न संस्थांच्या कार्यक्षेत्रातील कार्यकर्ते आणि अभ्यासकांना परिसंवादात सामावून घ्यावे लागते. त्यामुळे परिसंवादांना पदव्युत्तर वर्गाचे स्वरूप येऊन प्रतिनिधी जांभया देऊ लागतात, असा दरवेळचा अनुभव असतो. एकीकडे गर्दी हवी असते, रंजन हवे असते; तर आयोजकांनी सकळ श्रोतृवर्गाला अभ्यासपूर्ण प्रबोधनाद्वारे शहाणे बनवण्याचा विडा उचललेला असतो. त्यामुळे निमंत्रक व प्रतिनिधींचीही दमछाक होते. ती टाळता आल्यास संमेलने अधिक अर्थपूर्ण ठरू शकतील.

त्या दृष्टीने जयपूर लिटररी फेस्टिव्हलचे उदाहरण घेण्यासारखे आहे. गेल्या काही वर्षांपासून राजस्थानमधील जयपूर या गुलाबी शहरात वाङ्मयीन उत्सव उत्साहात साजरा केला जात आहे. हा उत्सव भारतच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवरही गाजत आहे. यंदा २१ ते २५ जानेवारी २०१५ या कालावधीत पाच दिवसांचा हा ग्रंथमहोत्सव झाला. या पाच दिवसांत शहरातील दहा मुख्य ठिकाणी सुमारे तीनशे कार्यक्रम झाले. वाङ्मयीन कार्यक्रम, नवीन पुस्तकांची प्रकाशने, नव्या पुस्तकांवर लेखक-वाचक संवाद, नवीन प्रवाह, माध्यमांतरातील आव्हाने, अनुवादाचे प्रकार आणि त्यातील त्रुटी, पाकिस्तान, श्रीलंका, दक्षिण आशियाई, आफ्रिकन देशातील समकालीन साहित्य, भारताच पुनर्शोध आदी विषयांवरील चर्चासत्रे होतीच; नाटक, चित्रपट, संगीत, नृत्य, चित्र, शिल्प, कठपुतळी, सुफी संगीत, कथाकथन वगैरे माध्यमांतरातील प्रयोग व त्यातून चाललेला वास्तवाचा शोध यावर जाणकारांची प्रात्यक्षिके आणि नवसंशोधनाची दिशा यावरही चर्चा घडवून आणण्याचा प्रयत्न केला गेला.

दुर्दैवाने फेस्टिव्हलच्या पहिल्या तीन दिवसांत पावसाने थैमान घातल्याने अनेक कार्यक्रम रद्द झाले; काही कमीजास्त गुंडाळले गेले, प्रेक्षकांना भिजावे लागले. परंतु या महोत्सवाच्या एकूणच महत्त्वाकांक्षी व्यापविस्ताराची भव्यता दीपवून टाकणारीच आहे. कार्यक्रमपत्रिका बघूनच आपण चक्रावून जातो. राजस्थान सरकारने, पर्यटन विभागाने, हॉटेल व्यावसायिकांनी आणि वेगवेगळ्या सांस्कृतिक व शासकीय प्राधिकरणांनी भरघोस आर्थिक सहाय्य केले. त्यामुळेच हा जयपूर लिटफेस्ट जगातील सर्वात मोठा वाङ्मयीन सोहळा म्हणून ओळखला जातो. त्यावर कोट्यवधी रुपयांचा खर्च होतो. त्याला दोन लाख लोक भेट देतात. परदेशी पर्यटकही या महोत्सवाला आपल्या प्रवासाच्या पॅकेजमध्ये आवर्जून स्थान देतात.

राजस्थानात अगोदरच प्रेक्षणीय स्थळांचे वैपुल्य आहे. त्यात या वाङ्मय कलादालनाची आणखी भर पडली आहे. जागतिक पातळीवरील लेखककवी या महोत्सवाला आवर्जून उपस्थित रहावेत यासाठी महोत्सवाचे सूत्रधार, नामवंत साहित्यिक वुइल्यम डलरीम्पल आणि महोत्सव संचालक संजय रॉय खूपच जागरुक असतात. त्यामुळेच महोत्सवास नोबेलचे मानकरी सर व्ही. एस. नायपॉल, त्यांचे एकेकाळचे जीवलग मित्र आणि सध्याचे प्रतिस्पर्धी पॉल थेरॉ, लेखिका झुंपा लाहिरी, रहस्यकथाकार जॉन ल कार, कॉरमॅक मॅक्कार्थी, वेल्समधील लेखिका सारा वॉटर्स हे यावेळी उपस्थित राहिले. मार्क गेविस्सार (इंग्लंड), डमन गालगुट (दक्षिण आफ्रिका), क्रिस्टोस त्सोइलक्स (ऑस्ट्रेलिया), देवदत्त पटनाईक (ओरिसा)यांच्या सहभागामुळे 'टेल्स दे डोन्ट टेल' या विषयावरील चर्चेचा कार्यक्रम रंगला. महोत्सवास आमंत्रित २६० साहित्यिकांपैकी ६० परदेशातून आले होते. नायपॉल, मॅक्कार्थी वगैरेंना आणण्यासाठी डलरीम्पल यांनी पाण्यासारखा पैसा खर्च केला. दरवर्षी अशा प्रकारच्या किमान २० महोत्सवांत डलरीम्पल यांचा सहभाग असतो. प्रत्येक लेखकाचा वीक पॉईंट ठाऊक असल्यामुळे डलरीम्पल यांनी द यलो बर्डस या बेस्टसेलर लेखकाला भारतीय पक्ष्यांचे निरीक्षण करण्याची संधी देण्याची तयारी दाखवली. रहस्यकथा लेखक मॅक्कार्थीला भारतीय गुप्तहेर यंत्रणा रॉ च्या प्रमुखांशी चर्चा करण्याची व्यवस्था करण्याचे आश्वासन दिले. झुम्पा लाहिरीला अभयारण्यात जाऊन वाघांचे निरीक्षण करायचे होते तर कोणाला हिमालय दर्शनाची ओढ होती. असे आपण करावे असे नाही. ते आपल्याला झेपणारही नाही. आपल्या शासनाची दृष्टीही तेवढी व्यापक नाही.

ग्रंथजत्रा, ग्रंथमहोत्सव, चर्चासत्रे, संमेलने, परिसंवाद,वेगवेगळ्या क्षेत्रातील कलाकार, पारंपरिक कलावंतांचे कार्यक्रम, लोककलाकार या सर्वांच्या माध्यमातून साहित्य आणि रसिक यांची भेट-मैत्री दृढ होत असेल तर सर्वांनी त्यासाठी आपले योगदान देणे इष्टच म्हणावे लागेल.

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

५वी आवृत्ती

केल्याने होत आहे रे...

लेखक
संजीव परळीकर

किंमत - ८०/-रु.
पोस्टेज - ३०/-रु.

नशीब आणि प्रारब्ध हे नेहमीच वादातीत विषय मानले जातात. बरेच प्रयत्न करूनसुद्धा जेव्हा एखादी गोष्ट मिळत नाही तेव्हा नशिबाला आपण खुशाल दोष देऊन मोकळे होतो.

पण खरंच नशीब घडवता येतं का? नशिबाला दोष देणं योग्य आहे का?

यशस्वी लोकांच्या नशिबातच यश लिहिलेलं असतं का?

ह्या प्रश्नांची उत्तरं मला माहीत नाहीत, पण नशीब घडवण्यासाठी काय करायला पाहिजे, कोणते दृष्टिकोन अंगीकारायला पाहिजेत, कशावर श्रद्धा ठेवायला पाहिजे, कोणत्या ठिकाणी धाडस करायला पाहिजे, कोणती कौशल्यं शिकायला पाहिजेत हे मला कळलेलं आहे.

ते मी ह्या पुस्तकात माझ्या अनुभवावरून लिहिलेलं आहे.

तुम्ही जर हे वाचलंत, तर तुमचंही नशीब त्यामुळे बदलून जाईल.

पत्रलेखनविषयक कार्यशाळा

तरुण पिढीत लेखनकलेबाबत अभिरुची व सृजनशीलता वाढावी या हेतूने नॅशनल बुक ट्रस्ट व सिनेदरबार यांच्या संयुक्त विद्यमाने दिल्लीत झालेल्या पत्रलेखनविषयक कार्यशाळेत इंग्रजी भाषेतील प्रसिद्ध लेखक व कवी सौरदीप रॉय यांनी पत्रलेखनाची कला तसेच पत्रांच्या माध्यमातून भावना व ज्ञान प्रकट करणे, याबाबत माहिती दिली.

देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी लिहिलेला 'द डिस्कवरी ऑफ इंडिया' हा ग्रंथ, त्यांचे आत्मचरित्र तसेच मुलगी इंदिरा गांधी यांना लिहिलेल्या पत्रांपासून प्रेरणा घेऊन या विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. रेडिओ समालोचक आणि समुपदेशक नुपूर चावला यांनी शब्द आणि व्यंगचित्रांच्या माध्यमातून भावना कशा प्रकट करता येतात याबाबत माहिती दिली.

मोहम्मद इक्बाल यांच्या पुस्तकाबाबत चर्चासत्र

'सारे जहां से अच्छा हिंदोस्तां हमारा' हे अजरामर गीत लिहिणारे कवी, तत्त्ववेते मोहम्मद इक्बाल यांच्या जीवनावर आधारित पुस्तकाबाबत नवी दिल्लीत कॅनॉट प्लेसमधील ऑक्सफर्ड बुकस्टोअर आणि हिंदुस्तानी आवाज यांच्या संयुक्त विद्यमाने चर्चासत्र आयोजित केले होते. जफर अंजूम यांनी हे पुस्तक लिहिले आहे.

डॉ. रक्षंदा जलील, डॉ. हिलाल अहमद, जफर अंजूम यांनी या चर्चासत्रात मोहम्मद इक्बाल यांच्या जीवनावर व साहित्यिक पैलूंवर प्रकाश टाकला. अंजूम यांनी सांगितले की, अगदी बालपणापासूनच ते इक्बाल यांच्या साहित्याकडे आकर्षित झाले होते. त्यांचे खुदी हे तत्वज्ञान आणि राजकीय विचार आजच्या राजकीय आणि सामाजिक परिस्थितीशी अनुकूल

दिसून येतात. मोहम्मद अली जीना यांच्या तुलनेत इक्बाल यांचे राजकीय विचार अधिक बुद्धिवादी होते. बहुतेक लोकांना इक्बाल यांच्या जीवनाविषयी माहिती नसल्यामुळे त्यांच्याबाबत अधिक जाणून घेण्याच्या जिज्ञासेतूनच पुस्तक लिहिण्याची प्रेरणा मिळाली.

पुण्यातील अभियंत्याचा आदिवासींसाठी भाषा प्रकल्प

बहुराष्ट्रीय कंपनीत काम करणाऱ्या पुण्यातील तरुण संगणक अभियंत्याने गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासींच्या मुलांना मराठी भाषा शिकवण्यासाठी भाषाशिक्षण प्रकल्प सुरू केला आहे. सुमीत मोरे याच्या या अभिनव प्रकल्पाचा भामरागड तालुक्यातील बेजूर येथे प्रारंभ करण्यात आला.

अमेरिकेतून संगणक विज्ञानाची पदवी मिळवलेल्या सुमीतवर डॉ. प्रकाश आमटे यांच्या प्रकाशवाटा या पुस्तकाचा खूपच प्रभाव पडला होता. याच प्रभावातून सुमीतने आदिवासी समाजासाठी काही तरी ठोस करण्याचा निर्णय घेतला होता. अमेरिकेतून भारतात परतल्यावर एका बहुराष्ट्रीय कंपनीत काही महिने नोकरी केल्यानंतर सुमीतने गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासींसाठी काम करण्याचा निर्णय घेतला. आदिवासी समाजातील मुलांना फक्त माडिया भाषाच बोलता येते, हे पाहिल्यानंतर सुमीतने एका अँड्रॉईड ॲप्लिकेशनच्या माध्यमातून त्यांना मराठी शिकवण्याचा ध्यास घेतला. या भाषाशिक्षण प्रकल्पाला त्याने अक्षर असे नाव दिले. यासाठी सुमीतने परिसरातील गावांमध्ये टॅबलेट पीसीही दिले.

गडचिरोलीच्या एकट्या भामरागड तालुक्यातच तीन ते सहा वर्षे वयोगटातील सुमारे अडीच हजार मुले आहेत. त्यामुळे त्यांना मराठीचे धडे देण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर अनिवार्य असल्याचे सुमीतचे मत आहे.

छायाचित्राच्या ट्विटला मिळतात अधिक रिट्विट

ट्विटरवर छायाचित्रे आणि हॅशटॅग्स असलेल्या ट्विटस अधिक प्रमाणात पुन्हा ट्विट (रिट्विट) होत असल्याचे एका सर्वेक्षणात आढळले आहे. या प्रकारच्या ट्विट रिट्विट होण्याची शक्यता नेहमीच्या ट्विटपेक्षा चारपटीने अधिक असल्याचे हे सर्वेक्षण सांगते. मॅसाच्युस्टेट्स येथील स्टोन टेम्पल कन्सल्टिंग या डिजिटल मार्केटिंग एजन्सीने हे सर्वेक्षण केले. केवळ मजकुराचा समावेश असलेल्या ३० टक्के ट्विट रिट्विट केल्या जातात,

त्या तुलनेत छायाचित्रे, हॅशटॅग्जचा समावेश असणारी सुमारे ६८ टक्के ट्विट रिट्विट होतात.

'परिपूर्ण तबला लिपी'चे प्रकाशन

औरंगाबाद येथील तबलावादक संजीव शेलार यांनी 'परिपूर्ण तबला लिपी' या पुस्तकातून तबला वादनाची कला शब्दबद्ध केली आहे. संगीतातील पूर्वसुरींनी लिहून ठेवलेल्या रचना विशिष्ट लिपीच्या अभावी काळाच्या ओघात नष्ट झाल्या आहेत. ही बाब ध्यानात घेत संजीव शेलार यांनी संशोधन करून तबलावादनाच्या बोलांचे जतन करण्यासाठी लिपी विकसित केली आहे.

शेलार यांनी दिलेल्या माहितीनुसार अभिजात संगीतातील पारंपरिक ज्ञानाचे जतन करण्याबरोबरच त्यातील प्रवाहीपण टिकवून ठेवण्याचा हा प्रयत्न आहे. तबलावादन करताना कलाकार एकच कायदा दरवेळी नव्या पद्धतीने वाजवू शकतो. मात्र तबल्याची रचना एकसारखी नसल्याने हा कायदा तसाच वाजेल असे नाही. ही मर्यादा ध्यानात घेऊन बंदिशीची रचना लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. हा प्रयत्न प्राथमिक स्तरावरचा असून हे लेखन आणखी परिणामकारक झाले पाहिजे.

तबल्याचे शास्त्र आणि बंदिशीच्या रचना पूर्णपणे गणितावर आधारित आहेत. या पुस्तकामध्ये भाषेसाठी लिपी नाही तर लिपीसाठी भाषा वापरली आहे. तबलावादनाचा साकल्याने अभ्यास करून त्यातील शब्दसमूह न तोडता रचनेची जाती आणि लय स्पष्टपणे दाखविता येते.

विश्वकोशाच्या खंडांचे डिजिटलायजेशन होणार

अ ते ज्ञ पर्यंतच्या महत्त्वाच्या संज्ञांची ओळख सामान्य माणसाला मराठीतून करून देणाऱ्या विश्वकोशाचे वीसही खंड आता सीडीवर आणले जाणार आहेत.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी विश्वकोश निर्मितीचा प्रकल्प हाती घेऊन सोळा खंडांचे काम केले. त्यांच्या पश्चात प्रा.रा.ग. जाधव, मे.पुं. रेगे आणि डॉ. विजया वाड यांनी हा प्रकल्प पुढे रेटला. विसाव्या खंडाचे काम अंतिम टप्प्यात आहे. सीडॅकच्या सहकार्याने हे खंड युनिकोड स्वरूपात ऑनलाइन आणण्यात आले आहेत. या सर्व खंडांच्या सीडीचा संच तयार झाल्यावर अभ्यासकांना विश्वकोश वापरताना इंटरनेटचीही गरज लागणार नाही.

‘मॅगझिनमधून सुटतेय गोळी’चे प्रकाशन

अस्वस्थ महिलांची घुसमट कवितांमधून व्यक्त होत असते. कवितेमध्ये भावना व्यक्त होत असते. त्यामुळे पोलीस खात्यातील वर्दीतील अस्वस्थ महिला समाजात बदल घडवू शकते, असे मत अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक मीरा बोरवणकर यांनी व्यक्त केले.

लोकवाङ्मयगृह प्रकाशनतर्फे बालिका ज्ञानदेव यांच्या ‘मॅगझिनमधून सुटतेय गोळी’ या कवितासंग्रहाचे प्रकाशन झाले. सिनेअभिनेते, दिग्दर्शक नागराज मुंजळे, प्राध्यापक मनोहर जाधव, पत्रकार उत्तम कांबळे यावेळी उपस्थित होते. बोरवणकर म्हणाल्या, पंजाब आणि महाराष्ट्राच्या साहित्य संस्कृतीत वेगळेपण आहे. पंजाबात कवितेपेक्षा भांगडा आदी नृत्यांवर भर असतो, तर महाराष्ट्रात संगीताबरोबर साहित्यालाही महत्त्व आहे. बालिकाने लिहिलेल्या कवितेतून दुःख व्यक्त होते.

ऑफलाइनही यूट्यूबचे व्हिडिओ

गुगलने अँड्रॉइड आणि अन्य आयओएस ॲपवर यू ट्यूब ऑफलाइन व्हिडिओ पाहण्याची सुविधा भारत, इंडोनेशिया आणि फिलिपिन्स या देशांमध्ये उपलब्ध करून दिली आहे. यामुळे यूजरना ऑफलाइन व्हिडिओ मोबाइलमध्ये घेऊन इंटरेनट कनेक्टिव्हिटी नसतानाही व्हिडिओ पाहणे शक्य होईल.

यू ट्यूब ॲपमधून ऑफलाइन घेतलेला व्हिडिओ पुढील ४८ तासांमध्ये यूजरना पाहता येईल. भारतामध्ये यू ट्यूबने टी-सीरिज, सारेगामा, यशराज फिल्म्स यांसारख्या महत्त्वाच्या कंपन्यांशी करार केला असून ऑफलाइन पर्यायामध्येही या कंपन्यांच्या मालकीचे व्हिडिओ उपलब्ध करून दिले आहेत. व्हिडिओ डाउनलोड करण्यासाठी यूजरना यू ट्यूब ॲपवरील ऑफलाइन आयकॉनवर क्लिक करावे लागेल. त्यानंतर, संबंधित व्हिडिओची अपेक्षित ‘डिजिटल क्वालिटी’ निवडून तो डाउनलोड करता येईल. जे व्हिडिओ ऑफलाइन पाहण्याची सुविधा उपलब्ध आहे, केवळ अशा व्हिडिओंसोबत स्क्रीनच्या खालील बाजूस ऑफलाइनचा लोगो दिसेल. विशिष्ट व्हिडिओ ऑफलाइन पाहण्यासाठी उपलब्ध असावा का, याचा निर्णय घेण्याचा अधिकार त्या व्हिडिओच्या मालकास असेल. एखाद्या व्हिडिओस व जाहिरातीस ऑफलाइन मिळणाऱ्या हिट्सही मोजण्याची यंत्रणा यूट्यूबने विकसित केली आहे. यूट्यूबवर व्हिडिओ पाहणाऱ्या

यूजर्सची संख्या वाढवण्यासाठी ऑफलाइनचा पर्याय उपयुक्त आहे.

ट्विटरसाठीही अच्छे दिन

सोशल नेटवर्किंगच्या माध्यमातून आपल्या आवडत्या सेलिब्रिटींशी सवांद साधण्याचा ट्रेण्ड जगभर दिसतो आहे. ट्विटरवर सगळ्यात जास्त फॉलोइंग बिग बी अमिताभ बच्चन यांना आहे. फॉलोअर्सची संख्या वाढण्याच्या टक्केवारीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आघाडीवर आहेत. गेल्या वर्षभरात त्यांच्या ट्विटरवरच्या फॉलोअर्सची संख्या ४६ लाखांनी वाढली आहे. त्यांचे आता ८५ लाख फॉलोअर्स आहेत. सर्वाधिक फॉलोअर्स अमिताभ बच्चन यांना असून त्यांची संख्या १ कोटी १८ लाख आहे.

व्हॉट्सॲप संगणकावरही वापरता येणार

संवादाचे सर्वात सहज आणि सर्वाधिक वापर असलेले मोबाईल ॲप म्हणून व्हॉट्सॲपने आपले स्थान मजबूत केले आहे. कोणतेही अतिरिक्त शुल्क न घेता केवळ इंटरनेट डाटाच्या वापरातून एकाचवेळी अनेक लोकांशी संवाद साधण्याची संधी 'व्हॉट्सॲप'ने दिली आहे. 'व्हॉट्सॲप'च्या अँड्रॉइड फोनवरील नव्या अपडेटमध्ये 'व्हॉट्सॲप वेब' नावाचा कोड संगणकावरील लॉगइन लॉगऑऊट' तसेच 'ऑनलाइन स्टेटस' यासंबंधीचे कोडही दिसून आले आहेत. 'व्हॉट्सॲप'ची डेस्कस्टॉप आवृत्ती लवकरच येण्याची शक्यता आहे. आजघडीला ६० कोटींहून अधिक वापरकर्ते 'व्हॉट्सॲप'ला आहेत. विशेष म्हणजे, 'व्हॉट्सॲप' संगणकावर आल्यानंतर वापरकर्त्यांना मोठ्या स्क्रीनवरून मोबाइलवर सोशल मेसेजिंग करणे शक्य होईल.

मराठी सिनेमास उज्ज्वल भविष्य

आशयघन मराठी सिनेमाची केवळ योग्य वितरणाअभावी घुसमट होत होती. परंतु आता मोठ्या वितरण कंपन्या मराठी चित्रपटसृष्टीकडे वळत असून, मराठी सिनेमाचे भविष्य उज्ज्वल असल्याचे मत दिग्दर्शक-निर्माते महेश कोठारे यांनी व्यक्त केले.

लोकमान्य सेवा संघाचे फाटक ग्रंथसंग्रहालय आणि मॅजेस्टिक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गप्पांमध्ये निर्माते महेश कोठारे म्हणाले, "चित्रपटांत काम करण्यापेक्षा ते करवून घेणे मला आवडू लागल्याने मी

दिग्दर्शनाकडे वळालो. 'प्रेक्षकांची करमणूक झाली पाहिजे, हे उद्दिष्ट ठेवून मी चित्रपट तयार केले. कथेला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणे आवश्यक वाटल्याने स्पेशल इफेक्टचे तंत्रज्ञान शिकण्याचे ठरवले.''

अंध विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके

राज्यातील अंध विद्यार्थी शिक्षणाच्या प्रकाशज्योतीपासून यापुढे वंचित राहणार नाहीत. केंद्र सरकारने दिलेल्या पावणेदोन कोटी रुपयांच्या सुधारित अनुदानाच्या साह्याने नॅब राज्यातील १०५ अंध शाळांना मोफत शैक्षणिक पाठ्यपुस्तके देणार आहे.

ब्रेल भाषेतील साहित्याचा उत्पादन खर्च महागला आहे. अंध व्यक्तींच्या उत्कर्षासाठी काम करणारी 'नॅब' ही संस्था पदरमोड करून दोन यंत्रांच्या मदतीने या पाठ्यपुस्तकांची छपाई करते. छपाई सामग्रीसाठी हा सुधारित निधी संमत झाल्यामुळे छपाई यंत्राची संख्या वाढवून ही पुस्तके वेळेत व मोफत देणे आता शक्य होणार आहे.

इंग्रजी तसेच मराठी माध्यमाच्या पहिली ते बारावीपर्यंतच्या क्रमिक पाठ्यपुस्तकांवर 'नॅब'कडून ७५ टक्के सूट दिली जाते; मात्र पाठ्यपुस्तकांचा उत्कृष्ट दर्जा राखणे हे वाढत्या छपाईमूल्यामुळे 'नॅब'लाही कठीण झाले होते. 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हिज्युअल हँडीकॅप्ड' या डेहराडूनच्या संस्थेच्या माध्यमातून अनुदान वितरण होते.

सेल्फीकारांसाठी लंडन कॉलेजचा अभ्यासक्रम

मोबाइल कॅमेऱ्यामुळे तरुणांमध्ये सेल्फी घेण्याचे वेड एवढे वाढले आहे, की तो एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय बनला आहे. एका कॉलेजने या विषयासाठी चक्क अभ्यासक्रम सुरू केला आहे. ही कला शिकून विद्यार्थी व्यावसायिक 'सेल्फिकार' बनू शकतात.

ब्रिटनमधील सीटी लिट कॉलेजमध्ये 'सेल्फी कोर्स' सुरू होणार आहे. त्यासाठी प्रत्येकी १३२ युरो फी आहे. एक महिन्याच्या या अभ्यासक्रमात तज्ज्ञांची व्याख्याने आणि परिसंवाद यांचा समावेश असेल. स्वत:चा फोटो काढण्यासाठी लागणाऱ्या कौशल्यात सुधारणा करण्यासाठी या अभ्यासाचा उपयोग होऊ शकतो. त्यातून ओळख, स्व आणि स्मरणशक्ती या संकल्पनांची ओळख विद्यार्थ्यांना होऊ शकते. होतकरू फोटोग्राफरना अवकाश, जागा आणि आसपास या कल्पना सेल्फीतून दाखवणे; प्रकाश

आणि बारीकसारीक निरीक्षणे आणि फोटोग्राफी अधिक समकालीन कशी होऊ शकते याचा अभ्यास करता येईल. स्मार्टफोन किंवा वेबकॅमच्या साहाय्याने स्वत:चेच छायाचित्र काढून ते सोशल मीडियाच्या माध्यमातून अन्य व्यक्तींना पाठवणे म्हणजे सेल्फी. सेल्फी काढण्याचे दाखले जुन्या काळात मिळत असले, तरी त्याचा खऱ्या अर्थाने प्रारंभ २००२ मध्ये झाला. २०१३ मध्ये ऑक्सफर्ड डिक्शनरीने हा शब्द 'वर्ड ऑफ द इयर' म्हणून निवडला. काही वेबसाइट सेल्फी ऑनलाइन उपलब्ध करून देतात. सेफ्टीसीटी या वेबसाइटवर सेल्फीविषयी माहिती तसेच नवे ट्रेंड्सही वाचायला मिळतात.

सायबर गुन्ह्यांची संख्या वाढली

भारतात घडणाऱ्या सायबर गुन्ह्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून, २०१५ मध्ये हे गुन्हे तीन लाखांच्या घरात पोहोचतील, असा अंदाज आहे. मागील वर्षीच्या सायबर गुन्ह्यांच्या तुलनेत ही संख्या दुप्पट आहे. असोसिएटेड चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज ऑफ इंडिया (असोचेम) आणि महिंद्रा एसएसजी यांनी संयुक्तपणे 'सायबर अँड नेटवर्क सिक्युरिटी फ्रेमवर्क' या नावाने प्रसिद्ध केलेल्या अभ्यासात ही बाब स्पष्ट झली आहे. भारतात घडणारे बहुतांश सायबर गुन्हे हे चीन, पाकिस्तान, बांगलादेश, अल्जेरिया या देशांमधून करण्यात येत आहेत, ही यातील सर्वांत चिंतेची बाब आहे. २०१४ मध्ये भारतात १ लाख ४९ हजार सायबर गुन्ह्यांची नोंद झाली होती. सायबर गुन्ह्यांमध्ये खोट्या ऑनलाइन ऑफर देऊन बँकिंग अकाउंट व एटीएम पासवर्ड चोऱ्याचे व त्याद्वारे फसवणूक करण्याचे गुन्हे सर्वाधिक आहेत. या गुन्ह्यांना बळी पडणाऱ्यांमध्ये १८ ते ३० वर्षे वयोगटातील व्यक्तींची संख्या लक्षणीय आहे. नायजेरियन फ्रॉड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या गुन्ह्यांसाठी आता अमेरिका, युरोप, ब्राझील, तुर्कस्तान या देशांमधील नेटवर्कचा वापर होत असल्याचे उघडकीस आले आहे. भारतातील इंटरनेटचा वाढता प्रसार व त्यावेळी ऑनलाइन बँकिंगची वाढती लोकप्रियता सायबर गुन्हेगारांच्या पथ्यावर पडत असल्याचे अभ्यासात नमूद करण्यात आले आहे. आर्थिक फसवणुकीबरोबरच मालवेअर व व्हायरसच्या माध्यमातून कम्प्युटर सिस्टिममध्ये प्रवेश मिळवणे व तेथील गोपनीय माहिती चोरणे यांसारख्या गुन्ह्यांची संख्याही वाढते आहे.

बुलडाणा विद्रोही साहित्य संमेलन

''देशात सध्या हिंदुत्वीकरणाची बळजबरी चालू असल्याने बहुसांस्कृतिकता नष्ट होत आहे. यामुळेच आविष्कार स्वातंत्र्याचा नाश होत आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांनी अध्यक्षीय भाषणात जाती-धर्माच्या अनिष्ट रूढींची चिरफाड करून निषेध नोंदवावा,'' असे आवाहन नाटककार जयंत पवार यांनी केले.

'विद्रोही सांस्कृतिक चळवळ'द्वारा बुलडाणा येथे होणाऱ्या विद्रोही साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी जयंत पवार यांची निवड नुकतीच झाली. छायाचित्रकार संदेश भंडारे यांनी त्यांचा सत्कार केला. कवी मंगेश काळे, प्रा. सुभाष वारे, प्रा. प्रतिमा परदेशी उपस्थित होते.

पवार म्हणाले, ''एखाद्या घटनेवर भूमिका घेण्याची वेळ आल्यावर साहित्यिक स्पष्ट भूमिका घेत नाहीत. तरीदेखील समाजात साहित्यिकांना मानाचे स्थान मिळते. मात्र, चळवळीत कार्य करणाऱ्या व भूमिकेचे समर्थन करणाऱ्या कलावंताला दुर्लक्षित केले जाते. साहित्यिक व कलावंत यांचा समन्वय साधला गेला, तर नक्कीच समाजाला फायदा होऊ शकतो.''

अमेरिकी संस्थेबरोबर लवकरच १० जीबीपीएस कनेक्टिव्हिटीचा इंटरनेट २ सामंजस्य करार करणार आहे. त्यामुळे भारतातील दीड हजार शिक्षण संस्थांची इंटरनेट कनेक्टिव्हिटी क्षमता १० पट वाढणार आहे. राष्ट्रीय ज्ञान संस्थेचे माजी सल्लागार आणि इंटरनेट २ चे अमेरिकेतील सल्लागार डॉ. अशोक कोळसकर यांनी भारतीय विज्ञान परिषदेत माहिती दिली.

संशोधन करू इच्छिणाऱ्या विद्यापीठांना या नव्या बँडविड्थचा चांगला उपयोग होणार आहे. या करारासाठी केंद्राने निविदा मागविल्या होत्या. त्यानुसार इंटरनेट २ ची निवड केली आहे.

'इंटरनेट २' ही अमेरिकेतील रिसर्च युनिव्हर्सिटींनी एकत्रितपणे स्थापन केलेली 'ना नफा, ना तोटा' तत्त्वावरील संस्था आहे. संशोधन करणाऱ्या जगभरातील विद्यापीठांना ब्रॉडबँड कनेक्टिव्हिटी पुरवणे, नेटवर्किंगच्या क्षेत्रात संशोधन करणे हे या संस्थेचे काम आहे. देशभरात या संस्थेने विणलेल्या इंटरनेटच्या जाळ्याला नॅशनल एज्युकेशन अँड रिसर्च नेटवर्क (एनरन) म्हटले जाते.

साधू - महंतही बनले टेकसॅव्ही

कुंभमेळ्यात बदलत्या काळात सोशल मीडियाने साऱ्यांनाच वेड लावले. आता हा छंद नव्हे, तर एक गरज बनली आहे. माहितीच्या देवाण-घेवाणीसाठी अथवा प्रचार-प्रसारासाठी हे एक प्रभावी माध्यम ठरले आहे. त्यामुळेच सर्वसंग परित्याग करणारे साधू-महंतही फेसबुक, व्हॉट्सॲप, हाइक यांचा वापर करताना दिसत आहेत.

देशभरातील अनेक मठाधिपतींनी आपल्या वेबसाइट आणि ऑनलाइन सेवा सुरू केल्या आहेत. कुंभमेळ्यात येणारे साधू-महंत म्हटले की, अंगावर भगवे कपडे, वाढलेल्या जटा, हातात-गळ्यात तुळशीच्या माळा, कपाळावर भले मोठे गंध असे चित्र डोळ्यांसमोर उभे राहते. कोठेतरी निर्जन स्थळी आणि विशेषत: हिमालयातच तप-आराधना करणारे साधू-महंत नाशिकमध्ये वास्तव्यास आले आहेत. सर्वच प्रमुख साधू-महंतांच्या हाती स्मार्ट फोन आल्याचे दिसत आहे. कुंभमेळ्याच्या तयारीत असलेल्या महंतांकडे स्मार्ट फोन तर आहेतच; शिवाय ते व्हॉट्सॲप, हाइक, गुगल प्लस, लाइन, हँगआऊट, टेलिग्राफ अशा विविध ॲप्सचा वापर करीत आहेत.

''बदलत्या काळात तंत्रज्ञानाचा वापर सर्वत्र होत आहे. माहितीची देवाण-घेवाण त्यामुळे वाढली आहे. त्यांचा वापर साधू-महंत करीत आहेत. कुंभमेळ्याचा प्रसार त्या माध्यमातून करण्यालाही मदत होत असून, संपर्क यंत्रणा सुलभ झाली आहे.'' असे महंत भक्तिचरणदास पंचमुखी हनुमान मंदिर, दिगंबर आखाडा नाशिक यांनी म्हटले आहे.

भारतात इंटरनेटचा वेग वाढणार

नवीन वर्ष भारतासाठी सर्वार्थाने 'अच्छे दिन' घेऊन येणारे ठरण्याची सुचिन्हे आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये देशातील इंटरनेट खूपच स्वस्त झाल्याने इंटरनेटचा वापर वेगाने वाढत आहे. हे सगळे खरे असले तरी देशातील इंटरनेटचा वेग ही त्यातील प्रमुख समस्या होती. आफ्रिकेतील छोट्याछोट्या देशांमध्येही इंटरनेटचा वेग आपल्यापेक्षा अधिक आहे. मात्र नव्या वर्षात ही समस्या दूर होऊ शकते. कारण २०१५ मध्ये 'गुगल फायबर'ची सुविधा उपलब्ध होणार आहे.

केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्रालय आणि 'गुगल फायबर टीम' यांच्यात झालेल्या करारानुसार आगामी काही महिन्यांतच ही सेवा भारतात लाँच

होईल. केंद्रातील मोदी सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'डिजिटल इंडिया' उपक्रमासाठी 'गुगल फायबर'ची मदत होणार आहे. 'गुगल फायबर' ही 'गुगल'ची स्वत:ची ब्रॉडबँड सेवा असून, तिचा वेग असणार आहे एक हजार मेगाबाइट प्रति सेकंद अर्थात एक जीबीपीएस. सध्या ब्रॉडबँड वापरत असणाऱ्या भारतीय ग्राहकांसाठी या वेगाने इंटरनेट सर्फिंग करण्याचा आनंद द्विगुणित होऊ शकतो. सध्या फाइल अथवा पिक्चर डाउनलोड आणि अपलोड करण्यासाठी लागणारा वेळ पाहता नव्या सेवेमुळे ही कामे चुटकीसारखी होतील. एक जीबीपीएस इतक्या प्रचंड वेगामुळे उच्च दृश्यमानतेसाठी, अर्थात एचडी चित्रपट डाउनलोड करण्यासाठी केवळ ३३ सेकंदांचा वेळ लागेल. याचाच अर्थ १०० फोटो डाउनलोड करणे फक्त पाच सेकंदांत शक्य होईल. सध्या अमेरिकेतील कॅनकस शहरामध्ये 'गुगल फायबर' सेवेचा लाभ घेणाऱ्या ग्राहकाचे अनुभव पाहा आणि ऐका https://www.youtube.com/watchv=s9qXrqKkomA या लिंकवर कॅनकसमध्ये २०११ मध्येच 'गुगल फायबर' ही सेवा लाँच करण्यात आली. तेथील गुगल अधिकाऱ्यांच्या मते ही सेवा तत्कालीन ब्रॉडबँड सेवेच्या शंभर पट वेगवान आहे. सेवा वेगवान असली, तरी इंटरनेटचे प्लॅन अत्यंत कमी दरात आहेत.

'मूर्ती क्लासिकल लायब्ररी' उपक्रम

इन्फोसिसचे संस्थापक नारायण मूर्ती यांचे पुत्र रोहन मूर्ती यांनी वैयक्तिक आर्थिक योगदानातून मूर्ती क्लासिकल लायब्ररीचा (एमसीएलआय) उपक्रम सुरू केला आहे.

१५ जानेवारीला दिल्लीत प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन यांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्‌घाटन झाले.

या उपक्रमांतर्गत देशभरातील अभिजात भारतीय साहित्य जगभर जावे, यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत. रोहन मूर्ती म्हणाले, 'ग्रीक आणि लॅटिन साहित्याशी आपण परिचित असतो, पण आपल्याकडचे कितीतरी अभिजात साहित्य अपरिचितच राहते.' याबाबत त्यांनी स्वत:चा अनुभवही सांगितला. ते म्हणाले,'मी स्वत: शाळेत असताना शेक्सपीअर शिकलो. तो महान आहेच. पण त्याच वेळी माझी मातृभाषा असलेल्या कन्नड भाषेतील काव्य शिकण्याची संधी मात्र मला मिळाली नाही. या भाषेत कितीतरी

महत्त्वाचे साहित्य निर्माण झाले आहे.'

दिल्ली आणि बेंगळुरूनंतर 'एमसीएलआय' २३ आणि २४ जानेवारी रोजी जयपूर लिटररी फेस्टिव्हलमध्ये सहभागी झाले. रोहन यांच्यासह सुधा मूर्ती, शेल्डन पोलॉक आणि गिरीश कार्नाड हेही चर्चेमध्ये सहभागी झाले. 'एमसीएलआय' उपक्रमांतर्गत पुस्तके हावर्ड युनिव्हर्सिटी प्रेस प्रसिद्ध करणार आहे.

नव्या पिढीला भारतीय अभिजात साहित्य इंग्रजीमधून उपलब्ध व्हावे, हे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. पुस्तकाचे समकालीन डिझाइन कायम ठेवून, आधुनिक टाइपफेसेस वापरून बंगाली, हिंदी, कन्नड, मराठी, पाली, पंजाबी, पर्शियन, संस्कृत, सिंधी, तामिळ, तेलगु आणि उर्दू भाषेतील साहित्य इंग्रजीत उपलब्ध करून दिले जाईल. एका पानावर मूळ भारतीय भाषेतील मजकूर तर समोरच्या पानावर इंग्रजी भाषेतील मजकूर असे या मालिकांमधील पुस्तकाचे स्वरूप असेल.

''हा केवळ शैक्षणिक उपक्रम नाही. तर तो सामान्य माणसापर्यंत पोहचावा असे वाटते, 'एमसीएलआय' माझ्यानंतरही टिकून रहावा, अशी माझी मनीषा आहे.'' असे रोहन मूर्ती म्हणाले.

मोबाइलद्वारे चित्रपटांचे चित्रीकरण!

आष्टा गाव येथील अवघ्या २० वर्षाच्या तरुणाने काही हौशी मित्रांच्या मदतीने अल्प साधनांच्या आधारे तीन लघुपट निर्माण केले. त्यातील दोन प्रदर्शित झाले. तिसरा चित्रपट प्रदर्शनाच्या वाटेवर आहे. मोबाइलच्या साहाय्याने निर्मित पहिल्या चित्रपटाची नोंद झाली. असिफ खान (२०) हा निर्माता व कथाकार आहे. निर्देशन व संकलन (एडिटिंग) त्यानेच केले. इतकेच नव्हे, जाहिरातींचे बॅनर सुद्धा तोच तयार करतो.

आसिफ खानची आर्थिक परिस्थिती जेमतेम. आसिफने चित्रपटनिर्मिती अल्प साधनसामग्रीत पूर्ण केली. मोशींला शिकत असताना तेथील तरुणांशी त्याची मैत्री जमली. दरम्यान, व्हिडीओ रेकॉर्डिंग करता यावे, म्हणून त्याने मोबाइल विकत घेतला आणि येथूनच त्याच्या स्वप्नपूर्तीचे प्रयत्न सुरू केले.

आसिफच्या या धडपडीची आणि यशाची चर्चा नागपूरच्या विदर्भ फिल्म्स या चित्रपट निर्मात्यांपर्यंत पोहोचली. त्यांनी आसिफला बोलावून घेतले. त्याच्याशी चर्चा केली. त्याने तयार केलेले चित्रपट पाहिले आणि

त्यांच्याकरिता चित्रपट निर्माण करण्याची गळ घातली. विदर्भ फिल्मस्च्या बॅनरखाली आसिफने 'जीवन चरित्र - २' हा दीड तासाचा चित्रपट तयार केला.

बालभारतीच्या पाठ्यपुस्तकातील 'स्मशानातील सोने' या पाठाची कथा त्याला खूप आवडली. त्याने या कथेवर चक्क मोबाइलने चित्रीकरण करून ४२ मिनिटांचा पहिला चित्रपट सन २०११ मध्ये तयार केला. मोबाइलवरच चित्रपटाचे एडीटिंग केले. त्याने चित्रपट गावात लोकांना दाखविला.

पहिल्या चित्रपटाच्या यशामुळे प्रेरित होऊन आसिफने हँडी कॅमेरा खेरदी करून स्त्रीभ्रूणहत्येविरोधात 'अभिमान' हा एक तासाचा चित्रपट तयार केला.

महिलांवरील अत्याचारविरोधात डेव्हिल्स ऑफ सोसायटी आणि तरुणांमधील वाढती व्यसनाधीनता या विषयावर 'लाइफ इज ए शॉर्ट फिल्म' हे दोन लघुपट करण्याचा आसिफचा मनोदय आहे. शासनाने संपूर्ण राज्यात हे लघुचित्र प्रदर्शित केल्यास समाजात चांगला संदेश जाईल, अशी आशा आसिफला आहे.

संजय झोटिंग, पवन हरणे, अनुप तागडे, राहुल मेटांगे, मनीष इंगळे, खानापूर येथील वैष्णवी भडांगे, सागर दाभोडे, रोहित धुळे, कृष्णा झोलेकर, स्वप्निल औतकर आणि अमरावती येथील कोरीओग्राफर सारंग सोनवणे ही मंडळी हौसेपोटी या चित्रपटात काम करीत आहेत.

२५२ वर्षांपूर्वीचे हस्तलिखित!

भारतभर विविध ठिकाणी भ्रमंती करून २८४ संतांची चरित्रे लिहिणारे संतकवी महिपती महाराज यांचा एकमेव हस्तलिखित ग्रंथ श्रीक्षेत्र ताहराबाद (ता.राहुरी) येथे २५२ वर्षांपासून जतन करून ठेवण्यात आला आहे.

'श्री भक्तिविजय' असे ग्रंथाचे नाव असून, महिपती महाराजांचे वंशज पांडुरंग कांबळे यांनी तो देवस्थान ट्रस्टकडे दिलेला आहे. १७६२ मध्ये महाराजांनी लिहिलेल्या श्री भक्तिविजय ग्रंथामध्ये ५७ अध्याय असून, १९१६ ओव्या समाविष्ट आहेत. बाजरीचे दाणे जाळून त्यापासून तयार केलेल्या शाईने वळणदार अक्षरात ग्रंथनिर्मिती केली असल्याची माहिती संस्थानचे सचिव बाळासाहेब मुसमाडे यांनी दिली. पांडुरंगाची मूर्ती समोर ठेवून महिपती महाराजांनी १५ ग्रंथांची निर्मिती केली. या हस्तलिखिताचे ग्रंथ असल्याने त्याचे जतन करण्यात येणार असल्याचे संस्थानाचे अध्यक्ष

रावसाहेब साबळे यांनी सांगितले. महाराजांनी उत्तर आयुष्यात २५ वर्षात १५ ग्रंथ लिहिले. महाराजांना मराठी, संस्कृत, गुजराती, हिंदी व कानडी या पाच भाषा अवगत होत्या. अमेरिकन ख्रिश्चन धर्म प्रचारक एडवर्ड ॲबर्ट यांनी भक्तिविजय, भक्तलीलामृत व संतविजय या ग्रंथांचे इंग्रजीत अनुवाद करून महिपती महाराजांच्या साहित्याचा प्रसार सातासमुद्रापलीकडे केला आहे.

श्री भक्तिविजय, श्री कथा सारामृत, संत लीलामृत, भक्त लीलामृत, संत विजय, श्री अनंत दंत कथा, श्री दत्तात्रय जन्म, श्री तुलसी महात्म्य, श्री गणेश पुराण, श्री पांडुरंग स्तोत्र, श्री मुक्ता भरण द्रात, श्री ऋषीपंचमी द्रात, स्फुट अभंग व पदे, अशी त्यांची साहित्यसंपदा आहे.

विज्ञान कथाविषयक परिसंवाद

विज्ञान कथा साहित्याविषयी समाजात गोडी वाढवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्याच्या जोडीलाच विज्ञान कथा समीक्षकही निर्माण झाले पाहिजेत, असे मत 'साय फाय कट्टा' परिसंवादात व्यक्त करण्यात आले.

'साय फाय कट्टा' ही संस्था महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ व मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त प्रयत्नांतून निर्माण झाली आहे. या संस्थेच्यावतीने विज्ञान कथा लेखनाचे प्रशिक्षण देण्यात येते.

आ. पां. देशपांडे यांनी सांगितले की, विज्ञान कथा लेखन ही जशी गरज आहे. त्या प्रमाणेच विज्ञान कथा समीक्षक तयार होणेही आवश्यक आहे. विज्ञान लेखक निरंजन घाटे यांनी सांगितले की, मराठीतील विज्ञान साहित्याकडे केवळ ते दुर्बोध असते म्हणून दुर्लक्ष करण्यात येते. ह. मो. मराठे, सुबोध जावडेकर यांनीही मनोगत व्यक्त केले.

'उन्हाच्या कटाविरुद्ध' चे प्रकाशन

'अभिव्यक्तीसाठी ज्यांना काही सापडले आहे, ते चांगले काही तरी करतात. ज्यांना काहीच जमत नाही, ते केवळ राडा करतात,' असे परखड मत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या विद्या बाळ यांनी मांडले.

'आटपाट निर्मिती'च्या वतीने दिग्दर्शक नागराज मंजुळे यांच्या 'उन्हाच्या कटाविरुद्ध' या काव्यसंग्रहाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन त्यांचे बालमित्र बाळासाहेब बनसोडे यांच्या हस्ते झाले. तसेच 'आटपाट निर्मिती'च्या बोधचिन्हाचेही अनावरण याच कार्यक्रमात झाले. प्रकाशनानंतर

'माझ्या हाती लेखणी नसती..' या विषयाच्या अनुषंगाने डॉ. प्रदीप आवटे यांनी अभिनेत्री अमृता सुभाष, विद्या बाळ, दिग्दर्शक उमेश कुलकर्णी, मंजुळे यांच्याशी संवाद साधला.

'आत्महत्या, खून हे स्त्रियांच्या अत्याचारांचे एक टोक आहे. स्त्रियांनी बोलते होणे आवश्यक आहे. माणसाच्या जन्माला आल्यावर माणसासारखे जगता आले पाहिजे. कवडीमोल होऊन विरून जाता कामा नये,' असेही बाळ यांनी सांगितले.

कविता ही कोणत्याही उत्तेजक द्रव्यापेक्षा जास्त उत्तेजक असल्याचे सांगून मंजुळे म्हणाले, ''भटक्या जनावरासारखा भटकत होतो; मात्र वाटेतील लोकांनी हुसकून लावले म्हणून योग्य वाटेला आलो. आयुष्यात चित्रपट कविता असे काही केले नसते तर स्वत:ची कोंडी केली असती. अनेकदा न बोलणेदेखील अभिव्यक्तीच असते.''

सतत नव्या लोकांना भेटत राहण्यासाठी, स्वत:ला समजून घेण्यासाठी, स्वत:चा शोध घेण्यासाठी काहीतरी निर्मिती करत असल्याचे कुलकर्णी यांनी स्पष्ट केले. 'घरातच साहित्यिक वातावरण असल्याने शब्दांची गोडी लागली; मात्र लिहिण्याविषयी न्यूनगंड वाटायचा. नाटककार विजय तेंडुलकरांनी लिहिण्याचा सल्ला दिला. लिहायला लागल्यावर त्यातील मर्म कळले. अनेकदा लिहिण्यातून जगण्यातील मुखवटा उतरतो. आता लिहिणे ही अभिव्यक्तीपेक्षा निकड झाली आहे,' असे सुभाष यांनी सांगितले. प्रा. संजय साठे यांनी सूत्रसंचालन केले, गार्गी कुलकर्णी यांनी आभार मानले.

गीतरामायण षष्ट्यब्दी महोत्सव

पुण्यामध्ये १ एप्रिल १९५५ रोजी आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून गीतरामायणातील पहिल्या गीताचे प्रसारण झाले, त्याला ६० वर्षे पूर्ण होत आहेत. हा योग साधून संगीतकार-गायक श्रीधर फडके गीतरामायण सादर करणार आहेत. गीतरामायणाचे विविध भारतीय भाषांमध्ये भाषांतर झाले असून संस्कृत हिंदी आणि कानडी अशा तीन भाषांतील प्रत्येकी दोन गीते या महोत्सवात सादर केली जाणार आहेत.

गीतरामायणाच्या रौप्यमहोत्सवी कार्यक्रमास तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, ज्येष्ठ नेते अटलबिहारी वाजपेयी आणि गानहिरा हिराबाई बडोदेकर उपस्थित होत्या. तर गीतरामायणाच्या ६० वर्षांच्या

वाटचालीतील छायाचित्रे, घटना, माहितीचे संकलन असलेली, त्याचप्रमाणे मान्यवरांच्या मुलाखती आणि लेखांचा समावेश असलेली स्मरणिका या प्रकाशित केली जाणार आहे.

'रहे ना रहे हम' पुस्तकाचे प्रकाशन

''संगीत संयोजक श्यामराव कांबळे यांनी माझ्या गाण्यांना एका वेगळ्या उंचीवर नेले. त्यांच्या संगीत संयोजनातील नवे प्रयोग मी जवळून अनुभवले. त्याच्या कामाविषयीच्या निष्ठेने आणि संगीत संयोजनातील वेगळेपणामुळे त्यांना संगीत क्षेत्रातील थोर कलावंत बनवले,'' अशी भावना संगीतकार प्रभाकर जोग यांनी व्यक्त केली.

आशा वैद्य यांनी लिहिलेल्या 'रहे ना रहे हम' या संगीत संयोजक श्यामराव कांबळे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन सांगीतिक श्रीधर फडके यांच्या हस्ते झाले.

जोग म्हणाले,''कांबळे यांच्याकडून बारीक-सारीक गोष्टी शिकायला मिळाल्या. माझ्या कारकिर्दीतल्या निम्म्याहून अधिक गाण्यांचे संयोजन त्यांनी केले. त्यामुळेच माझ्यात व त्यांच्यात भावासारखे नाते निर्माण झाले.''

मोबाईल 'ॲप' द्वारे होणार चेक क्लिअर

मराठवाडा मित्र मंडळ ऑफ इंजिनिअरिंगच्या (एमएमसीओई) शेवटच्या वर्षाला असणाऱ्या वैष्णवी कुलकर्णी, अंकिता गांधी आणि उमा करंबळेकर या विद्यार्थिनी 'ऑटोमेटेड चेक प्रोसेसिंग बेस्ड ऑन अँड्रॉइड फोन' हे ॲप्लिकेशन तयार करीत आहेत. ऑनलाइनमार्फत चेक क्लिअरिंग एका दिवसात होऊन खात्यात पैसेही जमा होतील. सध्या अशी प्रणाली अमेरिकेमध्ये वापरण्यात येते. भारतात अशा प्रकारचा प्रयोग अद्याप झालेला नाही.

वैष्णवी म्हणाली, ''माहिती व तंत्रज्ञान यात आपला देश प्रगती करत असताना आजही आपल्याला विविध कामे पारंपरिक पद्धतीने करावी लागत आहेत. खरं तर तंत्रज्ञानाचा वापर करून विविध क्षेत्रातील कामे केल्यास वेळ आणि पैसा दोन्ही वाचणार आहेत. याच उद्देशाने आम्ही हे 'ॲप' करत आहोत.''

नववर्षात मोबाइल्सना खंडणीबहाद्दरांचा धोका

विंडोज आणि अँड्रॉइड ऑपरेटिंग सिस्टिममध्ये येत्या वर्षात कोणते धोके असतील याबाबत एक अहवाल सादर करण्यात आला आहे. या अहवालानुसार अनेक मालवेअर्स हे आता स्थानिक भाषांमध्ये शिरकाव करू लागले आहेत. यामुळे भविष्यात यांचा सर्वाधिक धोका असेल.

विंडोज ऑपरेटिंग सिस्टिममध्ये आढळून येणारे रॅन्समवेअर नावाचे मालवेअर विंडोजच्या वापरकर्त्यांसाठी सर्वाधिक धोकादायक असणार आहे.

रॅन्समवेअर स्थानिक वेळ, भाषा आणि ॲथॉरिटीज विचारात घेऊन स्थानिक फॉरमॅटमध्ये लघुसंदेश दर्शवते.

रॅन्समवेअर हा २०१४ मध्ये प्रमुख धोका होता. यामध्ये संगणक आभासी पद्धतीने एन्क्रिप्ट व लॉक करण्यात आले आणि ते पूर्ववत करण्यासाठी खंडणी मागण्यात आली. रॅन्समवेअस २०१५ मध्ये आधुनिक तंत्र वापरण्याची शक्यता आहे आणि काळजी करण्याची ही मुख्य बाब असणार आहे. ॲडवेअर अर्थात जाहिरातींच्या माध्यमातून व्हायरसचा शिरकाव करण्यासाठी अत्याधुनिक तंत्र विकसित झाले आहे आणि ही पद्धत मालव्हर्टायजिंग म्हणून ओळखली जाते. २०११ ते २०१४ मध्ये अँड्रॉइड मालवेअरमध्ये ३०४ पट वाढ झाल्याचे दिसून आले.डिटेक्ट झालेल्या नमुन्यांमध्ये जानेवारी २०१४ ते डिसेंबर २०१४ या काळात तिपटीने वाढझाली.२०१४ मध्ये, विचक हिलला नव्या ५३६ मालवेअर फॅमिली आढळल्या आणि अँड्रॉइडला घातक असलेले नवे ६१६ प्रकार आढळले. अँड्रॉइड युजर्ससाठी अधिकृत गुगल प्ले स्टोअरवर बनावट पेड ॲप्लिकेशनचा धोका वाढला.

'ॲप'च्या मदतीने गुगल ट्रान्सलेट

परदेशात गेल्यानंतर दुकानाच्या पाट्या किंवा मेन्यू कार्ड वाचायची समस्या 'गुगल ट्रान्सलेट' हे गुगलचे नवे व्हर्जन दूर करील. गुगलच्या या सेवेमध्ये बोललेल्या शब्दांच्या भाषांतराबरोबरच कॅमेऱ्याच्या मदतीने मजकुराचे चित्रांमध्ये भाषांतर करण्याची सुविधाही करता यावी म्हणून गुगलने 'क्वेस्ट व्हिज्युअल' या कंपनीचे 'वर्ल्ड लेन्स' हे ॲप विकत घेतले आहे. हे ॲप मजकुरातील कोणत्याही भागाचे चित्रामध्ये रूपांतर करून देईल. हे ॲप तूर्त मोफत डाऊनलोड करता येईल. या ॲपद्वारे फ्रेंच, जर्मन, इटालियन,

पोर्तुगीज, रशियन व स्पॅनिश भाषांचे इंग्रजीमध्ये भाषांतर करण्याची सोय आहे. 'संभाषण' मोड द्वारे तुम्ही समोरच्या व्यक्तीची भाषा ज्ञात नसली, तरी तिच्याशी संवाद साधू शकता. तुम्ही स्वत: बोलत असलेली भाषा आणि समोरच्या व्यक्तीची भाषा या ॲपमध्ये सेट केल्यावर ते आपोआप तुमच्या मध्ये संवाद सुरू करून देईल.

ऑनलाइन शॉपिंग - नवी क्रेझ

२०१५ हे वर्ष संपेपर्यंत वस्तूंच्या खरेदीसाठी वेगळ्या साइट्सवर जाण्याची गरज लागणार नाही. कारण ट्विटर आणि फेसबुक या दोन्ही कंपन्या आपल्या साइटवर '.. ' हे इंटिग्रेडेट बटन देणार आहे. काही ठराविक ट्विटर्सवर 'बाय'चा पर्याय देण्याची चाचणी यशस्वीरीत्या पार पडल्यानंतर सर्वच कंपन्यांनी ही कल्पना उचलून धरली आहे. 'टंबलर' सारख्या इतर साइट्सवर लवकरच 'बाय'चा पर्याय देणार आहे. यामुळे ऑनलाइन शॉपिंग नक्कीच वाढेल. साइट्सवर सोशल मीडिया शेअरिंगच्या पर्यायात भर पडेल. सोशल शेअरिंगवरून कंटेंटचं महत्त्व अधोरेखित होण्याबरोबर 'शेअरेइिलिटी' हा एक नवीन मापदंड तयार होऊन त्यावरून कंटेंटचें महत्त्व कळेल.

दिखेगा, वही बिकेगा

जास्त टेक्स्ट कंटेंट ऐवजी नजरेला आकर्षित करणारा कंटेंट किंवा सोशल साइट्स यंदा लक्ष वेधून घेतील. चित्रांच्या माध्यमातून दिलेले संदेश जास्त लवकर लक्षात राहतात. 'मोअर व्हिज्युअल्स, मोअर ऑडियन्स' हा फंडा सोशल नेटवर्किंगवर दिसून येईल; शिवाय, एकाच प्रकारच्या आवडी-निवडी असणाऱ्या ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी फेसबुकवरील डेटाचा वापर करून जोरदार जाहिरातबाजी करण्यात येणार आहे. वस्तूंच्या विक्रीबरोबरच ग्राहकांना आपल्या साइटवर आणणं किंवा खिळवून ठेवणं यासाठी या जाहिराती मोठ्या प्रमाणात वापरल्या जातील.

व्हॉइस कॉल

सर्वच मेसेजिंग ॲप्समधून सोशल नेटवर्किंग साइट्स व्हॉइस आणि व्हिडिओ कॉलच्या स्पर्धेत उडी घेतील. व्हॉट्सॲपवर व्हॉइस कॉल आल्यानंतर फोन कॉल्सची संख्या नक्कीच घटेल. व्हॉइस कॉलबरोबरच व्हिडिओ कॉलचेही टेस्टिंग या वर्षी करण्यात येईल, शिवाय आपलं लिखाण जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी ब्लॉग्जची संख्याही वाढेल.

सोल फ्रेंडली डिव्हाइसेस

पुढील वर्षी स्मार्टफोनपासून ते फेसबुक पोस्ट किंवा ट्विट करण्यास मदत करणाऱ्या स्मार्टवॉचपर्यंत सर्व गोष्टी सोल नेटवर्किंग डोक्यात ठेवूनच डिझाइन करण्यात येतील. स्मार्टफोनमधील सोशल नेटवर्किंग ॲप्स आणखीन स्मार्ट होतील.

प्रोफेशनल व सोशल नेटवर्किंगला आव्हान

पुण्यातील ५ तरुण टेक्नोसॅव्ही मित्रांनी एकत्र येऊन 'रायपिन' हा नवा पर्याय शोधून काढून फेसबुक व लिंकडिनसारख्यांना 'काटे की टक्कर' देऊ शकेल, असे हे प्रोशल (प्रोफेशनल+सोशल) नेटवर्क तयार केले आहे.

संपूर्णत: भारतीय असणारे 'रायपिन' हे नवे फोरम सध्याच्या सर्व सोल नेटवर्किंगमध्ये अद्ययावत व नावीन्यपूर्ण ठरणारे आहे. सध्याच्या सोशल नेटवर्किंगमधील अनेक त्रुटी कमी करून ऐकता येणारे अपडेट्स,पर्सनल टच अशा अनेक सुविधा या पर्यायात आहेत.

काही महिन्यात 'रायपिन' हे पूर्णपणे ॲक्टिव्ह झालेले असेल. सद्य:स्थितीत अवघ्या ५ दिवसांत ९०० जणांनी त्यांच्या पेजला भेट दिली असून, ३०० जणांनी नोंदणीही केली आहे. तरुणाईचा प्रतिसाद लक्षात घेऊन त्याची आणखी क्षमता विस्तारली जाणार आहे.

यात नवीन काय आहे?

लॉग इन होताच गुडमॉर्निंग, गुड डेच्या शुभेच्छा मिळणार.. ई-गव्हर्नन्सचे अद्ययावत अपडेट्स मिळणार.

'स्पीक अप' माध्यमातून दिवसभरातील अपडेट्स चक्क ऐकता येणार

फेसबुकच्या लाइकला मर्यादा आहेत त्यामुळे शेअर करता येणार.

'सोशल लाईफ' वेगळं असतं आणि प्रोफेशनल जग त्याहून वेगळं. ती एकमेकांत आपल्याला मिसळायची नसतात.

ही सुविधा सोशल नेटवर्किंगवर नाही. 'प्रोशल' नेटवर्क मुळे स्वांतत्र्य जपता येते. काम आणि मित्र यांची सरमिसळ होतच नाही.

शिक्षण संस्थांची इंटरनेट क्षमता वाढणार

दीड हजार विद्यापीठे आणि खासगी शैक्षणिक संस्थांना दोन महिन्यांत तब्बल १० मिगाबाइट्स पर सेकंड बँडविड्थची इंटरनेट क्षमता मिळणार

आहे. सध्या ही क्षमता केवळ १ जीबी आहे. भारतात शैक्षणिक संस्थांना ब्रॉडबँड कनेक्टिव्हिटी पुरविणारी नॅशनल नॉलेज नेटवर्क ही राष्ट्रीय संस्था 'इंटरनेट २' या अमेरिकी संस्थेबरोबर लवकरच १० जीबीपीएम कनेक्टिव्हिटीचा समंजस्य करार करणार आहे. त्यामुळे भारतातील दीड हजार शिक्षण संस्थांची इंटरनेट कनेक्टिव्हिटी क्षमता १० पट वाढणार आहे. संशोधन करू इच्छिणाऱ्या विद्यापीठांना या नव्या बँडविड्थचा चांगला उपयोग होणार आहे. या करारासाठी केंद्राने निविदा मागविल्या होत्या. त्यानुसार इंटरनेट २ ची निवड केली आहे.

'इंटरनेट २' ही अमेरिकेली सर्व रिसर्च युनिव्हर्सिटींनी एकत्रितपणे स्थापन केलेली 'ना नफा, ना तोटा' तत्त्वावरील संस्था आहे. संशोधन करणाऱ्या जगभरातील विद्यापीठांना ब्रॉडबँड कनेक्टिव्हिटी पुरवणे, नेटवर्किंगच्या क्षेत्रात संशोधन करणे हे या संस्थेचे काम आहे.

'बल्क एसएमएस'प्रमाण घटले

व्हॉट्सॲप, ट्विटर आणि फेसबुकच्या रेट्यात 'बल्क' एसएमएस' पुरविणाऱ्या खाजगी कंपन्या आता मागे पडू लागल्या असून, नवीन वर्ष आणि सणासुदीच्या काळात या सेवेकडे लोकांनी पाठ फिरवली आहे. गेल्या दोन वर्षांत जवळपास पन्नास टक्के घट झाली आहे.

मात्र गेल्या चार वर्षांत नातेवाईक, मित्र-मैत्रिणींना मोबाईलवरून 'एसएमएस'च्या माध्यमातून शुभेच्छा देण्याचे प्रमाण वाढीस लागले आहे. कार्पोरेट कंपन्या आणि किरकोळ बाजारातील व्यावसायिकांकडून सेवेला अजूनही मागणी असल्याचे या क्षेत्रातील व्यावसायिकांनी स्पष्ट केले.

'शार्ली हेब्दी'चे हत्याकांड

फ्रेंच व्यंगचित्र साप्ताहिक 'शार्ली हेब्दी'वर ७ जानेवारी रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याची जबाबदारी 'अल् कायदा इन द अरब पेनिन्सुला' या दहशतवादी संघटनेने स्वीकारली आहे. तसेच, या हल्ल्याचा कट अनेक वर्षांपासून रचला जात होता, असा दावा करणारा एक व्हिडिओ या संघटनेने ट्विटरवर प्रसारित केला आहे. मात्र, या दाव्याला पुष्टी देणारा कोणताही पुरावा त्यात नाही.

गेल्या वर्षी येमेनमध्ये मारला गेलेला अन्वर अल् अवलाकी हा धर्मांध

धर्मगुरू या हल्ल्याचा मास्टरमाइंड होता. तो २०११ पासून 'शार्ली हेब्दो'वर हल्ल्याचा कट रचत होता, असे या व्हिडिओमध्ये म्हटले आहे. 'शार्ली हेब्दी'च्या हल्लेखोरांनी येमेनमध्ये अवलाकींची भेट घेतली असावी, असा गुप्तहेर यंत्रणांचा अंदाज आहे.

पॅरिसमधील 'शार्ली हेब्दो' मासिकाच्या कार्यालयावर हल्ल्याच्या घटने आठ दिवसांनी इस्लामी हॅकरनी फ्रान्सच्या एक हजार वेबसाइट हॅक केल्या आहेत. या वेबसाइटच्या मुख्य पानावर 'डेथ टू फ्रान्स,' 'डेथ टू चार्ली,' असे संदेश लिहिण्यात आले आहेत.

हॅक करण्यात आलेल्या साइटमध्ये प्रमुख्याने स्थानिक सरकारी, विद्यापीठे, चर्च आणि उद्योगांच्या साइटचा समावेश आहे. उत्तर आफ्रिका आणि मॉरिटारिया येथून साइट हॅक करण्यात आल्या आहेत.

सोशल मीडियांमुळे वेळ वाया जातो

''सोशल मीडियामुळे बहुसंख्य तरुण आयुष्यातील किंमती वेळ वाया घालवीत आहेत. ते वापरणे जरी सोपे आणि किफायतशीर असले, तरी ते चालविणाऱ्या कंपन्यांचा केवळ व्यवसाय हाच हेतू आहे. त्याचे कायदेही कडक आहेत. यामुळे सोशल मीडियाकडे गरजेपुरते पाहा,'' असे मत माध्यमतज्ज्ञ समीरण वाळवेकर यांनी व्यक्त केले.

जैन संघटना महाविद्यालयात आयोजित 'तरुण आणि सोशल मीडिया' एकदिवसीय कार्यशाळेत प्रा. महावीर श्रीश्रीमाळ, सचिन खाडे, शशिकांत केसकर उपस्थित होते. प्रा. सहदेव चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले.

इंटरनेट इकॉनॉमीची उलाढाल २०० अब्ज डॉलरवर

इंटरनेटची वेगाने वाढवणारी कम्प्युटर साक्षरता आणि मोबाइल डेटाच्या वापरामध्ये दिवसेंदिवस पडणारी भर यांमुळे २०२० मध्ये देशाच्या एकूण जीडीपीमध्ये इंटरनेट इकॉनॉमीचा वाटा पाच टक्क्यांचा (२०० अब्ज डॉलर) असेल, असे केंद्रीय दूरसंचार मंत्री रविशंकर प्रसाद यांनी नवी दिल्लीत आयोजित 'इंडिया डिजिटल समिट' मध्ये स्पष्ट केले.

एकीकडे इंटरनेटचा वापर वाढत असला, तरी दुसरीकडे देशातील ब्रॉडबँडचे जाळे त्या प्रमाणात वाढत नसल्याचेही त्यांनी मान्य केले. त्यासाठी केंद्र सरकार 'नॅशनल ऑप्टिकल फायबर नेटवर्क'ची (एनओएफएन) मदत घेत आहे. त्याचा फायदा देशातील कॉम्प्युटर साक्षरता वाढीला होणार आहे.

इंटरनेट इकॉनॉमीच्या मदतीने मोबाइल इंटरनेटची वाढहोत आहे.

गेल्या तीन वर्षांमध्ये सात लाख फायबरचे जाळे तयार विणण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर एनडीए सरकारने राबविलेला 'डिजिटल इंडिया प्रोग्रॅम' गेमचेंजर ठरत असल्याचेही प्रसाद यांनी सुचित केले.

केंद्र सरकारने डिजिटल इंडिया मोहिमेला पुरेसे पाठबळ दिल्यास २०१८ पर्यंत इंटरनेट इकॉनॉमीची उलाढाल २०० अब्ज डॉलरपर्यंत जाऊ शकेल.

एक अब्ज डॉलरपेक्षा अधिक मूल्य असणाऱ्या भारतीय इंटरनेट स्टार्टअप कंपन्यांची संख्या वाढत आहे. जागतिक इंटरनेट वापरात भारताचा तिसरा क्रमांक लागतो. इंटरनेट वापराचे प्रमाण वाढविण्यासाठी ब्रॉडबँड नेटवर्क आणखी विस्तृत करण्याची आवश्यकता आहे.

सवाई गंधर्व महोत्सव इंटरनेटवर

अभिजात भारतीय संगीताचे जतन करत नव्या पिढीतील संगीतप्रेमीपर्यंत पोहोचवण्यासाठी आर्य प्रसारक संगीत मंडळाने महत्त्वपूर्ण आणि व्यापक पाऊल उचलले असून, ६२वा सवाई गंधर्व भीमसेन महोत्सव इंटरनेटवर दाखल होणार आहे.

'इंडियन मॅजिक आय'चे संचालक हृषिकेश देशपांडे, राजेश देशमुख या वेळी उपस्थित होते. 'सवाई'ला ऑनलाइन आणण्याच्या कल्पनेला इंडियन मॅजिक आयने मूर्त रूप दिले आहे.

'इंटरनेटवर उत्तम दर्जात 'सवाई' उपलब्ध झाल्यामुळे संगीतप्रेमींना घरबसल्या अभिजात संगीताचा आनंद घेता येईल. कॉपीराइट भंगाचा प्रश्न येऊ नये यासाठी प्रत्येक कलावंताशी कायदेशीर करार करण्यात आला आहे. यंदा हा पहिलाच प्रयोग असल्याने अद्याप यातील व्यावसायिक गणिताचा विचार केलेला नाही,'' असे राजेश देशमुख यांनी सांगितले.

प्रख्यात पार्श्वगायक सोनू निगमचा प्रस्तुतकर्ता म्हणून असलेला सहभाग हे पहिल्यावहिल्या वेबस्ट्रिमिंगचे खास वैशिष्ट्य ठरणार आहे. 'सोनू निगम हे पार्श्वगायक म्हणून ख्यात असले, तरी ते शास्त्रीय संगीतही उत्तम पद्धतीने गातात. त्यांच्या माध्यमातून परदेशातील संगीतप्रेमींपर्यंत पोहोचणे अधिक सोपे होईल,' असे हृषिकेश देशपांडे यांनी सांगितले.

अभिजात शास्त्रीय संगीताची आणि महोत्सवाची परंपरा न मोडता काळासोबत जपूनच राहण्याचा हा प्रयोग आहे. बुजुर्ग कलावंतानीही या

कल्पनेचे स्वागत केले आहे, असे श्रीनिवास जोशी (अध्यक्ष, आर्य प्रसारक संगीत मंडळ) यांनी म्हटले.

'ऑक्सफर्ड'ची 'डुक्कर' शब्दावर बंदी

प्रेषित महंमद पैगंबरांचे व्यंगचित्र प्रसिद्ध केल्याने फ्रान्सच्या 'शार्ली हेब्दो' साप्ताहिकावर झालेल्या हल्ल्यानंतर धार्मिक संवेदनशीलतेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. वेगवेगळ्या पातळ्यांवर या विषयी चर्चा होत असतानाच 'डुक्कर', 'डुकरांचे मांस' व त्यासंबंधित शब्दांचा वापर लेखकांनी करू नये, असे निर्देश ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने (ओयूपी) दिले आहेत. मुस्लिम आणि ज्यू बांधवांच्या धार्मिक भावना दुखावल्या जाऊ नयेत, यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे प्रेसने, संबंधित लेखकांना लेखी कळविले आहे. त्यामुळे ऑक्सफर्डच्या शैक्षणिक पुस्तकांतून आता संबंधित शब्दसमूहावर बंदी घालण्यात येणार आहे.

'ओयूपी' वर्षाला ६००० पुस्तके प्रकाशित करते. त्यांचे १५० देशांत वितरण केले जाते. त्यासाठी ६००० कर्मचारी सातत्याने कार्यरत असतात. नव्या शब्दांवरील बंदी ही अभ्यासक्रमांशी संबंधित पुस्तकांसाठीच असेल, असे प्रेसने स्पष्ट केले आहे.

धार्मिक जनक्षोभाचा मान राखून एक पाऊल मागे घेण्याचा निर्णय 'ओयूपी'ने २००८ मध्ये भारतातही घेतला होता. पौला चिमन यांचे 'मेनी रामायनाज' आणि विनय धारवाडकर यांचे 'द कलेक्टेड एसेज ऑफ ए. के. रामानुजन' या दोन पुस्तकांच्याविरोधात भारतातील विविध संघटनांनी कोर्टात खटले भरले होते. त्यानंतर या पुस्तकांचे प्रकाशन व वितरण थांबविण्यात आले होते.

''शिक्षणक्रम आणि शिक्षणपद्धतीच्या पुस्तकांसाठी आमची बांधिलकी कायम आहे. आमची पुस्तके सुमारे २०० देशांत विकली जातात. मात्र, सांस्कृतिक संवेदनशीलता देशादेशांत भिन्न असू शकते. तिचाही आदर करायला हवा, अशी आमची प्रामाणिक भूमिका आहे.''

बंधुता साहित्य संमेलन

लेखक शब्दांच्या माध्यमातून भांडतो. विद्रोह करून परिवर्तनाची भाषा बोलू लागतो. त्याला समाजात स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व हवे आहे.

आपल्या आजूबाजूला आज सर्वच क्षेत्रांत प्रचंड उलथापालथ सुरु आहे. अशावेळी बंधुतेची ठिणगी पुन्हा जन्माला येणे आवश्यक आहे, असे मत साहित्यिक उत्तम कांबळे यांनी सोळाव्या राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलन उद्‌घाटनप्रसंगी व्यक्त केले.

यावेळी संमेलनाध्यक्ष डॉ. शरणकुमार लिंबाळे, भाई वैद्य, प्रकाश रोकडे, डॉ. विकास आबनावे, ॲड. प्रमोद गुजर उपस्थित होते.

कांबळे म्हणाले, आजही जातीच्या नावावर निरपराध्यांचे बळी घेतले जात आहेत. स्त्री पुरुष भेदभाव आजही मोठ्या प्रमाणावर पाळला जात आहे. समाजावर आलेल्या या कुरूपतेचा विचार करता बंधुता हे एकमेव उत्तर उपलब्ध असल्याचे दिसून येते.

डॉ. लिंबाळे म्हणाले, ''बंधुता म्हणजे जनतेचे सामाजिक शहाणपण तसेच राष्ट्रीय विवेक. देशात स्थिर सरकार असेल आणि बंधुभाव नसेल तर देश अराजकतेच्या उंबरठ्यावर पोहचू शकतो. बंधुता म्हणजे व्यक्तीची केवळ नैतिक भावना नसून ती सामाजिक आणि राजकीय भावनाही आहे. बंधुतेमुळेच माणसे एकमेकांना न्यायाने वागवत असतात. डॉ. आंबेडकरांनीही बंधुतेलाच सर्वश्रेष्ठ मानले होते.''

उद्धव कानडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले

'विज्ञान कथाविश्व'

आजच्या विज्ञान कथा उद्याच्या वास्तवात परावर्तित होऊ शकतात. मात्र प्रस्थापित विज्ञानाला धक्का देणाऱ्या कथा लिहिणे अयोग्य आहे. अनेकवेळा विज्ञान कथा न वाचताच त्यावर वरवरची टीका करण्यात येते. म्हणूनच आता विज्ञान कथेवर टीका करणाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची गरज आहे, असे मत ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांनी व्यक्त केले.

८८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन संयोजन समितीतर्फे डॉ. नारळीकर यांचे 'माझे विज्ञान कथाविश्व' या विषयावरील व्याख्यान आयोजित केले होते. यावेळी शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा माधवी वैद्य, मंगला नारळीकर, संजय नहार, भारत देसडला आदी उपस्थित होते. नारळीकर यांनी सांगितले की, गेल्या दोन शतकांपासून इंग्रजी साहित्यात विज्ञान कथा हा साहित्य प्रकार रुढ आहे. आपल्याकडे मात्र आजही हा प्रकार रुढ झालेला नाही.

तंत्रशिक्षणाबाबत मुलींसाठी उडान उपक्रम

केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री स्मृती इराणी यांनी नवी दिल्ली येथे एका कार्यक्रमात अभियांत्रिकी अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या मुलींसाठी उडान नावाच्या उपक्रमाची घोषणा केली आहे. या उपक्रमांतर्गत अभियांत्रिकी अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

याच उपक्रमाचा एक भाग म्हणून आयआयटी जेईई प्रवेशपरीक्षांची तयारी करणाऱ्या मुलींसाठी मंत्री इराणी यांच्या हस्ते टॅबलेट पीसीचे वितरण करण्यात आले.

संगणक व टॅबलेट आता एकत्रच

सॉफ्टवेअर क्षेत्रात आघाडीवर असलेल्या मायक्रोसॉफ्ट कंपनीने 'विंडोज टू इन वन' हे इलेक्ट्रॉनिक उपकरण सादर केले आहे. या उपकरणाचा संगणक आणि टॅबलेट अशा दोन्ही प्रकारे वापर करता येणार आहे.

'विंडोज टू इन वन' हे इलेक्ट्रॉनिक उपकरण टॅबलेटसारखे दिसते. परंतु, त्याचा वापर पूर्णपणे संगणकासारखा करता येऊ शकतो. शिवाय, संगणकात असलेल्या सर्व सोईसुविधा यात उपलब्ध आहेत.

'विंडोज टू इन वन'मध्ये विंडोज ८.१ कार्यप्रणाली वापरली असून विंडोज ऑफिसचे एक वर्षासाठी सबस्क्रिप्शन आणि 'वन ड्राइव्ह'वर अमर्यादित स्टोरेज सुविधा पुरवली जाणार आहे. 'विंडोज टू इन वन' हे इलेक्ट्रॉनिक उपकरण एचडीएमआय केबलद्वारे टीव्हीसोबत आणि डोंगलच्या माध्यमातून हेडफोन्स, प्रिंटर, माऊससोबत जोडता येणार आहे.

'फॅन्टम टेरेन्स'द्वारे वायफाय ऐकता येणार

इंटरनेटच्या विश्वात रोज नवनवे प्रयोग सुरू आहेत. यामध्ये आता भर पडली आहे ती वायफाय नेटवर्क ऐकण्याची. भारतात वायफायचे जाळे अद्याप सर्वदूर पसरलेले नाही.

इंग्लंडसारख्या देशात मात्र वायफाय नेटवर्क ऐकण्यावर संशोधन झाले आहे. लंडनमधील विज्ञान लेखक स्वेन यांनी ध्वनी संयोजक डॅनियल जॉन्स यांच्या सहकार्याने 'फॅन्टम टेरेन्स' नावाचे एक सॉफ्टवेअर विकसित केले आहे. हे सॉफ्टवेअर सध्या केवळ आयफोनपुरतेच मर्यादित असून, ते

इन्स्टॉल केल्यावर आयफोनचे सेन्सर हॅक करते. त्यानंतर जवळपास उपलब्ध असलेल्या वायफाय नेटवर्कच्या लहरी पकडण्याचा प्रयत्न करते व लहरींसोबत संबंधित राऊटरचे नाव, त्याचे अंतर, सिग्नलची क्षमता याची माहिती देते. वायफाय कमी क्षमतेचे सिग्नल शोधून त्यांची क्षमता वाढविण्यासाठी आयफोनवरील वायरलेस रिसीव्हरचा वापर करते. ''या सॉफ्टवेअरसाठी सामान्य आऊटपुटपेक्षा अतिरिक्त ध्वनिलहरींचा वापर करावा लागतो. आयफोन युजर या नेटवर्कपासून ठराविक अंतर दूर गेला, तरी त्याला वायफायच्या लहरी ऐकू येतील,'' असे जॉन्स यांनी सांगितले.

छायाचित्रांच्या ट्विट्सना अधिक 'रिट्विट'

सोशल नेटवर्किंग साईट ट्विटरवर छायाचित्रे आणि हॅशटॅग्स असलेल्या ट्विटस अधिक प्रमाणात पुन्हा ट्विट (रिट्विट) होत असल्याचे एका सर्वेक्षणात आढळले आहे. या प्रकारच्या ट्विट ट्विटिवट होण्याची शक्यता नेहमीच्या ट्विटपेक्षा चारपटीने अधिक असल्याचे हे सर्वेक्षण सांगते. केवळ मजकुराचा समावेश असलेल्या ३० टक्के ट्विट रिट्विट केल्या जातात, त्या तुलनेत छायाचित्रे, हॅशटॅग्जचा समावेश असणारी सुमारे ६८ टक्के ट्विट रिट्विट होतात.

डॉ. भवान महाजन यांच्या पुस्तकांचे प्रकाशन

डॉ. भवान महाजन यांनी लिहलेल्या मैत्र जिवाचे-तृतीय आवृत्ती आणि इये गोदेचिये काठी या पुस्तकांचे प्रकाशन माणिकराव देशपांडे व जनार्दन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना माणिकराव देशपांडे यांनी डॉ. भवान यांनी लिहिलेल्या दोन्ही पुस्तकांचे कौतुक केले. आपल्या या विद्यार्थ्यांचे मनापासून कौतुक वाटत असल्याचे उद्‌गार त्यांनी काढले. यावेळी मैत्र जिवाचे पुस्तकाचा हिंदी अनुवाद करणारे अशोक बिंदल, प्रकाशक नंदकिशोर मुळे, श्रीकांत उमरीकर यांनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. चेतन महाजन व डॉ. अमित महाजन यांनी परिचय करुन दिला. डॉ. छाया महाजन यांनी आभार मानले. पुस्तकांमधील सत्यकथांचे अभिवाचन पद्मनाभ पाठक व नीता पानसरे यांनी केले.

५वी आवृत्ती

जावईबापूंच्या गोष्टी

लेखक
द.मा. मिरासदार

किंमत - ६०/-रु.
पोस्टेज -३०/-रु.

जावईबापू म्हणजे राजबिंडेच!
पण त्यांच्या डोक्यात काय भरले होते, कुणास ठाऊक!
कांदे-बटाटे की नर्मदेतले गोटे?
अशा ह्या उडाणटप्पू जावईबापूंचे एकदाचे लग्न झाले.
दिवस पालटू लागले. दिवाळी आली.
आणि जावईबापूंना सासऱ्यांकडून दिवाळसणाचे आमंत्रण आले.
वडिलांनी त्याला सांगितले,
''तू त्यांचा जावई आहेस ना?
दिवाळसण घेण्यासाठी त्यांनी तुला बोलावलं आहे.''
जावईबापूंच्या रिकाम्या डोक्यात एकदम बत्ती पेटली.
आपल्या अकलेचे दिवे तो पाजळू लागला.
वडिलांनी त्याला पढवून-पढवून सासुरवाडीला पाठवले.
त्यानंतरच्या झालेल्या धमाल गोष्टी वाचा –
'जावईबापूंच्या गोष्टी' मध्ये.

'जागतिक मराठी अकादमी'चे अधिवेशन

जागतिक मराठी अकादमीतर्फे दरवर्षी शोध मराठी मनाचा संमेलन घेण्यात येते. निरनिराळ्या देशात वास्तव्य करणाऱ्या आणि आपल्या क्षेत्रात यश मिळवणाऱ्या मराठी माणसांना एकत्र आणून त्यांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्याच हा उपक्रम गेली दहा वर्षे सुरू आहे. या वर्षी दि. २, ३ आणि ४ जानेवारी २०१५ रोजी सातारा येथे हा सोहळा घेण्यात आला. गेली १५ वर्षे सातारा जिल्हा ग्रंथ महोत्सव समितीतर्फेही जानेवारीच्या पहिल्या दुसऱ्या आठवड्यात जिल्हा परिषदेच्या पटांगणावर जिल्हा ग्रंथ महोत्सव घेण्यात येतो.

जागतिक मराठी अकादमीच्या अधिवेशनाला जोडून हा ग्रंथ महोत्सवही घेण्यात आला. या संयुक्त सोहळ्याचे अध्यक्ष म्हणून न्यूयॉर्कमधील भारताचे डेप्युटी काँसल ज्ञानेश्वर मुळे हे येणार होते, परंतु राष्ट्राध्यक्ष ओबामा यांनी भारताच्या प्रजासत्ताकदिनाचे आमंत्रण स्वीकारलेमुळे त्याची तयार करण्याची जबाबदारी मुळे यांच्याकडे आल्यामुळे त्यांना या महोत्सवाला येणे शक्य झाले नाही. त्यामुळे बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष सुनील सूर्यवंशी यांची अध्यक्षपदी निवड केली गेली. ग्रंथदिंडी झोकात निघाली, नंतर उद्घाटनाचा कार्यक्रम. जागतिक मराठी अकादमीचे अध्यक्ष रामदास फुटाणे यांनी प्रास्ताविक केले. भारती विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रा. शिवाजीराव कदम यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

ऑस्ट्रेलियाचे विजय जोशी, अमेरिकेचे अजित नेरुरकर, इस्त्राईलचे नोहा मस्सिल वगैरेंच्या मुलाखती नितीन केळकर आणि रामदास फुटाणे यांनी घेतल्या. सुविख्यात अभिनेते प्रशांत दामले यांच्या मुलाखतीनेही रसिकांना मंत्रमुग्ध केले. एलिझाबेथ एकादशी या चित्रपटातील सायली भांडारकवठेकर आणि पुष्कर लोणारकर या बालकलाकारांना शशी भालेकर यांनी बोलते

केले. या दोघांनी चित्रीकरणाच्या दरम्यान घडलेल्या गंमतीजंमती सांगितल्या. अभिनेत्री अमृता विश्वास यांनीही वेळात वेळ काढून रसिकांशी संवाद साधला. त्या मूळ सातारच्याच. म्हणजे रहिमतपूरच्या.

३ जानेवारीला सुप्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे यांची विस्तृत मुलाखत झाली. दक्षिण भारतातील सिनेक्षेत्रात या सातारकर नटाने आपले फॅन्स लाखोंनी मिळवले आहेत.

ईश्वर डॉट कॉम या विश्राम गुप्ते लिखित कादंबरीवर रावसाहेब कसबे, जयराज साळगावकर, राजन खान यांनी आपापली मते मांडली. लेखक विश्राम गुप्ते यांनीही मनोगत व्यक्त केले.

साहित्य संमेलन : काल, आज आणि उद्या या विषयावर यशवंतराव गडाख, भारत देसडला वगैरेंनी विचार मांडले. लंडन येथील मीना प्रभू आणि अमेरिकेतील श्रीनिवास ठाणेदार यांनी लेखक आपल्या भेटीला या कार्यक्रमात प्रवास लेखन आणि परदेशातील भारतीयांबद्दलचे अनुभव सांगितले.

चित्रकार प्रभाकर नाईक-साटम यांनी जपानमधील पंचतारांकित हॉटेल्समध्ये स्वतंत्र शैलीतील चित्रे काढून अनेक मानसन्मान मिळवले आहेत. त्याबद्दल सतीश भावसार यांनी त्यांची मुलाखत घेतली. नंतर चित्र-शिल्प-काव्य यांचा एक अभिनव कार्यक्रम झाला. अरुण म्हात्रे, अशोक नायगावकर, नारायण सुमंत, विजय चोरमारे, महेश केळुस्कर वगैरे कवींनीही आपली करामत दाखवली.

रविवार, दि. ४ जानेवारी रोजी यशवंतराव गडाख-पाटील यांच्या हस्ते समारोप झाला. पी. सावळाराम यांच्या जन्मशताब्दीनिमित्त कलासरगमने गंध स्वरांचा हा त्यांच्या निवडक गीतांचा कार्यक्रम प्रस्तुत केला.

सोमवारी माझे आवडते पुस्तक आणि कथाकथन या कार्यक्रमात मुलामुलींनी आपले भावविश्व खुले केले. सायंकाळी स्वरनिनाद, कोल्हापूर निर्मित सत्यम् शिवम् सुंदरम् या मराठी-हिंदी आनंद गीतांचा कार्यक्रम प्रा. सुरेश शुक्ला यांनी सादर केला.

ग्रंथप्रदर्शनात एकूण १०० स्टॉल उभारण्यात आले होते. मेहता पब्लिशिंग हाऊस, संस्कृती, राजहंस, डायमंड, साकेत, नवनीत, शुभम, पाटील, ज्ञानगंगा , तेजज्ञान, साहित्य अकादमी, दहावी दिवाळी, धुळेकर वगैरे प्रकाशक आणि पुस्तक विक्रेत्यांची नवनवीन पुस्तके पाहण्यासाठी

हजारो सातारकरांची तुंबळ गर्दी उसळली होती. पुस्तकांची विक्रीही मोठ्या प्रमाणावर झाली.

ग्रंथ महोत्सव आणि जागतिक मराठी अकादमी या दोन्ही संस्थांच्या उत्साही कार्यकर्त्यांनी वैविध्यपूर्ण कार्यक्रमांची रेलचेल उडवून दिल्याने सातारकरांना साहित्य, नाट्य, नृत्य, चित्रपट, चित्र, शिल्प यांचा आस्वाद घेण्याची संधी मिळाली.

मराठी माणूस देशोदेशी जात आहे. आपल्या कर्तृत्वाने, बुद्धीने, परिश्रमाने त्या त्या देशात मानाचे स्थान मिळवत आहे. त्या यशोगाथांमुळे उत्तुंग ध्येयाचा वसा कळत नकळत सर्वांच्याच मनीमानसी रुजला गेला.

'प्लेईंग इट माय वे' चे प्रकाशन

मास्टरब्लास्टर सचिन तेंडुलकरच्या 'प्लेईंग इट माय वे' या आत्मचरित्राचाचे नुकतेच प्रकाशन झाले. यावेळी सचिनसह भारतीय क्रिकेटमधील महान फलंदाज राहुल द्रविड, सौरभ गांगुली, व्ही. व्ही. एस. लक्ष्मण यांनीही आपल्या चाहत्यांशी दिलखुलास संवाद साधला. 'मेहता पब्लिशिंग हाऊस'तर्फे लवकरच 'प्लेईंग इट माय वे' चा मराठी अनुवाद प्रकाशित केला जाणार आहे. सचिनचे चाहते त्या पुस्तकाची अगदी आतुरतेने वाट पाहत आहेत.

६वी आवृत्ती

अबोली

लेखक
वि.स. खांडेकर

किंमत - ८०/-रु.
पोस्टेज -३०/-रु.

'...कथाबीजं दाही दिशांनी मनात येऊन पडतात. प्रत्यक्ष अनुभवलेल्या एखाद्या भावनेच्या छटेपासून तो सहजगत्या कानांवर पडलेल्या एखाद्या चार-दोन ओळींच्या घटनेपर्यंत.

अशा अनेक अनुभवांत कथाबीजं लपलेली असतात; पण ती सारीच फुलवण्याचं सामर्थ्य पुष्कळांच्या अंगी नसतं.

मीही त्याला अपवाद नाही. झोपलेलं माणूस एकदम काही तरी टोचल्यामुळं जागं व्हावं, त्याप्रमाणं ज्या अनुभूतीनं संवेदना सचेतन होते आणि कल्पना, भावना आणि विचार यांच्या त्रिवेणी संगमानं न्हाऊ लागते, तीच पुढं स्वत:ला हवं तसं कथारूप धारण करू शकते.

अशा रीतीनं गेली पन्नास वर्षं मी कथापंढरीचा वारकरी राहिलो आहे. पहिल्या दहा-वीस वर्षांत मी तरुण वारकरी होतो. चालण्यात काय किंवा अभंग आळवण्यात काय, माझ्या ठिकाणी दुर्दम्य उत्साह होता. आता त्या उत्साहाची अपेक्षा करणं सृष्टिक्रमाला धरून होणार नाही. तथापि, गेल्या काही वर्षांत ज्यांचा कथारूपानं माझ्या हातून आविष्कार झाला, असे काही अनुभव या संग्रहात प्रतिबिंबित झाले आहेत...

या संग्रहातील कथांनी कुणाचं थोडं सात्त्विक रंजन केलं, कुणाला थोडा वाङ्मयीन आनंद दिला, एखाद्याला त्यात दिलासा सापडला, तर त्या लिहिताना मला जो आनंद झाला, तो केवळ वैयक्तिक नव्हता, या जाणिवेनं माझं लेखन सफल झालं, असं मी मानेन.'

१५वी आवृत्ती

दोन मने

लेखक
वि.स. खांडेकर

किंमत - २००/-रु.
पोस्टेज -३०/-रु.

‘‘माणसाला दोन मनं असतात, बाळासाहेब!
एक पशूचं आणि एक देवाचं.
पहिलं मन उपभोगात रमून जातं,
दुसरं त्यागात आनंद मानतं!
पहिल्याला शरीराच्या सुखापलीकडे काहीच दिसत नाही.
दुसऱ्याला सुखापलीकडे असणाऱ्या उदात्ततेचा साक्षात्कार होतो.
या दोन मनांतल्या पहिल्याला निसर्गानं आपलं सारं सामर्थ्य दिलं आहे.
दुसरं त्या मानानं फार दुबळं असतं.
या दुसऱ्या मनाचं बळ वाढवणं, दोन्ही मनांचं बळ सारखं करून
जीवन सुखानं जगणं आणि जगता जगता त्याचा विकास करणं,
हे यशस्वी आयुष्याचं खरं लक्षण आहे.
पण मनुष्याच्या आयुष्यात या दोन मनांचा झगडा नेहमीच सुरू असतो.
या झगड्यात ज्यांचं दुसरं मन विजयी होतं, ते कुठल्याही संकटाला
हसत तोंड देतात.
पण पहिल्या मनाच्या आहारी गेलेला माणूस दुबळा होत जातो,
मोहांना बळी पडतो, जिवलग माणसांशीही प्रतारणा करू लागतो,
आणि मग...’’

वाचकांसाठी सुवर्णसंधी!

WORDPOWER

Books | Toys | Stationery | Music | Movies | Games

बेळगाव / कोल्हापूर / औरंगाबाद

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक, मूव्ही, गेम्स अन्यही
बरेच काही आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे.
सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

बेळगाव, कोल्हापूर, औरंगाबाद येथील वर्डपॉवरचा पत्ता पुढीलप्रमाणे
पहिला मजला, भंडारी कॅपिटल, कॉसमॉस बँकेच्या वर, खानापूर रोड,
टिळकवाडी, बेळगाव-५९०००६. टेलिफोन क्र. (०८३१)-४२००६७६
शॉप नं १, ग्राऊंड फ्लोअर, अथर्व एम्पाअर, ताराबाई पार्क,
कोल्हापूर-४१६००३. टेलिफोन क्र.(०२३१)-६६१७६२५/२६
शॉप नं. - जी/१५, प्रोझन मॉल, चिखल ठाणा, एमआयडीसी,
औरंगाबाद - ४३१००६.

अधिक माहितीसाठी
www.wordpowerbookshop@gmail.com
येथे संपर्क साधा.

वाचकांना आवाहन

मेहता मराठी ग्रंथजगत वाचकांना त्यांच्यातील लेखन कौशल्याचा शोध घेण्याची संधी देत आहे. जर आपणाकडे आतापर्यंत अप्रकाशित असणारे साहित्यविषयक लिखाण असेल तर ते सुवाच्च अक्षरात लिहून आमच्याकडे पाठवावे. योग्य लिखाणास ग्रंथजगतच्या अंकात संधी देण्यात येईल.

-संपादक

‘आणि विक्रमादित्य हरला’ कथासंग्रहास पुरस्कार

पुणे मराठी ग्रंथालयाच्या वतीने दिला जाणारा राजेंद्र बनहट्टी पुरस्कार स्वाती चांदोरकर लिखित ‘आणि विक्रमादित्य हरला’ या कथासंग्रहास प्रदान करण्यात आला. मेहता पब्लिशिंग हाऊसकडून हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे. पुणे येथील सुविचार प्रकाशनाने दिलेल्या देणगीतून राजेंद्र बनहट्टी पुरस्कार देण्यात येतो.

‘आठवणींचे मोती’ला अनंत फंदी साहित्य पुरस्कार

संगमनेर येथील इतिहास संशोधन मंडळाच्या वतीने दिला जाणारा कवी अनंत फंदी साहित्य पुरस्कार डॉ. विनया धारवाडकर यांनी अनुवादित केलेल्या आठवणींचे मोती (पर्ल्स ऑफ चाईल्डहूड) या पुस्तकास जाहीर झाला. मेहता पब्लिशिंग हाऊसकडून हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे. या पुरस्कारासाठी महाराष्ट्रासह गोवा व कर्नाटक राज्यातील ३१७ लेखक व कवींनी आपले साहित्य पाठवले होते. रोख रक्कम, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

‘आणि विक्रमादित्य हरला’स साहित्य परिषदेचा पुरस्कार

मराठी साहित्य परिषदेच्यावतीने उत्कृष्ट कादंबरीसाठी दिला जाणारा विद्याधर पुंडलीक पुरस्कार स्वाती चांदोरकर लिखित ‘आणि विक्रमादित्य हरला’ या कथासंग्रहास प्रदान करण्यात आला. मेहता पब्लिशिंग हाऊसकडून हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे. माधुरी वैद्य यांनी या पुस्तकाचे परीक्षण केले. भानू काळे यांच्याहस्ते चांदोरकर यांना पुरस्काराचे वितरण करण्यात आले. माधुरी वैद्य यांनी पुस्तकाचे विश्लेषण करुन सांगितले. मराठी साहित्य परिषदेच्या पायगुडे यांनी पुरस्काराविषयी माहिती दिली.

यावेळी साहित्य परिषदेचे पदाधिकारी, लेखक, वाचक उपस्थित होते.

अरुण साधू यांना जनस्थान पुरस्कार

नाशिक येथील कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे दिल्या जाणाऱ्या जनस्थान पुरस्कारासाठी ज्येष्ठ साहित्यिक व पत्रकार अरुण साधू यांची निवड करण्यात आली आहे. प्रतिष्ठानचे अध्यक्ष व ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांनी याबाबत घोषणा केली. वि. वा. शिरवाडकर यांच्या जयंती दिनी २७ फेब्रुवारी रोजी नाशिक येथे हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल. हा पुरस्कार दर दोन वर्षांनी प्रदान करण्यात येतो. आतापर्यंत विजय तेंडुलकर, विंदा करंदीकर, इंदिरा संत, गंगाधर गाडगीळ, व्यंकटेश माडगूळकर, श्री. ना. पेंडसे, मंगेश पाडगावकर, नारायण सुर्वे, बाबुराव बागूल, ना. धों. महानोर, महेश एलकुंचवार, भालचंद्र नेमाडे यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे.

नौशाद यांना रफी पुरस्कार

संगीतकार नौशाद यांना मोहमंद रफी फाउंडेशनतर्फे सहायक पोलिस आयुक्त अरविंद पाटील यांच्या हस्ते 'मोहंमद रफी पुरस्कार' देण्यात आला.

नौशाद यांचे चिरंजीव राजू नौशाद यांनी हा पुरस्कार स्वीकारला. संगीत ही ईश्वराची सेवा आहे. सर्व जातीपंथांच्या घटकांना एकत्र आणण्याचे सामर्थ्य संगीतात आहे असे मत राजू नौशाद यांनी या वेळी व्यक्त केले. शाहीर दादा पासलकर, डॉ. मिलिंद भोई, इक्बाल दरबार, माधव जोशी, प्रताप निकम उपस्थित होते. त्यानंतर नौशाद व रफी यांच्यावर आधारित 'अंदाज-ए-रफी' हा कार्यक्रम सादर करण्यात आला. दीपा पेंडसे, हृषिकेश जोशी, जहीर दरबार आदी कलाकार सहभागी झाले होते.

उत्तम कांबळे यांना वागयज्ञे साहित्य पुरस्कार

साहित्यिक कलावंत प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा 'वागयज्ञे साहित्य व कलागौरव' पुरस्कार राजदत्त आणि 'सकाळ'चे संचालक-संपादक उत्तम कांबळे यांना १४ व्या साहित्यिक कलावंत संमेलनात डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

राजदत्त म्हणाले, ''माणसाला केंद्रबिंदू मानून आणि कला निर्माण झाली पाहिजे. जीवन कसे जगावे आणि संकट, प्रलोभनांना कसे तोंड देता येईल,

याची शिकवण देणारे साहित्य असायला हवे.

''कांबळे म्हणाले, ''वेदना आणि प्रतिभा यांचा संगम म्हणजे साहित्य. असंख्य शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्यानंतरही एखादी कादंबरी जन्माला येत नाही.''माणसाचे हरवलेले माणूसपण मिळवून देण्याचे काम साहित्यातून झाले पाहिजे. कारण साहित्य हा जगण्याचाच भाग आहे'' अशी भावना डॉ. मोरे यांनी व्यक्त केली.

मधुसूदन झंवर यांना नेत्रसेवा पुरस्कार

पुणे नेत्रतज्ज्ञ संघटनेच्या वार्षिक परिषदेत डॉ. मधुसूदन झंवर यांना डॉ. मंदार परांजपे यांच्या हस्ते नेत्रसेवा पुरस्कार देण्यात आला. परिषदेस पालकमंत्री गिरीश बापट प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. हा पुरस्कार लोकसेवा आणि संघटनेसाठी केलेल्या कामासाठी दिला जातो.

अरुण खोरे यांना जीवन गौरव पुरस्कार

रुक्मिणी कुंडळ चॅरिटेबल ट्रस्टसारख्या सामाजिक क्षेत्रात झटणाऱ्या संस्थांचे कार्य मोलाचे आहे. ट्रस्टचा 'जीवनगौरव पुरस्कार' ज्येष्ठ पत्रकार अरुण खोरे यांना डॉ. सप्तर्षी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

अकरा हजार रुपये, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. जीवनगौरव पुरस्कार दिल्याने माझी पत्रकारिता, साहित्य, लेखनाला न्याय मिळाला, अशी भावना खोरे यांनी या वेळी व्यक्त केली.

वाहरू सोनवणे यांना जीवनगौरव पुरस्कार

''माणूस शिकला म्हणजे सुधारला असे होत नाही. शिक्षणामुळे त्याची मानसिकता बदलली पाहिजे.'' असे मत राज्यातील श्रमिक संघटनेचे अध्यक्ष वाहरू सोनवणे यांनी व्यक्त केले.

आदिवासी सामाजिक विकास संस्थेतर्फे त्यांना ठकाजी गांगड आला यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. आदिवासी संशोधन प्रशिक्षण संस्थेचे आयुक्त संभाजी सरकुंडे, अन्न व औषध द्रव प्रशासनाच्या पुणे विभागाचे सहआयुक्त शशिकांत केकरे, तळोदा येथील अतिरिक्त जिल्हाधिकारी शुक्राचार्य दुधाळ, महापालिकेच्या सहआयुक्त संध्या गागरे आणि डॉ. श्रीपाल सबनीस व्यासपीठावर उपस्थित होते. या वेळी डॉ. संजय लोहकरे आणि

देवदत्त चौधरी यांना डॉ. गोविंद गारे साहित्यरत्न पुरस्कार तसेच, राजश्री काळे यांना वीरराणी झलकारी शौर्य पुरस्काराने गौरविण्यात आले.

सोनवणे म्हणाले, ''आजची शिक्षणपद्धती माणसाला शिक्षण देते, पण शहाणपण आणि ज्ञान देत नाही. त्यामुळे त्याला आकडेमोड आली म्हणजे तो सुधारला असे म्हणता येत नाही. त्याची मानसिकता बदलली पाहिजे. आपण मिळविलेल्या ज्ञानाचा समाजाच्या विकासासाठी वापर केला पाहिजे.''

भारती विद्यापीठाचा पदवीप्रदान समारंभ

''शोध कोणी लावला, यापेक्षा त्या शोधामुळे कोणते नवीन ज्ञान समाजाला मिळाले, समाजाला त्याचा काय फायदा झाला, हे अधिक महत्त्वाचे. पैसा, प्रतिष्ठा, पुरस्कार याचा विचार न करता संशोधन करत राहा. तुम्ही जगातील उपलब्ध ज्ञानात कोणती भर घालू शकता हे पाहा. त्यासाठी सर्वोत्तम योगदान द्या. पैसा प्रतिष्ठा, पुरस्कार मागोमाग येतीलच,'' असा कानमंत्र इस्त्रायलच्या नोबेलविजेत्या शास्त्रज्ञ प्रा. अदा योनाथ यांनी भारती विद्यापीठाच्या १६ व्या पदवीप्रदान सोहळ्यात दिला. विद्यापीठाचे कुलपती डॉ. पतंगराव कदम, कुलगुरू प्रा. डॉ. शिवाजीराव कदम, कुलसचिव डॉ. जी. जयकुमार आणि विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता या वेळी उपस्थित होते. या समारंभात ५,५२२ स्नातकांना पदवी देण्यात आली. डॉ शिवाजीराव कदम यांनी २९ विद्यार्थ्यांना सुवर्णपदके आणि पीएचडी पदवी प्रदान केल्याची माहिती दिली.

घरची परिस्थिती बेताचीच... त्यातच वडिलांचे अकाली निधन झाल्याने करावे लागलेले स्थलांतर... मग लहान वयातच शाळेसह काही ठिकाणी काम करून घेतलेले शिक्षण... संशोधनाच्या सुरुवातीला अनेकांकडून झालेली हेटाळणी... अपुऱ्या सुविधा... अशा परिस्थितीतही जिद्द न हरता केलेले संशोधन आणि मग नोबेलसहित जगभर मिळालेला सन्मान... इस्त्रायलच्या नोबेलविजेत्या शास्त्रज्ञ प्रा. अदा योनाथ यांचा हा खडतर जीवनप्रवास.

''एक्स-रे क्रिस्टलोग्राफीचे संशोधन करत असताना अनेकांनी माझी हेटाळणी केली. स्वच्छतागृहाचाच एक भाग असलेल्या, खिडकी नसलेल्या अंधाऱ्या खोलीत काही वर्षे संशोधन केले. तेव्हाही माझी हेटाळणी सुरू होतीच; परंतु शेवटी १५ वर्षांच्या मेहनतीनंतर मी माझ्या संशोधनाचे महत्त्व

जगाला पटवून देऊ शकले. आता माझी हेटाळणी होत नाही. नोबेल विजेती शास्त्रज्ञ म्हणून जगभर सन्मान मिळतो,'' असे प्रा. योनाथ यांनी नमूद केले.

प्रा. योनाथ म्हणाल्या, 'जीवनातील विविध गोष्टींबाबत त्यांच्या मनामध्ये कुतूहल निर्माण होणे आवश्यक आहे. त्यांना विविध प्रश्न विचारा, त्याची उत्तरे आम्हाला माहीत नाहीत, असे न सांगता, त्यांना ती उत्तरे शोधायला सांगा. स्वत: प्रयोग, संशोधन करून त्यांनी उत्तरे शोधल्यास त्यांना आपोआप विज्ञानाची गोडी लागेल. विद्यार्थ्यांवर कोणतीही सक्ती न करता त्यांना त्यांच्या इच्छेनुसार मूलभूत विज्ञान शाखा किंवा इंजिनिअरिंग, मेडिकल कोठेही शिक्षण घेता यायला हवे. प्रत्येक क्षेत्रात संशोधन आणि करिअरच्या संधी आहेत. प्रत्येकाने आपल्या आवडीनुसार योग्य त्या क्षेत्रात झोकून देऊन काम करावे,' असेही त्यांनी स्पष्ट केले.

अशोक सुरवसे यांना पुरस्कार

डॉ. शंकरराव चव्हाण विकास पत्रकारिता पुरस्कार 'साम' टीव्हीचे कार्यकारी संपादक अशोक सुरवसे यांना प्रदान केला. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, समीक्षा, मंथन क्रिएटिव्ह व मीमांसा फाउंडेशनच्या वतीने देण्यात येणाऱ्या पुरस्कारांचेही वितरण करण्यात आले. डॉ. शंकरराव चव्हाण विकास पत्रकारिता पुरस्कार कंधारचे सचिन मोरे यांना तर सुधाकरराव डोईफोडे प्रेरणादायी पुरस्कार अभिनंदन थोरात यांनी प्रदान केला.

लोकमान्य टिळक पत्रकारिता पुरस्कार

वृत्तपत्रसमूहाचे 'जन्मभूमी'चे संपादक कुंदन व्यास यांना संपादक डॉ. दीपक टिळक यांच्या हस्ते 'लोकमान्य टिळक राष्ट्रीय पत्रकारिता पुरस्कार' प्रदान करून गौरवण्यात आले, पुण्याचे पालकमंत्री गिरीश बापट, पिंपरी-चिंचवडच्या महापौर शकुंतला दराडे, पुण्याचे उपमहापौर आबा बागुल, 'लोकमान्य - एक युगपुरुष' या चित्रपटाचे दिग्दर्शक ओम राऊत, अभिनेते सुबोध भावे, 'केसरी'च्या विश्वस्त प्रणिती टिळक, रोहित टिळक, कार्यकारी संपादक सुकृत खांडेकर या वेळी उपस्थित होते. माध्यमांसाठी विश्वासार्हता सर्वांत महत्त्वाची आहे असे सांगून व्यास म्हणाले, ''आता पत्रकारिता केवळ मुद्रित माध्यमांपुरतीच राहिलेली नसून सोशल माध्यमांपर्यंत तिचा विस्तार वाढला आहे. तरी सोशल माध्यमांमुळे मुद्रित माध्यमे कालबाह्य होणार

११वी आवृत्ती

चौघीजणी

मूळ लेखिका
लुइसा मे अल्कॉट

अनुवाद
शान्ता ज. शेळके

किंमत - ४००/-रु.
पोस्टेज -३०/-रु.



मुग्ध शैशवातली कोवळी सुखदु:खे .....

लुइसा मे अल्कॉट या ख्यातनाम अमेरिकन लेखिकेची 'लिटल् वुइमेन' ही कादंबरी अठराशे अडुसष्ट साली प्रथम प्रकाशित झाली. प्रसिद्धीबरोबरच तिला अभूतपूर्व लोकप्रियता लाभली. अनेक भाषांमधून ती अनुवादित झाली आहे. हॉलिवुडने तिच्यावर दोन वेळा चित्रपटही काढले आहेत.

'लिटल् वुइमेन' ही अमेरिकेतल्या 'मार्च' कुटुंबाची –

विशेषत: त्यातल्या मेग, ज्यो, बेथ आणि ॲमी या चार बहिणींची – कहाणी आहे. या व्यक्तिरेखा लेखिकेने आपण व आपल्या बहिणी यांच्यावरूनच बहुतांशी रंगवल्या आहेत. शेजारचे वृद्ध लॉरेन्स आजोबा आणि त्यांचा देखणा प्रेमळ नातू लॉरी यांनी या कथेत आणखी अनोखे रंग भरले आहेत.

हे एक अतिशय हृद्य आणि विलोभनीय असे कुटुंबचित्र आहे.

एकमेकींपासून स्वभावाने अगदी वेगळ्या असलेल्या मार्च बहिणींचे परस्परांवरील उत्कट प्रेम, त्यांच्या आशा-आकांक्षा, कोवळी सुखदु:खे, भविष्याची स्वप्ने याचे हे कधी विनोदी, तर कधी हृदयस्पर्शी असे चित्रण आपल्या साध्या सच्चेपणामुळे वाचकाला थेट अखेरपर्यंत गुंतवून ठेवते...

नाहीत. पूर्वी एखादी वाईट गोष्ट वृत्तपत्रात छापून येईल याची भीती ती करणाऱ्यांना असे, आता ती भीती उरलेली नाही. मोठी वृत्तपत्रे आज खासगी व्यवहारांमध्ये अडकलेली दिसतात. पूर्वी वृत्तपत्रांमध्ये बातम्यांची स्पर्धा होती, आज ती स्पर्धा अधिक जाहिराती मिळवण्याची आणि खप वाढवण्याची आहे. आपण आपल्याच क्षेत्राचे नुकसान करत नाही ना याचे आत्मपरीक्षण माध्यमांनी करावे. या परिस्थितीत 'ट्रस्ट'ने चालवलेल्या वृत्तपत्रांनी विश्वासार्हता टिकवली आहे.'' 'माध्यमांवरील 'सेन्सॉरशिप'चा फटका नेहमी मुद्रित माध्यमांनाच बसतो, इलेक्ट्रॉनिक माध्यमांना चाप कोण लावणार,' असा सवालही व्यास यांनी उपस्थित केला.

'प्रगतीचा विचार संस्कृतीच्या माध्यमातून करायला हवा'

''सध्या होणारी प्रगती ही शस्त्र आणि शास्त्राची आहे. मात्र, प्रगतीचा विचार संस्कृतीच्या माध्यमातून करायला हवा,'' असे मत ज्येष्ठ रंगकर्मी अशोक हांडे यांनी व्यक्त केले.

उत्कर्ष नागरी विकास संस्थेच्या वतीने ज्येष्ठ रंगकर्मी श्रीकांत मोघे यांच्या हस्ते हांडे यांना साहेब पुरस्कार प्रदान करण्यात आला. महापौर दत्तात्रय धनकवडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते अंकुश काकडे, संस्थेचे सुरेश बांदल, रंजना हांडे, डॉ. वीणा व विजय देव आदी या वेळी उपस्थित होते.

हांडे म्हणाले, ''कोणताही कार्यक्रम कलाकाराच्या मोठेपणावर नाही, तर प्रेक्षकांच्या आश्रयावर अवलंबून असतो. समाजाच्या प्रोत्साहनाशिवाय कलाकार मोठा होऊ शकत नाही. कोणत्याही कामात रंजन असते आणि मनोरंजन प्रबोधन असते.''

''वाऱ्यावरची वरात' मधून पु.ल. देशपांडे यांनी अस्सल मराठी संस्कृतीचे दर्शन घडवले. अशोक हांडे त्याही पुढे गेले आहेत. आता त्यांनी हिंदी, इंग्रजीतून मराठी संस्कृती जगभरात पोहोचवावी. भारतीय संस्कृतीचे प्रतिनिधित्व मराठीने करावे'' अशी अपेक्षा मोघे यांनी व्यक्त केली.

नाशिकमध्ये दीपस्तंभ पुरस्काराचे वितरण

सध्या विविध माध्यमांवरही उच्चभ्रू समाजाचा मोठ्या प्रमाणावर पगडा दिसून येत आहे. या अन्यायाला वाचा फोडणाऱ्यांचा आवाज मात्र कुठेतरी क्षीण होताना दिसतो. मुद्रित माध्यमांमध्ये मात्र अजूनही वंचितांच्या प्रश्नांना

स्थान दिले जाते याबद्दल लेखक आणि विचारवंत डॉ. अच्युत गोडबोले यांनी समाधान व्यक्त केले.

नाशिक येथील कॉम्रेड नरेंद्र मालुसरे चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने दिले जाणारे दीपस्तंभ पुरस्कार गोडबोले यांच्या हस्ते नाथा शिंगाडे, विजय पवार, प्रशांत पवार, रेणू दांडेकर आदींना देण्यात आले. यावेळी आमदार जीवा गावीत, जयंत जायभावे, अनुराधा मालुसरे, संजय मालुसरे, जयंत जायभावे आदी उपस्थित होते.

पठ्ठे बापूराव प्रतिष्ठानचे पुरस्कार

पठ्ठे बापूराव प्रतिष्ठान व सांस्कृतिक कला मंडळ यांच्या वतीने देण्यात येणाऱ्या पुरस्काराचे वितरण उल्हास पवार यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी आमदार योगेश टिळेकर, विकास रासकर, सत्यजित खांडगे, विद्या वैद्य, श्रीधर जिंतीकर, गणपत दगडे, जयप्रकाश वाघमारे, शहाजी पाटील, किरण गोटे, योगेश सासणे आदी उपस्थित होते. लावणी नृत्यांगना ज्योत्स्ना जावळेकर यांना शाहीर पठ्ठे बापूराव पुरस्कार देण्यात आला. सुरेख गांगवे यांना डॉ. भास्करराव खांडगे पुरस्कार, शाहीर हेमंतराजे मावळे यांना तमाशा साहित्यिक बापूसाहेब जिंतीकर पुरस्कार देण्यात आला.

हरिहरन यांना आशा भोसले पुरस्कार

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पिंपरी चिंचवड शाखेतर्फे दिला जाणारा आशा भोसले पुरस्कार प्रसिद्ध पार्श्वगायक आणि संगीतकार हरिहरन यांना देण्यात आला. विविध मान्यवरांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. नाट्य परिषद शाखा आणि सिद्धिविनायक ग्रुप यांच्यावतीने २००२ पासून या पुरस्काराचे वितरण संगीत क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या मान्यवरांना करण्यात येते. आतापर्यंत लता मंगेशकर, संगीतकार खय्याम, रवींद्र जैन, बप्पी लाहिरी, प्यारेलाल, आनंद, हृदयनाथ मंगेशकर, उषा मंगेशकर, अनू मलिक, शंकर महादेवन, पं. शिवकुमार शर्मा, सुरेश वाडकर यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

८वी आवृत्ती

मध्यरात्रीचे पडघम

लेखक
रत्नाकर मतकरी

किंमत - १४०/-रु.
पोस्टेज -३०/-रु.



'तुम्ही पाहिलं असेल बघा त्यांना. ते हो - गुळगुळीत टक्कल. अगदी तुळतुळीत काळ्या गोट्यासारखा चेहरा! पोपटाच्या चोचीसारखं नाक! आणि डोळे... अगदी रोखून पाहणारे डोळे! मला तर त्यांच्या डोळयांची भीतीच वाटते...

...त्या दिवशी, रात्रीची गोष्ट. मी डॅडींच्या जवळ झोपलो होतो आणि एकदम मला जाग आली. सगळं घर हादरत होतं. झांजा वाजत होत्या. कोणीतरी पडघमवर 'धम धम' वाजवत होतं. त्याच 'धम धम धम' तालात सगळं घर हलत होतं. मग सगळं एकाएकी थांबलं. एक 'गूंऽऽ' असा भुंग्यासारखा आवाज यायला लागला. मग पुन्हा 'धम धम' वाजायला लागलं.

मला फारच भीती वाटायला लागली. तेव्हा मी डॅडींना हलवून उठवायला लागलो... आणि एकदम लक्षात आलंः मी कुणाला हलवतोय? बिछान्यात आहेच कोण? बिछाना रिकामा - डॅडी जवळ नाहीतच. मी एकटाच! काळोख... आणि 'धम धम' वाजतंय. मी भयंकर घाबरून किंकाळी फोडली...' ओळखीच्या - बिनओळखीच्या वातावरणांमध्ये उमटणारी अकल्पित भयाची ही वलये... गारठून टाकणारी... काल्पनिक असूनही अतिशय खरीखुरी. कदाचित कधीच प्रत्यक्ष न अनुभवलेली... तरीही मनात खोल कुठेतरी दडून बसलेली भीती... तिचे पडघम वाजू लागतील या कथा वाचताना. तो आवाज कान देऊन ऐका... तुमच्या मनात आजवर सीलबंद करून ठेवलेल्या त्या भीतीचा निचरा झाल्याशिवाय राहणार नाही.

आपणच मनात दडवून ठेवलेल्या गूढाशी, अत्यंत तरलपणे आपली ओळख करून देणाऱ्या, एका श्रेष्ठ कथाकाराच्या, मंत्रमुग्ध करणाऱ्या कथांचा हा संग्रह.

पु. शि. रेगे ह्यांची 'सावित्री'

पु. शि. रेगे ह्यांची 'सावित्री' म्हणजे मराठी कादंबरी विश्वातला अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. ही कादंबरी म्हणजे एक तरल आणि उत्कट असे गद्यकाव्य आहे. १९६२ साली प्रसिद्ध झालेल्या ह्या कादंबरीत पत्रात्मक कादंबरी हा प्रयोग पु.शि. रेगे ह्यांनी केला आहे. पत्रांमधून सावित्रीने आपले तरल भावविश्व काव्यात्म पातळीवर हलकेच उलगडले आहे. ह्या पत्रांमधून सूचकतेवर भर देत, आपले अंतरग प्रकट करीत, सावित्रीने आपल्या प्रियकराशी संवाद साधला आहे. कादंबरीतली एकोणचाळीस पत्रे, तिच्या विकसित होत जाणाऱ्या प्रगल्भ जाणीवांना हलकेच स्पर्श करीत, एक तरल काव्यभारले स्त्रीमन प्रगट करीत जातात. राधेने जसे कृष्णावर उत्कट प्रेम केले तसे सावित्रीने आपल्या प्रियकरावर केवळ प्रेमच केले आहे. राधा जशी कृष्णमय झाली होती तशी सावित्री आपल्या प्रियकराच्या अस्तित्वात पूर्णपणे विरघळून गेलेली होती. राधेची तृप्ती आणि सावित्रीची तृप्ती ही एकाच आध्यात्मिक विचारधारेची शृंखला आहे. एकनिष्ठ प्रेमाचा अतिउत्कट आविष्कार आहे. पहिल्याच पत्राचा शेवट करतांना सावित्री सहजपणे लिहून जाते की, ''मोर हवा तर आपणच मोर व्हायचं. जे जे हवं ते ते आपणच व्हायचं...''

सावित्रीचे मन समजून घेत, ती आपली ओळख पत्रांमधून जेवढी करून देते, तेवढ्याच आधारावर सावित्रीमय होऊन तिच्या स्वप्नमयी आयुष्याचा आपण एक भाग झाल्याशिवाय, सावित्री ही व्यक्तिरेखा आपल्या जाणीवेच्या कक्षेत येणे काहीसे कठीण आहे.

आपण जोपर्यंत काव्यात्म पातळीवर, आध्यात्मिक उंची गाठत स्वत:

प्रगल्भ होत नाही तोपर्यंत सावित्रीची प्रगल्भ जाणीव कक्षा आपण त्या समरसतेने अनुभवू शकत नाही. भारतीय अद्वैत तत्त्वज्ञानाची प्रसन्न बैठक लाभल्याशिवाय सावित्री ही अत्यंत संवेदनशील व्यक्तिरेखा आपल्या मनात रुजणारच नाही.

'सावित्री' ह्या पत्रात्मक कादंबरीतून सावित्रीचे प्रगल्भ बुद्धीचे वरदान लाभलेले तिचे वडील अप्पा, एजवर्थ, प्रो. गुरुपादस्वामी, ल्योरे आणि बिना आणि महत्त्वाचे अत्यंत प्रज्ञावान असलेला तिचा प्रियकर या व्यक्तिमत्त्वांचे दर्शन घडवित सावित्री स्वत:शी उलगडत जाते. तिचा प्रियकर तिला भेटायला कुर्ग येथे येणार त्याचा तिला विलक्षण आनंद होतो.

तो येणार म्हणून स्वत:साठी ती काही नियम आखून घेते. पत्र क्रमांक दहामधून सावित्रीचे व्यक्तिमत्त्व सहजपणे चंदनगंधासारखे उलगडत जाते. सावित्री पत्रातून काही सूत्रे सांगत जाते.

१. सर्वांच्या आधी उठणे आणि शेवटी झोपणे.
२. नोकरीत हळू बोलणे.
३. पाहुण्यांची आवड त्यांना न विचारता ओळखणे
४. उगाच धांदल न करणे.
५. आपले संभाषणचातुर्य माफक प्रमाणात वापरणे.
६. उगाच न गाणे.
७. पाहुण्यांना काही वेळ मोकळे ठेवणे
(तुमचा कार्यक्रम आखतांना मी हे लक्षात घेतले आहे
हे तुमच्या लक्षात आलेच असेल.)
८. दुसऱ्याचे आपल्याविषयी बोलणे शब्दश: खरे न मानणे.

प्रियकर येतच नाही. सावित्री निराश होते आणि त्याला लिहिते की,

''फार पुढं पाहू नये आणि मागचं पुन्हा रंगवू नये हे शिकायला मी लागले आहे. जे झाले आहे ते तसेच दूर ठेवले पाहिजे. बरोबर वागण्याने त्याच्या छटा उगाच फिकट होतात मात्र.''

'सावित्री'मध्ये उत्कट प्रेम करणाऱ्या तरल भावविश्वात अष्टौप्रहर रममाण होणाऱ्या, अत्यंत आदर्श स्त्रीचे चित्रण करण्यात पु.शि. रेगे कमालीचे यशस्वी झाले आहेत. आपण आपल्या ह्या प्राणप्रिय प्रियकराला

आपल्यासारखेच फार उत्कट करू शकलो नाही याची खंत सावित्रीची मनाला लागलेली आहे. तिच्या लक्षात येते की त्याच्या जीवनात ल्योरे आलेली आहे. शेवटी हार स्वीकारताना ती म्हणते,

''प्रत्येक क्षणाला आपण एक न फिरवता येणारा निर्णय घेत असतो. मी पहिल्यानं तुम्हाला लिहिलं तेव्हा एक एक निर्णय घेतला होता. तिरुपेटला बोलावलं तेव्हा एक निर्णय घेतला होता. तो मी फिरवला नाही. माझ्या वागण्याची मानसशास्त्रीय भूमिका त्याच्या आड आली नाही. मला जो प्रतिसाद हवा होता तो मिळाला नाही. तो मिळाला असता तर मी तुमच्याबरोबर कुठंही आले असते; तुमच्यासाठी काहीही केलं असतं. जन्माला येतानाच प्रत्येक मुलगी आपल्या आईला आणि बापालाही सोडण्याची तयारी करून आलेली असते.

तुम्ही कदाचित म्हणाल, की तुम्हीही एका प्रतिसादाची अपेक्षा केली होती आणि तो तुम्हांला मिळाला नाही. याचे उत्तर मी कसं देणार? अगदी खरं सांगायचं म्हणजे साद प्रतिसादाची भाषा उपजल्यशिवायच हे निर्णय घेता आले पाहिजेत.

आतां हे इतकं लिहिल्यानंतर माझी मीच ओशाळी झाले आहे. तुम्हाला हे वाचून दु:ख झाले तर मला कायमची विसरा.''

स्वप्नसृष्टीत हरवणारी सावित्री शेवटी स्वत:तच हरवून जाते. सावित्री एका पत्रात सांगते की, ''विश्लेषणानं काहीच साधत नाही.''

सावित्री ही व्यक्तिरेखा म्हणजे सुरांच्या पलिकडले एक उत्कट सुख आहे.

कवितेवर आणि काव्यात्म पातळीवर जीवन जगू पाहाणाऱ्या, उत्कट मनोवृत्तीच्या प्रत्येक वाचकाने वाचायला हवी, नव्हे, संग्रही ठेवायला हवी अशी कादंबरी आहे हे मात्र निश्चित ....

-वामन देशपांडे

१०वी आवृत्ती

सत्तांतर

लेखक
व्यंकटेश माडगूळकर

किंमत - ९०/-रु.
पोस्टेज -३०/-रु.



काळाप्रमाणेच संघर्षही सतत वाहतच असतो.
त्याला खंड असा नसतोच.
असलीच; तर भरती असते, पूर असतो.
जेव्हा-जेव्हा खाणारी तोंडं भरमसाट वाढतात,
गर्दी होते, तेव्हा-तेव्हा संघर्ष बळावून उठतो.
जेव्हा उपलब्ध अन्नात, भूमीत वाटेकरी निर्माण होतात,
तेव्हा संघर्ष उचल खातो.
जेव्हा अस्थिरता निर्माण होते, एखादी जात धोक्यात येते,
बाहेरून परकं कोणी येतं आणि बंदिस्त टोळीत घुसू पाहतं,
तेव्हा संघर्ष उतू जातो.
ज्यांना बोलता येतं; ते हा राग, उद्दामपणा,
'संघर्ष' शब्दांतून दाखवतात.
ज्यांना बोलता येत नाही, त्यांचे राग-लोभ,
प्रेम हावभावांतून, स्पर्शातूनच सांगितले जातात.
संघर्ष पेटला की, शस्त्रास्त्रं वापरली जातात.
ज्यांना शस्त्रास्त्रं माहीतच नसतात,
ते सुळे, नखं वापरतात.
'संघर्ष' सर्वत्र भरून राहिलेला असतो.



हरवलेले बालपण

बालमजुरी आणि ती करायला लावणारे गुंड व त्यांचे हितसंबंध जोपासणारी एक टोळी आणि या सगळ्या वाईट गोष्टींच्या विरोधात लढणारा अरुण हा नायक. काही चांगल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांची त्याला साथ मिळते. लक्ष्मीकांत देशमुख यांच्या कादंबरीची ही मध्यवर्ती कल्पना.

–सकाळ

लेखक : लक्ष्मीकांत देशमुख

प्रकाशक : मेहता पब्लिशिंग हाऊस

पृष्ठे : २६८, किंमत २८० रुपये

कळेल का त्याला आईचं मन?

प्रख्यात पत्रकार, विश्लेषक आणि राजकारणी अरुण शौरी यांचे हे आत्मचरित्रपर लेखन आहे, मतिमंद मुलाला वाढवताना माता-पित्याची होणारी अवस्था या पुस्तकातून समोर येते. मतिमंद मुलाला वाढवताना होणाऱ्या मानसिक यातनांना सामोरे जातानाच शौरी यांच्या पत्नीला अनिताला केवळ ४२व्या वषी पार्किन्सन्सचा आजार जडला. हा दुसरा आघातही पचवावा लागला. धर्माने सांगितलेली मूल्ये, तत्त्वज्ञान, सेवा यांचा आधार घेत त्यांनी स्वत:च एक तत्त्वज्ञान उभे केले.

–महाराष्ट्र टाईम्स

मूळ लेखक : अरूण शौरी

अनुवाद : सुप्रिया वकील

प्रकाशक : मेहता पब्लिशिंग हाऊस

पृष्ठे : ३७४, किंमत ३९० रुपये



इमानी मित्र आणि इतर गोष्टी

शरद दळवी

किंमत : ६०/-रु. । पोस्टेज :३०/-रु.

६वी आवृत्ती

माझा गाव

लेखक
रणजित देसाई

किंमत - २५०/-रु.
पोस्टेज -३०/-रु.

'माझा गाव' या माझ्या कादंबरीतील बरीच पात्रं आणि प्रसंग तर माझ्या घरचेच आहेत. कादंबरीतील वाडा हा अप्रत्यक्षपणे आमचाच आहे. जयवंताचं पात्र हे माझ्या प्रत्यक्षातील भावभावनांतून, अनुभवांतून आकाराला आलेलं आहे. इतर पात्रं मी प्रत्यक्ष पाहिलेली आहेत. त्यांचे स्वभाव मी हेरलेले आहेत; त्यांची मांडणी मात्र नव्यानं केली आहे. तिथंच तेवढं कल्पनेचं साहाय्य घेतलं आहे.

कादंबरीतील मुख्य पात्र आहे अप्पासाहेब इनामदार. हे पात्र मी वास्तवातूनच उचललं आहे. माझ्या वडिलांवरून ते सुचलं. पण कादंबरीतील त्या पात्राच्या जीवनात घडणाऱ्या घटना माझ्या वडिलांच्या जीवनातील मुळीच नाहीत. त्यांतील काही मी ऐकलेल्या आहेत. काही पाहिलेल्या आहेत.

स्वातंत्र्यपूर्व काळातील एक जुनं गाव उभं करावं, असा एक हेतू या कादंबरी-लेखनामागं होता. जुन्या ग्रामरचनेतील माणूस कसा होता, कसा जगत होता, स्वत:ला समाजाशी कसा वाहून घेत होता, हे दाखविण्यासाठी मी ही कादंबरी लिहिली आहे.

आज सगळं ग्रामजीवनच बदलत चाललं आहे. समाज बदलतो आहे, संस्कारही बदलत आहेत; पण हरवलेल्या जीवनाची रुखरूख मात्र मनात घर करून होती. ती वाढतच होती. ती रुखरूख हीच या कादंबरी-लेखनामागची मूळ प्रेरणा आहे...



टेक मी होम

हे लोक 'हिरव्या कुरणां'च्या अर्थात 'समृद्धी'च्या शोधार्थ इतरत्र गेले नाहीत; परंतु त्यांची स्वप्नं आणि महत्त्वाकांक्षा, त्यांच्या जन्मगावांपासून खूप खूप दूरवर जाऊन पोचल्या.



मूळ लेखिका : रश्मी बन्सल
अनुवाद : सुनीति काणे
पृष्ठे ३८० । किंमत ३०० रु. । पोस्टेज ३० रु. । सभासदांना सवलतीत

लहान गावात राहून मोठी स्वप्नं पाहणाऱ्या २० भारतीय उद्योजकांच्या प्रेरणादायी कहाण्या

ॲपची खिचडी

रोहित भट : रोबोसॉफ्ट
उडुपी, कर्नाटक

१९९८मध्ये रोहिन भट या तरुण अभियंत्यानं मुंबईहून त्याच्या जन्मगावी बस्तान हलवलं. त्याला मनोमन खातरी वाटत होती की, त्याच्या लहानशा जन्मगावी राहून तो जागतिक दर्जाची इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी (आय.टी.) कंपनी निर्माण करू शकेल. आज ३५ कोटींची उलाढाल करणाऱ्या कंपनीचा तो मालक आहे आणि कंपनीत ३५० कर्मचारी काम करत आहेत. लहान गावातून जागतिक दर्जाची कंपनी उभारता येते, हे त्यानं सिद्ध केलं आहे.

मी उडुपीचा विचार केला की, माझ्या अंतश्चक्षूंपुढे सोनेरी रंगाचे कुरकुरीत
डोसेच उभे राहतात -
रवा डोसा, मसाला डोसा, घी रवा मसाला डोसा, इडली, वडा आणि भिशीबेळी भात.

मुंबईत लहानाची मोठी होत होते, त्या काळी उडुपी हॉटेलात खादाडी करणं आम्हाला अत्यंत प्रिय वाटत असे. मॅक्डॉनल्ड्सच्या जमान्यापूर्वीचा काळ होता तो.

मॅक्डॉनल्ड्स बोकाळलं त्याआधी अनेक दशकांपूर्वी उडुपीच्या धडपड्या, साहसी अण्णा लोकांनी स्वच्छ, स्वस्त आणि झटपट ग्राहक सेवा पुरवणारी उडुपी रेस्टॉरंट्स थाटून लोकप्रिय केली होती.

त्यामुळे मी उडुपीला पोचले, तेव्हा माझ्यापुढलं एकमेव उद्दिष्ट होतं एका स्थानिक उडुपी रेस्टॉरंटमध्ये खायला जाण्याचं. परंतु तिथं प्रामुख्यानं पंजाबी, चायनीज आणि इतर फास्टफूड रेस्टॉरंट्सच दिसत आहेत, हे पाहून मला आश्चर्य वाटलं आणि तेवढीच माझी घोर निराशाही झाली.

मी सुस्कारा टाकून म्हटलं, ''मला वाटलं होतं, त्यापेक्षा उडुपी निराळंच आहे!'' आणि खरोखरच (काही बाबतीत) ते माझ्या अपेक्षेपेक्षा वेगळं आणि खूपच वरचढ निघालं.

तिथली 'रोबोसॉफ्ट' ही कंपनी पाहून मला विलक्षण आश्चर्य वाटलं आणि आनंद झाला. या 'इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी' कंपनीचं मुख्यालय नवी उडुपीमधील सांथेकट्टे इथे असलं, तरी त्या कंपनीची विचारपद्धती आणि कार्यपद्धती बंगळुरूमधील आय.टी. कंपन्यांसारखीच आहे. ही कंपनी जगभरातील ग्राहकांना सेवा-सुविधा पुरवते आहे आणि कल्पक प्रकारचे 'ॲप्स' आणि कॉम्प्यूटर गेम्स तयार करते आहे. याहूनही उच्च प्रतीची ध्येय साध्य करण्यासाठी भुकेली असलेली ही वेडी कंपनी तेवढीच आत्मविश्वासपूर्णसुद्धा आहे.

उडुपीतील रेस्टॉरंटवाल्यांप्रमाणेच रोहित भटसुद्धा आपलं नशीब आजमावून पाहण्यासाठी मुंबईलाच गेला होता, परंतु १९९८मध्ये त्यानं आपल्या मूळ गावी परत येण्याचा निर्णय घेतला.

''व्यवसायासाठी मोठ्या शहरात राहणं गरजेचं नव्हतं. इंटरनेट आणि मोबाइल फोन्स उपलब्ध झाल्यामुळे माझ्या लक्षात आलं की, मी कुठूनही व्यवसाय चालवू शकतो.''

'त्या गावचा मुलगा असणं' ही गोष्ट रोहितच्या दृष्टीनं अत्यंत फायद्याची ठरली आहे. त्याच्यासाठी काम करणारे ८० टक्के कर्मचारी मंगलोरमधील आणि त्याच्या आजूबाजूच्या विभागांमधील इंजिनिअरिंग कॉलेजातील प्रशिक्षण घेऊन बाहेर पडलेले तरुण इंजिनिअर आहेत. अगदी त्याच्या स्वत:सारखेच!

असं असलं तरी 'रोबोसॉफ्ट' ही कंपनी जागतिक दर्जाची कंपनी आहे. त्या कंपनीला दूरदृष्टी आहे; महत्त्वाकांक्षा आहे. त्या कंपनीची इमारतही अत्यंत आधुनिक आणि सुरेख आहे. प्रत्येक कष्टाळू

आय.टी. कर्मचाऱ्याच्या अपेक्षांना पुरी पडणारी; त्यांच्या योग्यतेची.
जुन्या उडुपीतून नव्या उडुपीचं नवनिर्माण!
''क्या आयडिया है सरजी!''
भारताला असे अनेक उद्योजक हवे आहेत!

रोबोसॉफ्टचे संस्थापक रोहित भट

क्या आयडिया है सरजी !

रोहित भट उडुपीतच जन्मला आणि लहानाचा मोठा झाला. उडुपी हे दक्षिण कर्नाटकातलं लहानसं गाव आहे.

''माझ्या वडिलांच्या मालकीचा एक कारखाना होता. प्लास्टिकचे शीट्स आणि पाइप बनवण्याचा तो लघुउद्योग होता. यशस्वीरीत्या व्यवसाय चालवणं किती अवघड असतं, हे मी लहान वयातच जवळून पाहिलं!''

चार भावंडांमधलं शेंडेफळ असलेल्या रोहितनं मोठ्या भावंडांच्या पावलावर पाऊल टाकलं. त्याच्या थोरल्या भावा-बहिणीप्रमाणे रोहितसुद्धा अभियांत्रिकीचं शिक्षण घेऊ लागला. त्या सुमारास 'कॉम्प्यूटर सायन्स' या विषयाचा अभ्यासक्रमात नव्यानंच समावेश झाला होता. त्याच्या भावाच्या सांगण्यानुसार रोहित त्या शाखेकडे वळला. या विषयाच्या अभ्यासक्रमासाठी आवश्यक असलेले संगणक अत्यंत महाग होते आणि अगदी थोड्याशाच कॉलेजांमध्ये आवश्यक अशी सर्व सामग्री होती. त्या कॉलेजांपैकी एक कॉलेज नव्यानंच सुरू झालेलं एक खाजगी कॉलेज होतं. ते मंगलोरपासून ५४ किलोमीटर अंतरावरच्या कर्काल तालुक्यातील निट्टे नावाच्या खेड्यात सुरू करण्यात आलं होतं. या कॉलेजचं नाव होतं, 'निट्टे महालिंगा अद्यंताया मेमोरिअल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी'(N.M.A.M.I.T.)

''मी १९८८मध्ये या अभ्यासक्रमात दाखल झालो, तेव्हा कॉम्प्यूटर म्हणजे काय, हे फारच थोड्या लोकांना माहीत होतं. आम्ही ८०८६ प्रोसेसरवाले कॉम्प्यूटर्स वापरत होतो. आजच्या तुलनेत ते कॉम्प्यूटर्स फारच संथ आणि जुनाट असे होते.''

असं असलं तरी रोहितला त्या कॉम्प्यूटर्सवर काम करायला फारच मौज वाटत असे. त्याला कॉम्प्यूटर हार्डवेअरची जास्त गोडी होती. सॉफ्टवेअरपेक्षा हार्डवेअर त्याला जास्त आवडत असे. रोहितचा चौथ्या वर्षाचा प्रकल्पाचा विषय होता – Speech Recognition and Synthesis. या प्रकल्पावर चौघांचा गट काम करत होता आणि त्याच्यावरची जबाबदारी प्रामुख्यानं हार्डवेअरबाबतची होती. त्यासाठी त्यानं प्रिंटेड सर्किट बोर्ड्सचं

डिझाइन करून निर्मिती केली.

''आमचं ध्येय होतं की, आमचा प्रकल्प सर्वोत्कृष्ट ठरला पाहिजे आणि त्याचा सर्वाधिक बोलबाला झाला पाहिजे. त्यात आम्ही यशस्वीही झालो.''

कॉलेजातून पदवी मिळवून बाहेर पडल्यावर त्या काळच्या सर्व तरुण इंजिनिअर्सप्रमाणेच रोहितनंसुद्धा नोकरीच्या शोधार्थ बंगळुरूची वाट धरली.

''पदवीधारकांची आमची त्या कॉलेजची तिसरीच बॅच होती. त्यामुळे आमच्या कँपसवर इंटरव्ह्यू घेण्यासाठी तेव्हा कोणतीच कंपनी येत नसे.''

बंगळुरूला नोकरी शोधण्यात यश मिळालं नाही. रोहितची बहीण त्यावेळेस मुंबईत राहत होती. ती म्हणाली, ''इकडे ये. माझ्याकडे राहून नोकरी शोध. मुंबईत जास्त नोकऱ्या आहेत.''

रोहितनं तिचा सल्ला स्वीकारला आणि अखेरीस महिना १२०० रुपये पगारावर 'इंडस्ट्रिअल ॲन्ड बिझनेस मशीन्स' नावाच्या कंपनीत त्यानं नोकरी स्वीकारली. कंपनी बँकेसाठी 'ॲडिंग मशीन्स' बनवत असे; परंतु विरोधाभास म्हणजे रोहितचं काम सॉफ्टवेअरमधलं होतं.

''कंपन्यांमध्ये संगणकीकरणाला प्रारंभ झालेला नव्हता; कारण कामगार संघटनांच्या त्या गोष्टीला कट्टर विरोध होता, परंतु संगणकीकरण करणं अपरिहार्य ठरणार आहे, हे सर्वांना ठाऊक होतं.''

या कंपनीच्या लक्षात आलं की, त्यांचा हार्डवेअरमधला व्यवसाय लवकरच संपुष्टात येणार आहे. त्यामुळे त्यांना आताच्या ग्राहकांना उपयुक्त ठरेल असं सॉफ्टवेअर तयार करायचं होतं.

''माझं काम होतं चेक क्लिअरिंगसाठी 'क्लिअरिंग सॉफ्टवेअर' तयार करण्याचं. म्हणजेच बँकेत सादर केला गेलेला चेक वटवून घेण्यासाठी आवश्यक असं सॉफ्टवेअर बनवण्याचं.''

'कोडिंग' ही या तरुण अभियंत्याची विशेषता नव्हती. परंतु आता त्याच्यापुढे कोणताही पर्याय नव्हता.

''मी अगदी नवशिक्यांहूनही नवशिका होतो. पण मला काहीही ठाऊक नव्हतं, हीच गोष्ट मला सारं काही चटकन शिकून घेण्याच्या दृष्टीनं प्रेरणादायी ठरली.''

रोहित ऑफिसात काम करून जास्तीचं काम घरी घेऊन येत असे. त्याच्या मेहुण्यांचा कॉम्प्यूटर वापरून तो कोडिंग, टेस्टिंग चालू ठेवून आपल्या सॉफ्टवेअर प्रोग्रॅममध्ये सुधारणा घडवत असे.

''मी जीव ओतून आणि गरजेपेक्षा खूपच जास्त काम करत होतो. त्यामुळे मी माझ्या बॉसचा आवडता झालो.''

नऊ महिन्यांनी रोहित 'रीकोसॉफ्ट' नावाच्या एका जपानी कंपनीसाठी काम करू लागला. ही कंपनी जपानी ग्राहकांसाठी मायक्रोसॉफ्ट्स वर्डसारखा उपक्रम मॅकिंटॉश प्रणालीवर तयार करत होती. त्यावेळेस जगभरात फक्त एमएस डॉस आणि वर्डस्टार वापरलं जात असे. तेव्हा 'ग्राफिकल यूजर इंटरफेस'ची सुरुवात झाली नव्हती.

''मला पूर्वीपेक्षा सर्वस्वी नव्या गोष्टीवर काम करण्यात मोठा थरार वाटत होता.''

परंतु या नोकरीतली सर्वांत आनंददायी गोष्ट होती ती म्हणजे जपानी संस्कृतीची झालेली ओळख. कंपनीनं रोहितला वर्षभरासाठी जपानला पाठवलं. त्यामुळे काम करण्याची आणि विचारांची एक सर्वस्वी नवी पद्धत त्यानं प्रथमच पाहिली.

''दुसऱ्या महायुद्धात सर्वस्वी विनाश पावलेला हा देश प्रयत्नांती पुन्हा जगभरात उच्चस्थानी पोचलेला मला दिसत होता.''

जपान देश प्रत्येक बाबतीत अमेरिकेला नामोहरम करत होता. मग ते तंत्रज्ञान असो की ऑटोमोबाइल डिझाइन असो! त्याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे सर्वसाधारण कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन व्यवहारांमध्ये उत्कट जिद्द आणि दृढनिश्चय स्पष्टपणे जाणवत होता – बँकांमध्ये, दुकानांमध्ये, ग्राहक सेवा विभागामध्ये! ही उत्कटता देशाभिमानातून निपजलेली होती.

''माझ्या मनात आलं की, जर हा देश इतकं काही साध्य करू शकतोय, तर मीसुद्धा कधीतरी माझ्या मायदेशी परत जाऊन काहीतरी नवं हाती घ्यायला हवं!''

जपानमध्ये वर्षभर काम करून रोहित या कंपनीच्या मुंबईतील ऑफिसमध्ये परत आला. रीकोसॉफ्टमध्ये अडीच वर्षं काम केल्यानंतर त्यानं दुसरीकडे जायचं ठरवलं.

''त्यावेळेस मी २६ वर्षांचा होतो आणि पेचात पडलो होतो – मी दुसरी नोकरी घ्यावी की स्वत:ची कंपनी सुरू करावी?'' रोहितच्या आईनं सल्ला दिला, ''व्यवसायात पडू नकोस – तुझ्या वडिलांची व्यवसायातली धडपड मी प्रत्यक्ष पाहिली आहे.''

त्याच्या भावानं आणि वडिलांनी मात्र त्याला उत्तेजन दिलं. ''पुरे झालं!

आता तू स्वत:चा व्यवसाय सुरू करायची वेळ आली आहे!''

रोहितनं 'एल ॲन्ड टी'मध्ये नोकरी घेतली; परंतु तिथून तो दोनच महिन्यांमध्ये बाहेर पडला. कारण आत्मविश्वासानं भरारी घेण्याची वेळ कधीतरी येतेच!

एकदा प्रवाहात उडी टाकली की, तुम्ही तरंगायला शिकता!

परंतु प्रारंभ कोठून करायचा? रोहितनं सर्वप्रथम एक गोष्ट केली! त्यानं त्याच्या 'रोबोसॉफ्ट' या कंपनीच्या नावे एक फोन कनेक्शन घेतलं. पुढलं पाऊल होतं 'यलो पेजेस'मध्ये जाहिरात देण्याचं.

''माझी समजूत होती की, तुम्ही जाहिरात दिलीत की तुमची जाहिरात वाचून लोक तुमच्याकडे येतील. मी इतका भाबडा आणि आदर्शवादी होतो!'' (हसतो!)

रोहित जाणून होता की, त्यानं मॅकिंटॉशवरच भर द्यायला हवा. ते तंत्रज्ञान त्याच्या परिचयाचं होतं आणि या खास विभागात इतर कुणीही सेवा पुरवत नव्हतं. त्यासाठी प्राथमिक गरज होती, अत्यंत महाग असलेल्या ॲपल मॅकिंटॉश मशीनची. जपानच्या वास्तव्यात वाचवलेला पैसा वापरून रोहितनं ॲपल मॅक विकत घेतला.

तो एकुलता एक कर्मचारी, जवळ एकच कॉम्प्यूटर आणि बिनभाड्याची जागा (त्याच्या बहिणीचं घर!). परंतु पहिला ग्राहक कसा मिळवायचा? त्यासाठी आसपास शोध घ्यावा लागतो आणि थोडं नशीबही लागतं.

''माझा एक मित्र पुण्यात ओशो आश्रमाजवळ राहत होता. ओशो अनुयायांकडे खूप मॅक्स होते. त्यामुळे त्यांच्याकडून मला थोडं काम मिळेल, असं मला वाटलं.''

त्यांना तो भेटला तेव्हा त्यांनी विचारलं, ''तू आमच्यासाठी 'स्पेलचेक' प्रोग्रॅम बनवू शकशील?''

रोहितनं होकार दिला आणि त्यानं एका मित्राच्या मदतीनं कोडिंग केलं.

ॲपल कॉम्प्यूटर्सचं तेव्हा भारतात नुकतंच आगमन होत होतं. ॲपलवाल्यांनी रोहितबद्दल ऐकताच त्यांनी रोहितशी संपर्क साधून विचारलं, ''तुझा कॉम्प्यूटर प्रोग्रॅम तू आमच्या ऑपरेटिंग सिस्टीमवर टाकू शकशील?''

१९९६च्या मध्याला, रोहितच्या नव्या कंपनीला मिळालेलं हे पहिलंच मोठं काम होतं. ॲपलनं रोहितच्या स्पेलचेक सॉफ्टवेअरच्या तीन हजार प्रती विकत घेतल्या आणि त्याला नकद पाच लाख रुपये दिले.

''त्यावेळेस माझ्या दृष्टीनं ही खूपच मोठी रक्कम होती.''

भारतातील मॅकिंटॉशसाठी ॲपलनं स्थानिक भाषांमधली प्रणाली उपलब्ध करून दिली. रोहितला त्यांनी विनंती केली की, हिंदी, गुजराती, मराठी आणि अन्य भारतीय भाषांमधील सॉफ्टवेअरच्या संदर्भात त्यानं मदत पुरवावी.

''ते मला जाहिरातीच्या दौऱ्यावरही घेऊन गेले. मी त्यांच्या संघातला एक घटक म्हणून आमच्या सॉफ्टवेअरची प्रात्यक्षिकंही देऊ लागलो. त्यामुळे माझ्या कामाची विश्वासार्हता खूपच वाढली!''

रोहितला पुढलं काम 'सी-डॅक'कडून (सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ ॲडव्हान्स्ड कॉम्प्युटिंग) मिळालं. त्यांनी रोहितच्या स्थानिक भाषांमधल्या कामाबद्दल ऐकलं असल्याने त्यांनी त्याला त्याच्याशी संबंधित असं काम दिलं. दरम्यान ॲपलनं केलेल्या प्रशस्तीमुळे आणि सांगोवांगी नाव परसल्यामुळे त्याला आणखी प्रकल्प मिळू लागले होते.

''लोकांना आता समजलं होतं की, मॅक संदर्भातलं काम करून घ्यायचं असलं, तर हे लोक ते काम करून देतात...''

हाती जास्त-जास्त प्रकल्प येऊ लागले, तेव्हा रोहितनं दोन कॉम्प्यूटर प्रोग्रॅमर्स नियुक्त केले. अजूनही त्याचं अधिकृत असं ऑफिस नव्हतं. रोहित अजूनही त्याच्या बहिणीच्या घरूनच काम करत होता, तर त्याला मदत करणारे प्रोग्रॅमर्स स्वत:च्या घरातूनच काम करत होते. तीन ठिकाणी केल्या गेलेल्या कामचा समन्वय साधणं जिकिरीचं होऊ लागलं होतं. त्यावेळेस रोहितला साक्षात्कारी कल्पना सुचली.

''मी उडुपीला हलायला हवं!''

हे साल होतं १९९८ आणि त्यावेळेस इंटरनेट अगदी बाल्यावस्थेत होतं. परंतु एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट रोहितच्या लक्षात आली.

''इंटरनेटमुळे तुम्ही मुंबईतून काम करताय की उडुपीतून, त्यात कोणताही फरक पडत नाही!''

किंवा अगदी ओसाड गावातूनही!

दुर्दैवानं खोलात जाऊन तपास केल्यावर रोहितच्या लक्षात आलं की, उडुपीत इंटरनेट सुविधाच उपलब्ध नाही! परंतु सुरत्कल येथील कर्नाटक रिजनल इंजिनिअरिंग कॉलेजात इंटरनेट सुविधा उपलब्ध होती. एवढंच नव्हे, तर 'सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी आंत्रप्रेन्युअर्स पार्क' (STEP) या

योजनेअंतर्गत नव्यानं सुरू झालेल्या कंपन्या तेथील इंटरनेटबरोबरच आर.ई.सीमधील विद्यार्थ्यांचासुद्धा प्रकल्पांसाठी उपयोग करून घेऊ शकत होत्या.

ही सुविधा रोहितला अतिशय आकर्षक वाटली. जानेवारी, १९९८मध्ये त्यानं मुंबईतला व्यवसाय सुरत्कलच्या कँपसवर हलवला. 'स्टेप'मधलं ऑफिस जून, १९९८मध्ये तयार झालं आणि १५ जुलै, १९९८पासून रोहित ऑफिस वापरू लागला.

''मुंबईतले माझे दोन कर्मचारी मुंबई सोडायला तयार नव्हते. त्यामुळे मी पुन्हा 'एकट्या माणसाची कंपनी' बनलो!''

त्यावेळेस रोहितनं त्याच्या शिक्षणदात्या एन.एम.ए.एम.आय.टी. कॉलेजातून नुकतेच बाहेर पडलेले पदवीधर इंजिनिअर नियुक्त करण्याचा निर्णय घेतला. या कॉलेजमधून पदवी घेऊन बाहेर पडणारी ही सातवी बॅच होती आणि आपल्या मूळ गावाजवळची नोकरी कँपसवरच मिळवता आली, याचा त्या ताज्या पदवीधारकांना आनंद झाला.

रोहितचा मित्र राम म्हणजे एम. रामचंद्र आचार्य हा केआरईसी इथे प्राध्यापक होता. त्यानं रोहितनं नियुक्त केलेल्या अननुभवी ताज्या पदवीधारकांना प्रशिक्षण देण्याची जबाबदारी उचलली आणि तो रोहितला प्रोग्रॅमिंगमध्ये मदत करू लागला.

'आउटसोर्सिंग'चा जमाना येऊ घातला होता. त्यामुळे रोबोसॉफ्टचा खूपच फायदा झाला. परदेशातील ग्राहक ॲपल इंडियाला फोन करून म्हणत, ''मॅकिंटॉशची माहिती असलेले भारतातले प्रोग्रॅमर्स आम्ही शोधतोय... तुम्ही कुणाचं नाव सुचवू शकाल?''

याच पद्धतीनं रोबोसॉफ्टनं पहिला परदेशातला ग्राहक मिळवला. एक इस्त्रायलमधली कंपनी. रोहित जेरूसलेमला गेला; त्यानं त्या कंपनीच्या मंडळींशी बोलणी केली आणि ते कंत्राट मिळवलं. त्याच्या पुढचं काम होतं एक 'मल्टिमीडिया एनसायक्लोपीडिया' तयार करण्याचं आणि त्यासाठी त्याला २५ हजार डॉलर्सचा घवघवीत मोबदला मिळणार होता.

''त्यामुळे पुढल्या महिन्याचे कर्मचाऱ्यांचे पगार कसे चुकते करायचे, यांसारख्या माझ्या चिंता एका क्षणात मिटल्या.''

परंतु हे काम करून देणं हे रोहितपुढलं जबरदस्त मोठं आव्हान होतं. त्याच्या हाताखालचे सहायक तरुण आणि अननुभवी होते. हा प्रकल्प खूपच

मोठा होता. प्राध्यापकाची नोकरी सोडून रामने पूर्णवेळ रोबोसॉफ्टमध्ये काम करावं, यासाठी रोहितनं रामचं मन वळवलं. दोघांनी मिळून या प्रकल्पाचा अंतिम टप्पा पूर्ण करण्यासाठी अडीच महिन्यांपेक्षासुद्धा जास्त काळ धडपड केली.

जेव्हा या प्रकल्पाचे पैसे मिळाले, तेव्हा रोहित आनंदाच्या ढगांवर तरंगत होता.

''त्यानंतरच मी माझा पहिला फ्रिज, पहिला टीव्ही विकत घेतला...'' (हसतो.)

सुरत्कला व्यवसाय थाटल्यावर पहिल्या वर्षाची रोबोसॉफ्टची उलाढाल होती आठ लाख रुपये! त्यावेळेस कंपनीची स्वत:ची वेबसाइटसुद्धा नव्हती. परंतु कंपनीचा विकास झपाट्यानं होत गेला – कर्मचारी संख्या दोनांवरून १९वर पोचली. अडीच वर्षांनी केआरईसीमधून बाहेर पडून उडुपीत स्वत:चं ऑफिस थाटायचं, असा रोहितनं निर्णय घेतला.

''आम्ही एका इमारतीचा दुसरा मजला भाड्यानं घेतला. ५० लोकांना बसता येईल, एवढा तो मोठा होता.''

कर्मचारी आनंदानं थरारून गेले.

''ओहो! केवढं प्रचंड ऑफिस आहे हे!'' असं पालुपद नित्य कानी पडू लागलं. ऑफिसच्या एका टोकाला उभं राहून दुसऱ्या टोकावर दृष्टी केंद्रित केली की, त्यांना वाटत असे, ''हो! आपण नक्कीच प्रगती करत आहोत!''

अर्थात उडुपीतून काम करण्यामुळे वेगळ्याच समस्या निर्माण झाल्या. २०००मध्ये उडुपी किंवा मंगलोरमधून थेट इंटरनेट संपर्क साधता येत नव्हता. द्राविडी प्राणायाम करून इंटरनेटवर जाता येत असे!

''मी माझा मोबाइल बंगळुरूमधल्या बीएसएनएलच्या लँडलाइनशी जोडत असे. त्या नंबरवरून मी पुन्हा माझा मोबाइल नंबर डायल करत असे आणि मग मला नेट वापरता येत असे. असं केलं की, तो लोकल कॉल ठरत असे.''

कठीण परिस्थिती माणसाला घडवत असते आणि त्याच्या ठायी लढायची जिद्द निर्माण करत असते. कोणतीही गोष्ट तडीला नेण्यासाठी या जिद्दीचीच अत्यंत आवश्यकता असते.

२०००मध्ये 'डॉटकॉम' कंपन्या गाळात जाऊ लागल्या. जरी परदेशातल्या अनेक ग्राहकांकडून रोबोसॉफ्टला कामं मिळत गेली, तरी

मंदीमुळे मनोधैर्यावर प्रतिकूल परिणाम होऊ लागला होता. इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी कंपन्यांच्या भवितव्याबद्दल लोकांच्या मनात चिंता-निराशेचे ढग दाटून येऊ लागले होते.

''आम्ही सात-आठ लोक कामावर नेमले होते... आमची कंपनी गाळात जाणार या समजुतीनं बरेच लोक कंपनीबाहेर पडले!''

असं असूनही रोबोसॉफ्टच्या विकासाचा आलेख चढताच राहिला. २००३ सालापर्यंत पूर्वी प्रचंड मोठं वाटणारे ऑफिस लहान पडू लागलं होतं.

''आम्ही त्याच इमारतीत आणखी एक ऑफिस थाटलं. २००४मध्ये आणखी तिसरं ऑफिस सुरू केलं.''

२००४मध्ये कर्मचारिसंख्या १५०वर पोचली आणि रोबोसॉफ्टनं शहरात चार वेगवेगळी ऑफिसं उघडली. या सुमारालाच रोबोसॉफ्टनं एक उंच झेप घ्यायचं ठरवलं.

''आमचे सारे मित्र बंगळुरूमधल्या झकपक इमारतींमध्ये काम करत होते. हे पाहून आपल्याला तशीच एक इमारत इथं उडुपीत का बांधता येऊ नये, असा मी विचार केला.''

कर्मचाऱ्यांना अशी इमारत मनापासून आवडली असती. अशा इमारतीत ऑफिस असल्यामुळे ग्राहकांचा कंपनीवर विश्वास बसायला मदत झाली असती.

ग्राहक उडुपीला येतील तेव्हा त्यांना मोठ्या शहरांसारख्याच पायाभूत सुविधा दिसतील, तशाच अन्य सोयी दिसतील, त्या प्रकारचीच कार्यसंस्कृती दिसेल. त्यामुळे कंपनीला जास्त काम मिळेल, असा त्यामागचा विचार होता.

लहानशा कंपनीच्या दृष्टीनं हे फार मोठं स्वप्न होतं. त्यावेळेस रोबोसॉफ्टकडे १६० कर्मचारी होते. त्यांची फक्त ४ कोटींची उलाढाल होत होती. बांधकामाचा खर्च १० कोटींच्या वर गेला असता.

''मी बँकेकडून कर्ज घ्यायचं ठरवलं.''

गेल्या अनेक वर्षांच्या अनुभवामुळे रोहित बँकांबरोबर व्यवहार करायला शिकला होता. त्यांचा विश्वास संपादन करण्यासाठी जरी नेहमीच धडपड करावी लागत असली, तरी परदेशी ग्राहकांकडून नित्यनेमानं येणारं काम पाहून बँकांनी पक्कं भांडवल आणि फिरतं भांडवल यांसाठी कर्जं दिली होती.

''माझ्या वडिलांनी आणि भावांनी प्लास्टिक व्यवसायात जे नाव

कमवलं होतं, त्याचासुद्धा फायदा झाला.''

परंतु तळघर, जिम, कॅफेटेरिया, स्पोर्ट्स सुविधा आणि ऑडीटोरियम असलेली पाच मजली इमारत कशासाठी बांधांयाची? एक लाख चौरस फुटांची, ८०० माणसांना पुरेल अशी जागा कशासाठी तयार करायची?

तसं करायचं कारण होतं दूरदृष्टीने पाहिलेलं पुढचं स्वप्न!

''माझी खातरी होती आमची कंपनी मोठी होऊन आम्हाला जागेची गरज पडेल!''

कंपनीचं भूतकाळातलं कार्य आणि दरवर्षी जवळ जवळ १०० टक्क्यांनी होणारी वाढपाहून बँकेनं कर्ज द्यायला कबुली दिली. रोबोसॉफ्टनं ३३ टक्के रक्कम उभी केली आणि इमारत तारण म्हणून ठेवली. बांधकाम पूर्ण झालं तेव्हा जमीन आणि इमारत यांचा एकूण खर्च १३ कोटी झाला. त्यात आतलं फर्निचर आणि कॉम्प्यूटर्स इत्यादी सामग्री यांचाही समावेश होता.

''आम्ही संपूर्ण इमारतीसाठी फर्निचर बनवलं नाही. जसजसे नवे लोक नियुक्त होत गेले आणि अधिक जागेची गरज भासू लागली, तसतसं आम्ही फर्निचर बनवत गेलो.''

जागा ही काही केवळ दगडामातीनं बनलेली निर्जीव गोष्ट नसते. स्वत:ची जागा हे तुमच्या मनातलं मोकळं अवकाश असतं आणि त्यातून तुमचं भविष्य आकार घेत असतं.

तुमचं आंतरिक क्षितिज विस्तारत गेलं की, तुमचं जगही विस्तारत जातं.

रोहितच्या लक्षात आलं की, रोबोसॉफ्टचा विकास आकड्यांवरून ठरला नसता. रोबोसॉफ्ट 'इन्फोसिस'प्रमाणे एका प्रकल्पावर एक हाती ३००-४०० लोक कधीही नियुक्त करू शकली नसती.

''मी माझ्या व्यवसायासाठी निवडक भाग कोरून काढला होता आणि त्या भागात सर्वोत्कृष्ट ठरणं हे माझं उद्दिष्ट होतं.''

अनेक नामवंत कंपन्या रोबोसॉफ्टच्या ग्राहकयादीत सामाविष्ट आहेत – कॅनन, एप्सम, युमॅक्स, लॉजिटेक आणि एच.पी. (एच.पी.च्या मॅकिंटॉशच्या जवळ जवळ सगळ्या प्रिंटर ड्रायव्हरर्सचं कोडिंग रोबोसॉफ्टनं केलं आहे.)

''जगभरातल्या मोठाल्या पी.सी. कंपन्यांना माल पुरवणाऱ्या तैवानच्या लोकांप्रमाणेच आमचं काम होतं.''

अखेरीस तैवानी लोकांनी दुय्यम स्तरावर काम करणं थांबवलं आणि

‘एचटीसी’ आणि ‘एसर’ यांसारखे स्वत:चे जोरदार ब्रँड्स प्रस्थापित केले. रोबोसॉफ्टनं सॉफ्टवेअर क्षेत्रात याच धोरणाचं अनुकरण केलं आहे.

‘‘आम्ही उत्तम काम करत होतो, परंतु ते दुसऱ्यानं नेमून दिलेलं आउटसोर्स्ड काम होतं. २००७मध्ये आम्ही ठरवलं की, आपण स्वत:चीच ‘प्रॉडक्ट्स’ तयार केली पाहिजेत.’’

अशा प्रकारे एक वेगळाच प्रवास सुरू झाला – नवीन शोधाचा, नवीन ज्ञानाचा आणि ठोकताळेबंद ज्ञान विसरण्याचा. लोकांना ‘सेवा’ पुरवण्याऱ्या सर्व्हिस कंपनीपेक्षा स्वत: प्रॉडक्ट्स बनवण्याऱ्या सर्जनशील कंपनीची मानसिकता वेगळी असावी लागते. त्यामुळे प्रॉडक्ट निर्मितीसाठी वेगळा गट बनवण्यात आला.

‘‘प्रॉडक्ट्समध्ये आमचे दोन भिन्न ब्रँड्स आहेत – ग्लोबल डिलाइट : ‘युटिलिटी ॲप्स’ तयार करणारा ब्रँड आणि ‘नाइन्टी नाइन गेम्स’ हा नव्या गेम्स तयार करणारा ब्रँड.’’

नेहमीप्रमाणे यासाठी त्यांनी मॅकिंटॉशचंच व्यासपीठ उपयोगात आणलं. अभियांत्रिकी संदर्भाततील समस्या सोडवणं हे कंपनीचं बलस्थान असल्यामुळे नवी प्रॉडक्ट्स बनवण्यासाठी वेगळ्या प्रकारची कौशल्यं शिकून घ्यावी लागली. अगदी प्रारंभापासून एखाद्या प्रॉडक्टची संकल्पना कशी डोळ्यांपुढे आणायची, यांसारखी कौशल्यं गरजेची होती. त्यापुढे या प्रॉडक्टसाठी ग्राहकवर्ग किती लाभेल याचा अंदाज घेऊन युजर इंटरफेस आणि डिझाइन यांचा विचार करावा लागणार होता.

‘‘त्यानंतर केवळ ‘विपणन’ न करता आपल्या प्रॉडक्टची जाहिरातबाजी करायची सवय लावून घेणं गरजेचं होतं. त्यातला फरक कळतोय ना तुम्हाला?’’

ग्लोबल डिलाइट आणि नाइन्टी नाइन गेम्स यांनी मॅकवर्ल्डसारखा ट्रेड शोजमध्ये उपस्थिती लावायला सुरुवात केली. प्रात्यक्षिकं करून दाखवणं, प्रसार माध्यमांमधील लोकांना भेटणं आणि तुमच्या प्रॉडक्ट्सबद्दलचे अभिप्राय छापवून आणणं यांसाठी त्या गोष्टीचा उपयोग होतो.

अर्थात तुम्ही दहा वेगवेगळ्या गोष्टी करून पाहता तेव्हा त्यातली एक गोष्ट यशस्वी होते. पण त्या दहांपैकी कोणती गोष्ट यशस्वी ठरेल, हे तुम्हाला आगाऊ माहीत नसतं.

‘‘आम्हाला छप्पर फाडून लोकप्रियता मिळवणारं प्रॉडक्ट ताबडतोब

तयार करता आलं नाही... चुकत-माकत, त्यातून शिकत आणि त्या जोडीला नशिबाची साथ मिळाल्यावर आम्हाला यश लाभलं.''

२००७मध्ये ॲपलनं आयफोन बाजारात आणला आणि व्यवसायाच्या दृष्टीनं ही अत्यंत महत्त्वाची घटना ठरली. एकाएकी ॲप्ससाठी नवी बाजरपेठ खुली झाली. रोबोसॉफ्टचा व्यवसाय एकदम वाढला. ही कंपनी तत्पूर्वीच ग्राहकांसाठी आयफोनवरचे गेम्स आणि ॲप्स तयार करू लागली होती.

''आम्ही ताबडतोब काम हाती घेतलं.''

१ ऑक्टोबर, २००९ रोजी ग्लोबल डिझाइननं 'कॅमेरा प्लस' नावाचं ॲप बाजारात आणलं. या फुकट दिल्या जाणाऱ्या ॲपच्या मदतीनं आयफोन आणि आयपॅड धारकांना अधिक चांगले फोटो काढता येऊ लागले. त्यासाठी सुविधा आयफोन किंवा आयपॅडमधील कॅमेराबरोबर देण्यात आलेल्या नव्हत्या. 'कॅमेरा प्लस' फुकट दिल्यावर दोन कोटी लोकांनी ते वापरलं.

''हे ॲप इतकं लोकप्रिय झालेलं पाहून आम्ही त्याच्या सुधारित आवृत्तीसाठी पैसे आकारू लागलो.''

१० लाख लोकांपेक्षा जास्त लोकांनी कॅमेरा प्लसच्या या सुधारित ॲपसाठी ९९ सेंट्सपासून दोन डॉलर नव्व्याण्णव सेंट्स एवढा आकार भरला आहे. कंपनीने आणखी पाच ॲप्स तयार केला होती. पण ती खपाच्या दृष्टीनं या ॲपएवढी यशस्वी झालेली नव्हती. तरी उत्पन्न मिळवून देण्याच्या दृष्टीनं ती यशस्वी झाली आहेत.

गेम्सच्या विभागात 'नाइन्टी नाइन गेम्स'नं आजवर बारा गेम्स बाजारात आणले आहेत. आणि त्यातला एक 'वर्डस्वर्थ'अत्यंत लोकप्रिय झाला आहे. 'आयट्यून ॲप स्टोअर'नं बाजारात उपलब्ध करून दिलेल्या प्रारंभीच्या वर्डगेम्समध्ये 'वर्डस्वर्थ'ला उत्तम अभिप्राय मिळाले असून खूप लोकांनी त्याचा वापर केला आहे. गेल्या पाच वर्षांत चार लाख लोकांनी हा गेम डाउनलोड केला आहे.

''वर्डस्वर्थची अत्याधुनिक आवृत्ती आयफोन, आयपॅड, अँड्रॉइड फोन, किंडल फायर आणि नूक या सर्वांमध्ये वापरता येते.''

जरी त्यांनी मॅकिंटॉश ग्राहकांवर व्यवसाय केंद्रित केला असला, तरी रोबोसॉफ्ट इतर असंख्य ग्राहकांच्या मागणीनुसार विंडोज आणि अँड्रॉइड या व्यासपीठांसाठीसुद्धा काम करत आहे. त्याबरोबरच स्वत:ची अशी विशेष प्रॉडक्ट्सही बनवत आहे.

मार्च, २०१३मध्ये रोबोसॉफ्टचे उत्पन्न ३५ कोटी रुपये झाले आणि त्यातले बरेचशे अजूनही ग्राहकसेवांमधूनच आलेले आहे. परंतु त्यांची स्वत:ची निर्मिती असलेले ॲप्स आणि गेम्स आता त्यांना १६ टक्के उत्पन्न मिळवून देत आहेत. ही टक्केवारी वाढत जाईल, अशी रोहित यांची अपेक्षा आहे.

''यापूर्वी प्रॉडक्ट्सच्या निर्मितीवर आम्ही केलेला खर्च भरून निघत नव्हता. परंतु आता तो भरून निघतोय. प्रॉडक्ट्स निर्मितीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून होणाऱ्या माणशी उत्पन्नाची रक्कम लवकरच सर्व्हिसेसमधील माणशी उत्पन्नापेक्षा जास्त होईल.''या कहाणीला आणखी एक आनंदाची सोनेरी किनार आहे. २००८मध्ये संपूर्ण आयटी व्यवसाय मंदीच्या विळख्यात अडकला होता. रोबोसॉफ्टच्या एका प्रमुख ग्राहकानं – एचपीनं खर्चाला कात्री लावली होती. परंतु त्याचवर्षी प्रथम आयफोनचं आणि त्यानंतर आयपॅडचं जागतिक बाजारपेठेत पदार्पण झालं.

''आमच्या पारंपरिक ग्राहकांकडूनच आमचा जेवढा व्यवसाय कमी झाला, ती तूट ॲप्स आणि गेम्स यांची नवीन व्यासपीठांसाठी निर्मिती केल्यामुळे भरून निघाली.''

फक्त निर्यातीवर भर देण्याचा दृष्टिकोन बदलून रोबोसॉफ्ट आता भारतीय बाजारपेठेकडेसुद्धा लक्ष वळवू लागली आहे. अनेक प्रसारमाध्यम कंपन्यांसाठी (एनडीटीव्ही, दैनिक भास्कर, इकॉनॉमिक टाइम्स) रोबोसॉफ्टनं आयफोन आणि आयपॅडसाठीची ॲप्स बनवून दिली आहेत.

रोबोसॉफ्टचं अलीकडचं यश आहे 'धुम ३ गेम'. हा गेम यशराज फिल्म्सबरोबर करार करून वितरित केली गेला. अवघ्या सहा महिन्यांत तयार केलेला हा गेम अवघ्या २० दिवसांत १० लाख वेळा डाउनलोड झाला. त्यानं प्रचंड लोकप्रियता मिळवली.

''आम्ही यशराज फिल्मबरोबर अनेक गेम्सबाबतचा बहुवर्षीय करार केला आहे आणि इतर फिल्म स्टुडिओंबरोबरही अशा पद्धतीनं काम करायची आमची तयारी आहे.''

त्यामुळे सारं काही आलबेल आहे. फक्त एक प्रश्न शिल्लक राहिला आहे. आयटी व्यवसाय हा कोडर्स, ॲनिमेटर्स आणि टेस्टर्स यांच्या सुपीक आणि चलाख मेंदूवर अवलंबून असतो. लहान गावातली कंपनी असे कल्पक लोक आकृष्ट कशी करू शकते?

रोहितनं यावर शोधलेला तोडगा अगदी साधा आहे. तो स्वत:सारखेच तरुण लोक नियुक्त करतो.''आमच्या ३५० कर्मचाऱ्यांपैकी ८० टक्के लोक मंगलोरच्या जवळपासच्या टापूतले आहेत. त्यांनी दक्षिण कर्नाटकातील स्थानिक इंजिनिअरिंग कॉलेजात शिक्षण घेतलं आहे.''या स्थानिक मुलामुलींना मूळ गावाजवळच राहून उत्तम प्रकारचं काम करता येणं, ही गोष्ट आकर्षक वाटते.

''आम्ही घाऊक स्तरावर माणसं घेत नाही. प्रत्येक कॉलेजातली फक्त दोन-तीन मुलं आम्ही निवडतो; कारण आम्हाला आव्हानात्मक कामाच्या शोधातली सर्वोत्कृष्ट मुलं हवी असतात.''रोबोसॉफ्ट कंपनी बी.टेक.च्या विद्यार्थ्यांना अनुभव मिळवण्यासाठी प्रकल्पांवर काम करू देते आणि विद्यार्थ्यांमध्ये कोडिंगची स्पर्धासुद्धा आयोजित करते.

''इथे ज्या दर्जाचं काम केलं जातं, ते सर्वांनाच आवडतं. त्यामुळे योग्य गुणवत्तेचे लोक आकृष्ट करणं सोपं जातं.''कंपनीचं व्यवस्थापनसुद्धा योग्य माणसांच्या हाती आहे. शैलजा राव, श्रीनिधी राव, प्रदीप कुमार (ही मंडळी रोहितसारखीच एन.एम.ए.एम.आय.टी.ची पदवीधारक आहेत) आणि राम आचार्य यांसारखे लोक केआरईसीमधल्या काळापासून रोबोसॉफ्टमध्ये आहेत. कंपनीनं जेव्हा २०००मध्ये उडुपीला स्थलांतर केलं, तेव्हा रोहित यांच्या भावांनी त्यांच्या प्लॅस्टिकचा व्यवसाय विकून टाकला आणि तेसुद्धा रोबोसॉफ्टमध्ये दाखल झाले. पुरुषोत्तम भट हे एकूण उत्पादनाकडे लक्ष पुरवत आहेत, तर सुधीर भट अकौंट्स आणि फायनान्सकडे बघतात. ''ज्या लहानसहान गोष्टींकडे आम्ही भूतकाळात फारसं लक्ष पुरवलं नव्हतं, त्याच गोष्टी भविष्याकडे बघू लागल्यावर एकाएकी फार महत्त्वाच्या बनतात!''रोबोसॉफ्ट ही खाजगी मालकीची कंपनी आहे. कंपनीच्या उत्पन्नातून शिल्लक टाकलेल्या पैशाला कर्जाची जोड देऊन या कंपनीचा विकास घडला आहे.कुटुंबीय आणि प्रारंभीचे संस्थापक यांच्याकडे या कंपनीची संपूर्ण मालकी आहे. परंतु पुढील प्रगतीसाठी थोडं भागभांडवल इतरांना विकणं किंवा कंपनीचे शेअर्स बाजारात आणण्यासाठी 'पब्लिक इश्यू' काढणं गरजेचं ठरू शकेल, असं रोहित यांचं मत आहे.''मला 'नाइन्टी नाइन गेम्स' आणि 'ग्लोबल डिलाइट' यांचा व्यवसाय खूप वाढवण्याची इच्छा आहे.'' बेताचा उत्पादन खर्च आणि कंपनीतील कर्मचाऱ्यांची प्रचंड निष्ठा ही रोबोसॉफ्ट सारख्या व्यवसायाची बलस्थानं असतात.

२री आवृत्ती

अक्षयपात्र

मूळ लेखिका
बिन्दु भट्ट

अनुवाद
अंजनी नरवणे

किंमत - २००/-रु.
पोस्टेज - ३०/-रु.



२००३चा उत्तम गुजराती कादंबरीचा साहित्य अकादमी पुरस्कार मिळालेली हृदयस्पर्शी कादंबरी– 'अक्षयपात्र'.

–'तसं पाहिलं, तर सर्व लढायांच्या मुळाशी भीतीच असते. माणसाला सर्वप्रथम जेव्हा भीती वाटली असेल, तेव्हा ह्या भीतीपोटीच त्याला शस्त्र तयार करण्याची प्रेरणा मिळाली असेल. जिथं प्रेम असेल, विश्वास असेल, तिथंच निर्भयता असणं शक्य.'

–'लहान लहान गोष्टींसाठी आसुसलेल्या मुलांचे डोळे आणि रिकामे हात बघायला जेवढी हिंमत लागते, त्यापेक्षा फार कमी हिंमत लागते आत्महत्या करायला!'

–'अडचणींना तोंड देता येतं ते भावना आणि प्रेमामुळेच! बेटा, पणती असते, वातही असते; पण तेल नसेल, तर त्यांचा काही उपयोग नाही.' –'मी एक स्त्री आहे. एका एवढ्याशा गवताच्या काडीलाही घरटं मानून जगायची शक्ती आहे माझ्यामध्ये, म्हणूनच तर निसर्गानं मला आई होऊ शकण्याचं वरदान दिलंय.'

–'अगदी एकटं असण्याच्या ओझ्याखाली इतकं काही वाकून जायला होतं, की कधी कधी माणूस हातातलं वल्हं टाकून देतो आणि वारा नेईल तिकडे होडी जाऊ देतो; पण मग किनारा, की भोवरा?– त्याच्या हातात काहीच राहिलेलं नसतं.'

–'अंधुक उजेडात कंचनबांना अशा उभ्या बघून वाटतच नव्हतं, की त्यांचा त्या घराशी काही संबंध होता! त्या जणू एक अशा वृक्ष होत्या, जो उन्मळून पडला होता आणि कशाच्या तरी नाममात्र आधारानं त्याचं लाकूड उभं होतं. त्या वृक्षाला पक्कं ठाऊक होतं, की हा आधारही क्षणिक होता!'

पुस्तक परिचय

सफारी आफ्रिकेतली



मूळ लेखक
पीटर ॲलिसन
अनुवाद
मंदार गोडबोले

पृष्ठे २३२ । किंमत २४०रु. । पोस्टेज ३०रु. । सभासदांना सवलतीत

पार्श्वभूमी

मी एकोणीस वर्षांचा होतो. दोन वर्षांपासून असलेली नोकरी करताना मला विशेष समाधान मिळत नव्हते, तेव्हा मी नोकरी सोडली आणि आफ्रिकेला गेलो. आफ्रिकेला जाण्याची दोन कारणे होती. एक म्हणजे, मला आयुष्यात काहीतरी आव्हान हवे होते. दुसरे म्हणजे मला वन्यजीवनाबद्दल फार आकर्षण आणि प्रेम वाटत आले आहे.

सहा महिने आफ्रिकेत भटकल्यावर माझ्या जवळचे बहुतेक पैसे खर्च झाले आणि उरलेले मलावीतल्या एका कॅम्पवर चोरीला गेले. एखाद्या आव्हानाचा सामना करावा लागण्याची माझी मनीषा अशा रीतीने पूर्ण झाली. काही सहप्रवाशांनी गाडीतून मला दक्षिण आफ्रिकेला सोडण्याची तयारी दर्शविली, तेथे मला काही पैसे जमा करता आले असते. वाटेत आम्ही एका जंगलातल्या कॅम्पवर थांबलो.

त्या कॅम्पवर दोन दिवस धमाल केली. माझ्या उत्साहामुळे मला कॅम्पवरचा बार चालवण्याची संधी दिली गेली. मी अगदी आनंदाने माझ्या पाठीवरची सॅक उतरवली, माझे लांब वाढलेले केस कापून ती नोकरी स्वीकारली. जंगलात राहण्याची संधी मिळेल, अशी माझी अपेक्षा नव्हती. मी एका शांत उपनगरात लहानाचा मोठा झालो होता. एखाद्या राकट वनवासी मनुष्यात असणारे गुण माझ्यात नव्हते. माझ्या शरीराचे संतुलन यथातथाच आहे, गाड्या कशा चालतात किंवा कशा दुरुस्त कराव्या लागतात ते मला अजिबात माहित नाही. मला बंदुका आवडत नाहीत. मी उत्तेजित झालो किंवा घाबरलो, तर माझ्या सर्वांगाला घाम फुटतो. प्राणी पाहिल्यावर माझी अवस्था अशीच होते.

तसे असले, तरी कालांतराने माझी या नोकरीत बढती झाली आणि मी गाइड बनलो. मग कॅम्प-मॅनेजर झालो. शेवटी होतकरू गाइडना प्रशिक्षण देणारा शिक्षक झालो. माझी आफ्रिकेतली छोटीशी सुटी १९९४ सालापासून चालू आहे आणि ती संपण्याचे काही लक्षण दिसत नाही! त्याच सफारी गाइडच्या आयुष्यातल्या या गोष्टी आहेत.

अनुवादकाचे मनोगत

मी अनुवाद केलेले हे पहिलेच पुस्तक. आफ्रिकेच्या वन्यजीवसफारी आयोजित करत असल्यामुळे केनियाला दोन-तीन वेळेला माझे जाणे झाले. या प्रवासामुळे आफ्रिकेतील वन्यजीवनाबद्दल आकर्षण आणि आपुलकी निर्माण झाली. मग त्या विषयावरील चांगल्या पुस्तकांचा शोध चालू झाला. केनिया सफारीबद्दल मराठीतसुद्धा काही प्रवासवर्णनपर पुस्तके उपलब्ध आहेत. पण आफ्रिकेच्या इतर भागातील वन्यजीवनाबद्दल मराठीत फारसे लेखण झाले नाही. म्हणून मग इंग्रजी पुस्तकांचा शोध घेतला. ॲमेझॉनसारख्या संकेतस्थळांमुळे आजकाल शोध घेणे सोपे झाले आहे. आपण एखाद्या पुस्तकाबद्दल शोध घेतला की त्या विषयांवरील, किंवा ते पुस्तक खरेदी केलेल्या ग्राहकांनी इतर कोणती पुस्तके शोधली आहेत त्याची माहिती उपलब्ध होते. असाच शोध घेताना हे अनमोल पुस्तक हाताशी लागले.

मी आपल्या कंपनीतील वाचनालय चालवत असल्यामुळे आपल्या आवडीची पुस्तके वाचनालयासाठी विकत घेण्याची मला थोडीशी मुभा होती. हे पुस्तक घेतल्यावर सोडवले नाही. केवळ वन्यजीवनावरील प्रेमाखातर बोट्स्वाना देशातील अतिशय दुष्कर जंगलात कित्येक वर्षे राहून गाइड म्हणून काम करणाऱ्या पीटर ॲलिसनने आपल्या तिथल्या वास्तव्यातील विविध मनोरंजक अनुभव या पुस्तकात वर्णन केले आहेत. त्याची विनोदी शैली असून बोट्स्वानाच्या वन्यजीवनाबद्दलचे, तिथल्या लोकांवरचे आणि त्या देशाबद्दलचे प्रेम आपल्याला जाणवत राहते.

हे पुस्तक वाचल्यावर मराठीत असे पुस्तक असलेच पाहिजे असे वाटू लागले तेव्हा मेहता प्रकाशनाशी संपर्क साधला मग हा अनुवाद आकारास आला. हे पुस्तक वाचताना आणि त्याचा अनुवाद करताना मला खूप मजा आली तशीच मजा हा अनुवाद वाचताना वाचकांनादेखील येईल, अशी आशा आहे. आपल्याला पुस्तक आवडले का ते जरूर कळवा.

मंदार गोडबोले



सफारीतले काही अनुभव

आफ्रिकेत मला पहिल्यांदा नोकरी मिळाली त्या कॅम्पचे नाव होते इदुबे. पुढे आफ्रिकेत येणाऱ्या इतर पर्यटकांप्रमाणेच इदुबेला येणाऱ्या पर्यटकांनासुद्धा काहीतरी साहस हवे असायचे, काहीतरी वेगळे हवे असायचे. म्हणून आम्ही त्यांना रात्री जेवायला घेऊन जात असू.

आमच्या मुख्य कॅम्पपासून जवळच एक जागा होती. तिला आम्ही 'बुश कॅम्प' म्हणत असू. तिथे एक छोटा त्रिकोणी स्वच्छतागृहाचा तंबू होता आणि थोडी मोकळी जागा होती. त्या जागेत शेकोटी पेटवून शेकोटीभोवती टेबल-खुर्च्या मांडल्या जायच्या. अंधार पडल्यावर आम्ही पाहुण्यांना तेथे घेऊन जायचो. काळोखातील शेकोटीच्या लवलवत्या उजेडात सगळेच रम्य दिसते तसेच आमच्या बुश कॅम्पवरही दिसायचे. कंदिलाच्या प्रकाशात, प्रसन्नवदनी कर्मचारीवर्गामुळे ती जागा अप्रतिम दिसायची. पण दिवसा बघितले, तर ती जागा अगदीच साधीशी वाटे. स्वच्छतागृहाचा तंबू कोळीष्टकांनी भरलेला होता. ते काहीही असो; पण रात्रीच्या वेळी पाहुण्यांना ती जागा फारच आवडायची. कॅम्प मालकांना बुश कॅम्पचे जेवण स्वस्त पडायचे. त्यामुळेच आठवड्यातून कमीत कमी एकदातरी तिथे जेवण ठेवावे, असा त्यांचा आग्रह असायचा.

पण कॅम्पवर काम करणाऱ्या आम्हा कर्मचाऱ्यांना मात्र हे जेवण पसंत नसायचे. बुश कॅम्पवरच्या जेवणाच्या तयारीमुळे आम्हाला जास्त काम पडायचे. सगळे पर्यटक सफारीवर गेले की, आम्हाला थोडा मोकळा वेळ मिळायचा. तो या जेवणाच्या तयारीमुळे मिळायचा नाही.

कॅम्पवर एक फार जुनी झालेली आणि भरपूर आवाज करणारी लँडरोव्हर गाडी होती. त्या गाडीचे नाव आम्ही 'स्कोरोकोरो' असे ठेवले होते. (तिथल्या स्थानिक 'शान्गान' भाषेत स्कोरोकोरो या शब्दाचा अर्थ आहे – कामास फार जुनी) या बुश कॅम्पवर जेवणाच्या तयारीसाठी स्कोरोकोरोमधून सरपण आणि कंदील नेले जायचे आणि वूसानी नावाच्या एका बाईला स्वयंपाकासाठी बोलावले जायचे. वूसानीच्या वजनाच्या ओझ्याने स्कोरोकोरो जास्तच आवाज करू लागायची.

तेथे घडलेल्या एका प्रसंगामुळे तर वूसानीला या जेवणाच्या कार्यक्रमाबद्दल फारच भीती बसली. त्या बुश कॅम्पवर एकदा तिने स्वयंपाकाची लाकडे पेटवली तर एकदम तिला सिंहगर्जना ऐकू आली. तिच्या मते पिल्लू आपल्या आईच्या जितके जवळ असते त्यापेक्षाही तो सिंह तिच्या जवळ होता. बुश कॅम्पच्या जवळच एक कोरडे नदीपात्र होते. त्या नदीपात्रातल्या मऊ वाळूतून सिंह नेहमी चालत जायचे. नदीपात्रात सिंहांना चांगली सावली मिळायची, नाहीतर तिथल्या शांत, थंड हवेत आळसावलेले हरीण सावज म्हणून मिळायचे. पण वूसानीजवळ आलेला हा सिंह काही शिकारीच्या शोधात नव्हता, नाहीतर त्याने गर्जना केली नसती. शिकारीच्या मागावर असताना सिंह अजिबात आवाज करत नाहीत. ते काहीही असो, त्या सिंहाने वूसानीला जबरदस्त घाबरवून सोडले.

त्या दिवशी स्कोरोकोरो आणि तिचा चालक जेव्हा टेबल-खुर्च्या घेऊन परत आले तेव्हा त्यांना वूसानी जवळच्या एका वठलेल्या उंच झाडाच्या सर्वांत टोकाच्या फांदीवर बसलेली आढळली. आता खाली उतरणे सुरक्षित असल्याचे त्यांनी तिला पटवले, तरी ती खाली उतरली नाही. कारण ती उतरूच शकत नव्हती. सिंहांच्या भयाने ती झाडावर तर चढली; पण उतरण्यासाठी तिला शिडीची विनवणी करत फांदीला पकडून ठेवण्यापलीकडे तिच्याकडे काही पर्याय नव्हता. त्यात दुर्दैवाची गोष्ट अशी की, आमच्या कॅम्पमध्ये एकही शिडी नव्हती.

शेवटी गुरुत्वाकर्षणाच्या शक्तीनेच हा प्रश्न सोडवला. तिच्या मऊ गुबगुबीत शरीरामुळे एवढ्या उंचीवरून पडूनही तिला फारसे लागले नाही. पण त्यानंतर त्या कॅम्पमध्ये एकटी थांबायला ती कधीही तयार झाली नाही. तिकडे एकटे न थांबण्याबद्दल मला अनेक वेळा सावध करीत असे.

त्या बुश कॅम्पच्या जेवणाच्या वेळचे माझे काम मात्र वूसानीपेक्षा सोपे

होते. जेवणाच्या वेळी पुरेल इतकी दारू बुश कॅम्पला घेऊन जावे लागे. मला तिथे काम करायला लागून फार दिवस झाले नव्हते. बारमन म्हणून माझे महत्त्व फक्त आमच्या कॅम्पच्या माळ्याच्यापेक्षा जरासे अधिक होते. आमचा माळी कॅम्पबाहेर लॉनला पाणी घालायचा आणि वॉर्टहॉग (आफ्रिकेत आढळणारा रानडुकरासारखा एक प्राणी) ते लॉन लगेच उकरून टाकायचे. त्यामुळे त्याचे काम सगळ्यात कमी महत्त्वाचे होते! त्या कॅम्पला जाण्यासाठी स्कोरोकोरोत जागा मिळायला मला सर्वांत शेवटचा प्राधान्यक्रम मिळायचा.

एक दिवस त्या गाडीत टेबल-खुर्च्या, कपडे, सॅलड्स आणि वाट्या-चमचे हे सगळे दारूला त्यात जागाच राहिली नाही. तेव्हा मी भरून झाल्यावर मनाशी विचार केला, 'गेले उडत, आपण स्वत: ती दारू बुश कॅम्पला वाहून नेईन.'

तिथली ढकलगाडी विविध प्रकारच्या दारूंनी भरताना आजूबाजूच्या प्राणिसृष्टीचा विचार माझ्या मनाला शिवलाही नव्हता. माझे काम पूर्ण होण्याशी मला मतलब होता. त्याशिवाय आमच्या कॅम्पच्या गाइडकडून मी सतत नवे-नवे शिकत होतो. त्यामुळे मला वाटत होते की, त्या जंगलात कसे वागावे, कोणत्याही परिस्थितीशी सामना कसा करावा याबद्दल आपण पुरेसे सक्षम बनलो आहोत. केवळ एकोणीस वर्षांच्या वेड्या वयात मला वाटू लागले होते की, आफ्रिकेच्या जंगलात ज्या प्रसंगांचा सामना करावा लागतो त्याबद्दल आपल्याला पुरेशी माहिती झाली आहे. प्राण्यांबरोबर सामना कसा करावा वगैरे गोष्टींवर चर्चा व्हायची तेव्हा सगळ्यांचा एकच सल्ला देत, ''काहीही कर; पण पळू नकोस.'' आमच्या कॅम्पवर काम करणाऱ्या तीनही गाइड्सचा हा एकच एक सल्ला होता. त्या गाइड्सपैकी एक अल्फीयस होता. तो स्वत:च्या चेहऱ्यावर दुमजली हास्य आणून सांगायचा, ''जंगलात केवळ भक्ष्य पळते आणि इथल्या कोणापेक्षाही तू जोरात पळू शकत नाहीस.''

घाम गाळत आणि कण्हत ढकलगाडी भरून सामान लँडरोव्हरच्या वहिवाटेच्या रस्त्याने जाऊन मी बुश कॅम्पमध्ये पोहोचवले. फक्त बिअरच्या बाटल्यांचे एक खोके मला न्यायचे होते. अतिसाहसाच्या ऊर्मीमुळे मी ढकलगाडी सोडून ते खोके हातातूनच घेऊन जायचे ठरवले. बिअरच्या भरलेल्या चोवीस बाटल्यांचे ओझे, मऊ वाळूतून जवळजवळ एक मैल चालत जाताना किती होते ते मला आधी जाणवले नाही. जेमतेम एक

चतुर्थांश अंतर गेल्यावर मी ठरवले की, पायवाटसुद्धा सोडून कोरड्या नदीपात्रातूनच चालत जायचे.

माझ्या बुटात अडकलेला छोटा दगड काढायला मी एकदा थांबलो. मला त्याकाळी स्फटिक एकाच प्रकारचा दगड माहिती होता. त्यामुळे साहजिकच तो बुटातला दगड स्फटिकच आहे असे मला वाटले. मग मी पाय पसरून विश्रांती घेण्यासाठी जरा विसावलो. जंगलातल्या वाटेने चालत जाताना सतत एक उत्कंठा वाटत असते. त्या उत्कंठेचे, आजूबाजूच्या नीरव शांततेचे आणि झाडाच्या प्रसन्न सावलीचे एक अजबच मिश्र वातावरण तयार झाले होते. वर झाडावर एक राखाडी लूरी पक्षी बसला होता. तो असाकाही आवाज काढत होता की, वाटावे एक म्हातारी तिथे बसून 'निघून जा, निघून जा' असे सांगत आहे. ''का-वीऽऽऽ'' असा त्या पक्षाचा आवाज, तुम्हाला पळून जायला भाग पाडेल एवढा कर्कश जरी नसला तरी कटकट होईल इतका मोठा आणि सतत येत राहतो. पुढे मला असे समजले की, शिकारी प्राणी भक्ष्याच्या शोधात जेव्हा बाहेर पडतो तेव्हा अनेक पक्षी सावजांना इशारे देतात, त्यांपैकी हा एक पक्षी आहे. आफ्रिकेतला सर्वांत जास्त शिकार करणारा प्राणी हा माणूसच असल्यामुळे हा नक्की तुमच्याबद्दलच इतरांना इशारे देतो आहे, का इतर कोणत्या रानटी प्राण्याबद्दल तुम्हाला इशारे देतो आहे हे ओळखणे, कौशल्याचेच काम असते.

तिथे पडलेल्या एका लाकडाच्या ओंडक्याभोवती एका पायावर तोल सांभाळत (जवळजवळ उड्या मारतच) मी माझा बूट घातला व बिअरच्या बाटल्यांचे खोके उचलले. खोके उचलताना झालेल्या खळ्ळ्ळ्ळ् अशा मोठ्या आवाजामुळे, त्या ओंडक्याच्या मागे दबा धरून बसलेले दोन सिंह एकदम दचकले. त्यांना बहुधा वाटले की, एवढा मोठा आवाज करणारा एखादा गव्यासारखा जाडजूड प्राणी असावा. त्यांनी एकदम उडी मारली असेल की ते खरोखरच उडून आले असतील ते मला माहीत नाही, कारण मी त्यांच्याकडे बघितले नाही. त्यांना त्यांच्या आधीच्या जागेवरून माझ्यापर्यंत पोहोचायला लागलेला वेळ, माझे संपूर्ण आयुष्य माझ्या डोळ्यांसमोर यायला फारच अपुरा होता. पण मला जो एकमेव प्रसंग आठवला त्या प्रसंगी मी सात वर्षांचा होतो.

आमच्या शेजाऱ्यांनी जर्मन शेफर्ड जातीचा पांचो नावाचा एक कुत्रा पाळला होता. मला पांचोची प्रचंड भीती वाटायची. जेव्हा आम्ही त्यांच्या घरी

जायचो तेव्हा पांचो त्यांच्या स्वयंपाकघरातून जेवायच्या खोलीत, तिथून बाहेरच्या खोलीत आणि परत स्वयंपाकघरात अशी भुंकत फेरी मारताना मला दिसायचा.

एक दिवस मी, माझी बहीण आणि आई असे हवाई बेटांवर जायला निघालो होतो. तिथे माझी आई होनोलुलू मॅरेथॉनमध्ये पळणार होती. ती खरेतर तेव्हा खूपच आजारी होती, पण ती एक स्वाभिमानी आणि कणखर मनाची स्त्री होती. तिला ती शर्यत संपूर्ण पळून दाखवायची होती. ती एवढी आजारी होती की, मला आणि माझ्या बहिणीला कल्पना होती की, हा तिचा शेवटचा परदेशप्रवास असेल. कस्टम्समधून आमच्या आईची औषधे घेऊन जायला आम्हाला परवानगी मिळाली नसती म्हणून ती औषधे आमच्या शेजाऱ्यांकडे सुरक्षित ठेवायला मी गेलो होतो. पुढे त्या औषधांचा काहीच उपयोग झाला नाही आणि वर्षाच्या आतच कर्करोगाने ती गेली.

मी गेलो तेव्हा आमच्या शेजारच्या घराची मालकीण घराबाहेरच्या लॉनवर पांचोचे केस विंचारत बसली होती. तिने पांचोला त्याच्या गळ्यातल्या पट्ट्यापाशी पकडले होते. माझे वडील स्वत:ला प्राणितज्ज्ञ समजायचे. ते नंतर मला म्हणाले की, पांचोला तुझ्या हातातले औषधांचे पुडके म्हणजे काहीतरी हत्यार वाटले असावे. पण मला वाटायचे की, पांचोला माझा निव्वळ तिरस्कार वाटत असे. पांचोला त्याचे मालक सोडून इतर सगळ्यांचा तिरस्कार वाटत असे आणि एखाद्या बळीच्या बकऱ्यासारखा इथे मी त्याच्यासमोर आलो होतो.

माझ्याजवळ पोहोचायला त्याने त्याची मान अशी वळवली की, त्या गळातल्या पट्ट्याचा केवळ एक तुकडा त्याच्या मालकिणीच्या हातात शिल्लक राहिला! माझे वडील त्या प्रसंगाच्या आधीपासूनच मला सांगायचे की, कुत्र्याने कधी हल्ला केला तर अजिबात पळू नये. मला असे नेहमी वाटायचे की, कोणत्याही कुत्र्याने (ठीक आहे.... ठीक आहे पांचोने) माझ्यावर हल्ला केला, तर मी त्याचा सामना करेन आणि त्यामुळे माझ्या आईला माझा अभिमान वाटेल. तिने पण मला प्राण्यांबद्दल सावधगिरीचा सल्ला दिलेला होता आणि या एका दुर्मीळ प्रसंगी माझ्या आईवडिलांचे एकमत होऊन त्यांनी मला सांगितले होते की, काहीही कर, पण पळू नकोस!

पण मी पळालो. माझे सात वर्षे वयाचे लुकडे पाय जितक्या जोरात पळू शकले तितक्या जोरात मी आमच्या शेजारच्यांच्या घराच्या छोट्या

कंपाउंडच्या भिंतीकडे पळालो. मला अशी वेडी आशा होती की, ती भिंत जर मी ओलांडली तर पांचो थांबेल. पांचोच्या मालकांची 'पांचो थांब, पांचो परत ये' अशी चाललेली आरडाओरड मी ऐकली. म्हणजे ते शब्द ऐकण्याएवढा वेळ तरी नक्कीच मी त्याच्यापेक्षा जोरात पळालो असेन. पण ती कंपाउंडची भिंत खूप लांब असतानाच त्याने मला खाली पाडले होते....

बारा वर्षांनंतर, एका डिसेंबरच्या दिवशी मला त्या सिंहांसमोर अशीच पळून जायची ऊर्मी होत होती. पाहू यात, पूर्वानुभवातून तू काही शिकला आहेस का? हा एकच विचार माझ्या मनात त्या वेळी त्या सिंहांसमोर उभे असताना आला.

आता मला कबूल करायला शरम वाटते की, दुसरा पण एक विचार माझ्या मनात आला होता. बिअरच्या बाटल्या वाळूवर सांडून फुटल्या तर भरपूर बुडबुडे येऊन फेस तयार होईल. पण यांपैकी कोणता विचार जास्ती प्रबळ होता ते आता सांगता येत नाही. पण मी आहे त्या जागीच उभा राहिलो आणि सिंहांकडे बघून उलट डरकाळी फोडण्याचा माझ्यापरीने सर्वांत चांगला प्रयत्न केला.

ते सिंह थांबले. माझ्यापासून एका हाताच्या अंतरावर ते वाकून खाली बसले. काही क्षणांतच त्यांच्या शरीरातला ताण एकदम कमी झाला. त्यानंतर ते उठून मला वळसा मारून त्या कोरड्या नदीपात्रात पुढे निघून गेले, असे की, जणूकाही झालेच नव्हते.

मी बिअरचे खोके वाळूत ठेवले आणि त्यावरच बैठक मारली. काही क्षण मी शांतपणे पक्ष्यांचे कूजन ऐकत राहिलो. जी भीती मनाला जाणवण्याइतका आधी वेळच मिळाला नव्हता, ती भीती पूर्णपणे माझ्या आत येऊ दिली. पण त्या भीतीमागे माझ्या मनात अजून एक भावना डोकावत होती, ती म्हणजे अभिमान!

शिकवण

''तुला चालायला शिकलं पाहिजे,'' ख्रिस मला म्हणाला.

मी एकोणीस वर्षांचा होतो आणि दोन पायांवर गेली बरीच वर्षे सहजासहजी चालत होतो. त्यामुळे बाहेरच्या, अनोळखी व्यक्तीला ख्रिसचे हे वाक्य जरा बुचकळ्यात टाकणारे वाटले असते. पण आम्ही एका सफारी-कॅम्पवर होतो आणि ख्रिस ज्या चालण्याबद्दल बोलत होता, त्याचा संदर्भ झाडे, वाटा, कीटक आणि इतर छोट्या गोष्टींच्या सखोल ज्ञानाबद्दल होता. अशा काही गोष्टी ज्यांच्याकडे आपण गाडीतून सफारीसाठी फिरत असताना दुर्लक्ष करतो. मला नुकतीच गाइड बनण्याची संधी आली होती. त्यासाठीचे ज्ञान व कौशल्य शिकण्यासाठी मी प्रयत्नांची पराकाष्ठा करत होतो.

अशा चालायच्या सफारीमध्ये, आमच्या कॅम्पवर आलेल्या पर्यटकांना मी चालत जंगलात घेऊन जाणे अपेक्षित होते. एखाद्या वेळी अशी शक्यता असे की, आमचा सामना एखाद्या मोठ्या आणि धोकादायक प्राण्याबरोबर होईल. असा एखादा प्राणी की, ज्याच्यासमोर फक्त सफारीतल्या सुरक्षित गाडीत बसून जावे असे आपल्याला वाटते. अशा प्रसंगी माझ्यात न पळता, शांत राहून प्रसंगाला सामोरे जाण्याची कुवत असणे महत्त्वाचे होते.

जर एखादा प्राणी खरोखरच माझ्या अंगावर धावून आला, तर जे प्रसंगावधान लागते ते माझ्याकडे असणे अत्यंत आवश्यक होते. आमच्या सफारीच्या भाषेत बोलायचे झाले तर, जर कोणी तुमच्यावर पूर्ण ताकदीनिशी आणि बहुधा तुम्हाला खाण्याच्या इच्छेने धावून आला, तरी तुम्ही तुमच्या स्थानी अढळ उभे राहाल अशी कुवत. शिवाय आफ्रिकेतल्या प्राण्यांसमोर पळून जायचा प्रयत्न करणे तसे व्यर्थच असते. कारण माणूस अत्यंत हास्यास्पदरीत्या संथ धावतो. स्थूल असणारा पाणघोडा किंवा आश्चर्यकारकरित्या धावणारा वॉर्टहॉगसुद्धा माणसापेक्षा अधिक वेगाने धावतात.

मला शिक्षण देणाऱ्या गाइडपैकी इयान एक विनोद सांगत असे.

‘‘दोन मित्र एका जंगलात चालत असताना एका सिंहासमोर येतात. त्यांना बघताच तो सिंह त्यांच्या दिशेने दबा धरू लागतो. त्याबरोबर त्यातला एक मित्र आपल्या पिशवीतून पळण्याचे बूट काढतो. आणि बूट घालून, बुटाची नाडी बांधू लागतो. त्यावर दुसरा मित्र त्याला म्हणतो – ‘हे तू काय करतो आहेस? तू तर सिंहापेक्षा जोरात पळू शकत नाहीस!’’’

‘‘मला त्याची गरजच नाही,’’ पहिला उत्तरतो. ‘‘मला फक्त तुझ्यापेक्षा जोरात पळायचे आहे!’’

या विनोदाला नेहमीच दाद मिळायची. त्यामुळे येणाऱ्या प्रवाशांच्या प्रत्येक गटाला हा विनोद सांगितला जायचा. मी माझ्या पायाने चालत प्रत्यक्ष सिंहाच्या जवळ जायच्या आधी, पुष्कळ वेळेला हा विनोद ऐकला होता. त्यामुळे ख्रिस एकदा रायफल हातात घेऊन कॅम्पच्या कार्यालयात आला तेव्हा त्या विनोदाचीच गोष्ट माझ्या मनात आली.

‘‘आपल्या कॅम्पसमोर सिंह आले आहेत,’’ तो मला म्हणाला. ‘‘तो रावेन्सकोर्ट कळप आहे. ते कधीकधी जरा जास्तीच आक्रमक असतात.’’ हे ख्रिसचे वाक्य म्हणजे त्या कळपाचा लौकिक कमी करणारेच होते असे म्हणावे लागेल. कारण नुकत्याच घडलेल्या एका नरभक्षणाच्या घटनेचा सर्वांत जास्त संशय खरे म्हणजे याच कळपावर होता.

ख्रिस पुढे म्हणाला, ‘‘आणि मी बरेच दिवस कोणा प्राण्याशी आमनेसामनेही केलेले नाहीये. जरा पाहू यात तरी की, माझ्यात ते धैर्य अजून शिल्लक आहे का?’’

मला खातरी नव्हती की, माझ्या सिंहाबरोबरच्या एकमेव अनुभवाची मोजदाद करावी का नाही. कारण मला वाटत होते की, गेल्या वेळेला मी पळून न जाता सिंहांसमोर उभा ठाकलो ते आत्मविश्वासामुळे नसून भीतीमुळे होते.

‘‘मलापण यायचे आहे,’’ मी ख्रिसला म्हणालो. ‘‘मला बघायचे आहे की, स्वत:हून सिंहाचा सामना करण्याचे धैर्य माझ्यात थोडेतरी आहे का नाही?’’

नंतर मी ख्रिसच्या जरा सुटलेल्या पोटाला चिमटा काढून त्याला म्हणालो, ‘‘आणि तसेही मी तुझ्यापेक्षा जोरात पळू शकतो!’’

ख्रिसने लगेच काहीच उत्तर दिले नाही. रायफलमध्ये गोळ्या भरण्याचे काम त्याने चालूच ठेवले. काही क्षणांनी माझ्याकडे वळून तो मला म्हणाला,

“तू म्हणतोस ते इतर वेळी खरे असेल; पण तुझ्या पायात रायफलची गोळी लागेल तेव्हा मात्र नाही!”

मी त्याच्याकडे जरा वेळ रोखून बघितले की, तो माझी चेष्टा तर करत नाही ना? पण त्याने त्याच्या चेहेऱ्यावरचे ते गांभीर्य तसेच ठेवले. शेवटी एक-दीड तास त्या सिंहांचा माग काढून आम्ही तो नाद सोडून दिला तेव्हा मी सुटकेचा निश्वास टाकला. मला ‘सफारीचा गाइड बनण्याचे कौशल्य माझ्यात आहे का?’ हे बघण्यासाठी इतर कोणत्यातरी दिवसाची वाट पाहावी लागणार होती.

३री आवृत्ती

जनावनातली रेखाटने

लेखक
व्यंकटेश माडगूळकर

किंमत - १४०/-रु.
पोस्टेज -३०/-रु.



मी रेषांकडे केव्हा, कसा वळलो? आज आठवतं ते इतकंच की, लहान वयातच वळलो. शब्दांकडे वळण्याआधी रेषांकडे वळलो.
घरात कोणी चित्रकार नव्हते. कोणामुळे हा नाद लागला? काही सांगता येत नाही.
आठवणी उकरू लागल्यावर ध्यानात येतं की, ही आवड निर्माण व्हायला माझी आई थोडीफार कारणीभूत झालेली आहे. रांगोळ्या, गव्हा-तांदळांनी भरलेले चौक, रंगविलेले संक्रांतीचे घट. हिरवी पाने, नारळ, सुपाऱ्या, खणांच्या घड्या, काचेच्या बांगड्या, बुक्का, गुलाल, हळद-कुंकू, चैत्रगौरी, त्यांच्यापुढची आरास, सारवलेल्या अंगणात रेखलेली गौरीची पावले....
आकृती, रंग, रेषा यांची किती विविध आणि सुंदर रूपं मला बघायला मिळायची! मला आज वाटतं, चित्रकलेचं माझं शिक्षण इथून सुरू झालं.

डॉ. वसंत गोवारीकर

अवकाश तंत्रज्ञान क्षेत्रातील देशाच्या यशाचे एक शिल्पकार, देशाच्या विज्ञान धोरणाला आकार देणारे सल्लागार, मान्सून मॉडेलचे शिल्पकार शेवटपर्यंत विविध प्रकल्पांत कार्यरत असलेले शास्त्रज्ञ आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. वसंत गोवारीकर (वय ८१) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले.

डॉ वसंत रणछोड गोवारीकर यांचा जन्म २५ मार्च १९३३ रोजी पुण्यात झाला. माध्यमिक शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी राजाराम महाविद्यालयातून पदवी घेऊन पुढे ॲप्लाइड आणि प्युअर मॅथेमॅटिक्स घेऊन एम.एस्सी. केले. ब्रिटनमधील बर्मिंगहॅम येथे गेल्यानंतर त्यांना केमिकल इंजिनिअरिंगची आवड निर्माण झाली. तेथेच त्यांनी पीएच.डी. पूर्ण केली. समर फिल्ड रिसर्च सेंटरमध्ये काम करीत असताना त्यांना अंतराळ संशोधन आणि अग्निबाण यासंबंधी आवड निर्माण झाली. प्रॉपेलन्ट अँड रॉकेट टेक्नॉलॉजी, हीट अँड मास ट्रान्स्फर हे त्यांचे विषय होते. या विषयांत डी.एस्सी. (ऑनरिस कॉजा) पदवी संपादन केली. अंतराळ संशोधन क्षेत्रात भारताला जगात जे स्थान मिळाले आहे, त्यामागे डॉ. होमी भाभा, डॉ. विक्रम साराभाई यांच्या बरोबरीने डॉ. वसंत गोवारीकर यांचा मोलाचा वाटा आहे. भारतातील श्रीहरिकोटा, बंगळूर, थुंबा अशा विविध ठिकाणी त्यांनी काम केले. विक्रम साराभाई अंतराळ संशोधन केंद्राचे ते संचालक होते. इंडियन ॲकॅडमी ऑफ सायन्सेसचे ते सदस्य होते. त्यांनी हवामानाच्या अंदाजाची यंत्रणा तयार करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. 'पद्मश्री' आणि 'पद्मभूषण' किताब देऊन त्यांचा गौरव केला गेला.

आर. के. लक्ष्मण

ख्यातनाम व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण यांचे पुणे येथे वयाच्या ९४ व्या वर्षी दीर्घ आजाराने निधन झाले. कॉमन मॅन या लोकप्रिय व्यंगचित्रामुळे त्यांची देशभरात ओळख निर्माण झाली होती. त्यांनी लिहिलेले टनेल ऑफ टाइम हे आत्मचरित्र मराठीत लक्ष्मण रेखा म्हणून प्रसिद्ध आहे.

आर. के. म्हणजेच रासिपुरम कृष्णस्वामी लक्ष्मण यांचा जन्म २४ ऑक्टोबर १९२४ रोजी म्हैसूर येथे एका सुशिक्षित आणि समृद्ध कुटुंबात झाला होता. मोठे बंधू प्रसिद्ध लेखक आर. के. नारायणन यांनी लक्ष्मण यांच्यातील व्यंगचित्रकारितेला प्रोत्साहन दिले. विशेष म्हणजे मुंबईतील जे. जे. कला महाविद्यालयात लक्ष्मण यांना प्रवेश नाकारण्यात आला होता. पुढे त्यांनी अनेक मोठ्या वर्तमानपत्रांमधून व्यंगचित्रे रेखाटून वाचकांची मने जिंकली. लक्ष्मण यांना पद्मविभूषण, पद्मभूषण, रेमन मॅगसेसे यासह अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले. आर. के. नारायण यांच्या मालगुडी डेज पुस्तकासाठीही लक्ष्मण यांनी व्यंगचित्रे रेखाटली. द सर्व्हंट्स ऑफ इंडिया, हॉटेल रिवेरा, द मेसेंजर, द एलोक्युअंट ब्रश ही लक्ष्मण यांची पुस्तके लोकप्रिय आहेत.

डॉ. म. द. हातकणंगलेकर

ज्येष्ठ समीक्षक व साहित्यिक मधुकर हातकणंगलेकर यांचे वयाच्या ८८ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. ८१ व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषवणाऱ्या हातकणंगलेकर यांनी मराठी आणि इंग्रजी भाषेत १५ हून अधिक पुस्तकांचे लेखन केले होते. समीक्षक म्हणजे टीकाकार हा प्रचलित समज मोडून हातकणंगलेकर यांनी नवनवीन साहित्याचे नेहमीच स्वागत केले. १ फेब्रुवारी १९२७ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले येथे जन्म झालेल्या हातकणंगलेकर यांनी सांगलीतील विलिंग्डन

महाविद्यालयात अध्यापनाचे काम केले. २००८ साली सांगली येथे झालेल्या ८१ व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषवले होते. हातकणंगलेकर यांची अधोरेखिते, साहित्याचे सोबती, मराठी कथारूप, परिसर, साहित्यविवेक ही पुस्तके विशेष गाजली.

सरिता पदकी

मराठीतील एक प्रतिभाशाली लेखिका, प्रसिद्ध कवयित्री सरिता पदकी (वय ८५) यांचे अमेरिकेत निधन झाले. नाटक, कथा, काव्य, अनुवाद, बालवाङ्मय असे विविध साहित्यप्रकार हाताळून सरिताबाईंनी साहित्यक्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली. लहान मुलांविषयीच्या त्यांच्या लेखनाचा प्रकृतिधर्म वेगळा होता. गद्यलेखनही तितकेच लयबद्ध होते. त्यामुळे त्यांना राज्य व केंद्र सरकारचा सात वेळा पुरस्कार मिळाला.

निवडक साहित्य संपदा.

बालसाहित्य : अक्कल घ्या अक्कल, करंगळ्या, गुटरगु गुटरगु, छोटू हत्तीची गोष्ट, जंमत टपू टिल्लूची, नाच पोरी नाच, हसवणारे अत्तर आदी नाटके : खून पहावा करून, बाधा, सीता आदी. कथा-ललित : घुम्मट, बारा रामाचे देऊळ, अंगणात माझ्या. काव्य : चैत्रपुष्प, ललनगंधार आदी. अनुवाद : काळोखाची लेक, गांधीजींच्या जीवनातील अखेरचे पर्व, पांथस्थ

नंद चतुर्वेदी

प्रसिद्ध हिंदी कवी व साहित्यिक नंद चतुर्वेदी यांचे वयाच्या ९१ व्या वर्षी उदयपूर येथे निधन झाले. त्यांचा जन्म झालवार येथे १९२३ मध्ये झाला, 'यह समय मामुली नही,' 'इनामदार' 'दुनिया के लिये ही' त्यांची पुस्तके प्रसिद्ध होती. के.के. बिर्ला फाऊंडेशनने त्यांना बिहारी पुरस्कार देऊन सन्मानित केले होते. साहित्य वाचस्पती पुरस्कार, मीरा पुरस्कार त्यांना मिळाले होते.

बी.जी. वर्गीस

मॅगसेसे पुरस्कार विजेते ख्यातनाम पत्रकार, हिंदुस्तान टाईम्स व इंडियन एक्सप्रेस या वृत्तपत्रांचे माजी संपादक बी. जी. वर्गीस (वय ८७) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी जमिला व मुलगे

विजय व राहुल आहेत. १९६९ ते १९७५ या काळात ते हिंदुस्तान टाईम्सचे व १९८२ ते १९८६ या काळात द इंडियन एक्सप्रेसचे संपादक होते. ते इंदिरा गांधी यांचे १९६६ ते १९६९ दरम्यान माहिती सल्लागार होते.

पं. मोहन कर्वे



ज्येष्ठ गायक पं. मोहन कर्वे (वय ८९) यांचे निधन झाले. लहानपणी 'भक्त प्रल्हाद' या बोलपटात त्यांनी केलेली प्रल्हादाची भूमिका प्रचंड गाजली होती. गांधर्व महाविद्यालयात त्यांनी गायनाचे शिक्षण घेतले. नवीन मराठी शाळेत दुसरीत असताना त्यांना 'भक्त प्रल्हाद' चित्रपटात काम मिळाले. त्यानंतर 'भक्त चेता' चित्रपटातही अभिनयाची संधी मिळाली.

बेबी शकुंतला

बालतारका ते अभिनेत्री असा प्रवास करणाऱ्या पहिल्या अभिनेत्री बेबी शकुंतला म्हणजेच उमादेवी खंडेराव नाडगौडा, वय ८३ यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांनी सुमारे बारा वर्षांच्या आपल्या चित्रपट कारकिर्दीत ६० मराठी व हिंदी चित्रपटांमध्ये काम केले. विवाहानंतर त्यांनी अभिनयातून संन्यास घेतला. १७ नोव्हेंबर १९३२ रोजी त्यांचा पुणे येथे जन्म झाला.

मिलिंद संगोराम

प्रसिद्ध चार्टर्ड अकाउटंट व लेखक मिलिंद संगोराम (वय ४७) यांचे अल्प आजाराने निधन झाले. संगोराम यांनी अनेक संस्था व बहुराष्ट्रीय कंपन्यांचे ऑडिटर व प्राप्तिकर सल्लागार म्हणून काम केले आहे. त्यांनी अनेक नियतकालिकांमधून नियमितपणे लेखन केले. बखर भारतीय प्राप्तिकराची, इन्कम टॅक्सविषयी सारे काही, अशी करा गुंतवणूक, असा वाचवा प्राप्तिकर अशी अनेक पुस्तके त्यांनी लिहिली.

आमची मंदाताई

आमची मंदाताई आमच्यातून २३ नोव्हेंबरला निघून गेली. गेली १७-१८ वर्षे ती संधिवाताच्या विकाराने ग्रस्त होती. भाऊ १९७६ साली गेल्यानंतर 'नंदादीप' हे घरच आमचे हक्काचे घर होते-माहेर होते. नोकरीच्या वेगवेगळ्या ठिकाणांहून आम्ही सर्व बहिणी मुलांना घेऊन मंदाताईकडे एकत्र जमायचो.

आमची आई मी आठवीत असतानाच गेली. त्यामुळे माझ्या लग्नापर्यंत माझे सर्व मंदाताई व कल्पलता खरे या मोठ्या दोन बहिणींनी केले. मंदाताईला मी मुलीसारखी वाटायची व मलाही आईसारखा तिचा आधार वाटे.

बी.ए.ड. कॉलेज, महावीर कॉलेज, आंतरभारती येथे शिक्षणशास्त्र, आणि मराठीची प्राध्यापिका म्हणून ती कार्यरत होती. तिच्या हाताखालून शिकून गेलेले अनेक विद्यार्थी; कोणी ना कोणी तिला रोज भेटायचे, गप्पा व्हायच्या. त्यामुळे तिचा बाहेरच्या जगाशी तिचा संपर्क असायचा.

मंदाताईचा फोनवरचा आवाज ऐकून कुणाला ती आजारी आहे. असे वाटायचे नाही. एकदम स्पष्ट खणखणीत आवाज, मुद्देशीर बोलणे, समजावून सांगणे, स्मरणशक्ती जबरदस्त व इच्छाशक्ती प्रबळ. त्यामुळे पडून असूनही ती घर चालवत होती. भाऊंच्या पुस्तकांसंबधीचे सर्व व्यवहार बघत होती. जीवनाकडे पहावयाचा दृष्टिकोन सकारात्मक होता त्यामुळे फोनने ती सर्वांच्या संपर्कात असायची. आजारावर मात करून जगायला ती शिकली होती. सर्वात म्हणजे अडीअडचणीला कुणालाही मदत करावयाची इच्छा व सामर्थ्य तिच्यात होते. सर्वांना तिने भरभरून प्रेम दिले.

आता फक्त आठवणीच !

- सौ. सुप्रिया पेंढारकर

‘‘शशिकांत, गार वार सुटलंय, जरा उठून खिडकी बंद करता?’’ आवाज ओळखीचा, आवर्जून केलेला. रात्रीचे सुमारे २।। वाजले होते. खिडकी बंद करण्यासाठी उठलो. पाहिले तर खिडक्या बंदच होत्या. वाऱ्याची झुळूक दरवाजातून येत होती. कॉटकडे पाहिले, कॉट रिकामी होती. मंदाताईना जाऊन दोन दिवस झाले होते. घराच्या संरक्षणासाठी मी मंदाताईंच्या ‘नंदादीप’ बंगल्यावर होतो. मन खिन्न झाले.

आठवणी उभारून आल्या.

ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात आम्ही मंदाताईंचा निरोप घेऊन कोल्हापूरहून अंबरनाथला आलो. येताना नाताळच्या सुट्टीत परत येण्याचा बेतही सांगितला होता. गेली तीन वर्षे दिवाळीत आम्ही सर्व एकत्र येऊन दिवाळी आनंदात साजरी करत असू. त्यांच्या वाढदिवसाला म्हणजेच दिव्याच्या अमावस्येलाही एकत्र येत असू. त्या दिवशी देवळात जाऊन महालक्ष्मीची पूजा करत असे. तिकडून आणलेला प्रसाद त्या स्वत: संध्याकाळी येणाऱ्या मित्र मैत्रिणींनाही वाटत असत. वाढदिवसाचे औक्षण झाले की त्यांना आवडणारे पदार्थ केलेले किंवा आणलेले असायचे त्याचा आस्वाद सर्व मिळून घेत असू. माणसं अवतीभवती असली की त्या आनंदी असायच्या. माझ्या तिथल्या वास्तव्यात सकाळी व रात्री विविध विषयांवर गप्पा होत. मंदाताई घराबाहेर पडत नसल्या तरी त्यांना कोल्हापूरच्या पंचक्रोशीतील व बाहेरील जगाची माहिती असावयाची. बोलता बोलता त्यांचे डोळे बंद व्हायला लागायचे व त्यांना गाढ झोप लागायची. त्या नेहमी म्हणायच्या, शशिकांत व मंगल तुम्ही असलात की मला छान झोप लागते.’

आम्ही कोल्हापूरला येणार असे कळले की त्या आमच्या स्वागताच्या तयारीला लागायच्या. आवडणारे पदार्थ, घरातील लागणारे सामान त्या गंधाली भागवत यांच्याकडून आणवून ठेवत, त्या वस्तू कुठे कशा ठेवल्यात, किती आहेत. सर्व सांगत. देवीच्या देवळात जातो म्हटले की ‘‘माझीही ओटी भरून या हो’’ असा त्यांचा आदेश असावयाचा.

मंदाताई २३ नोव्हेंबरला गेल्या. त्यांचे अंत्यदर्शन आम्हाला घडले नाही. त्या नेहमी म्हणायच्या ‘‘तुम्ही इथे असताना मला काही होणार नाही.’’ नेमकं तसंच झाल. त्यांनी आपला शब्द पाळला.

- कर्नल श्री. ना. पेंढारकर

नवी दिशा



"काय बंडोबा, आवडलं का घर?"

"हो ऽऽ! खू ऽऽप! मस्त आहे अगदी." मोठ्या आनंदानं उड्या मारत बंडोबा म्हणाले.

अर्थात हे बंडोबा म्हणजे एखादा शाळकरी मुलगा असणार हे तुम्ही ओळखलं असेलच. आणि बंडोबा हे त्याचं खरं नाव नाही हेसुद्धा सांगायला नकोच. त्याचं खरं नाव केतन. केतनचे आईबाबा नवीन जागा बघत होते. ते राह्यचे भाड्याच्या घरात. ते घर तसं लहानच होतं. आता ते मोठी, स्वतःची जागा घेणार होते. अर्थात सदनिका ऊर्फ फ्लॅट.

मग घर कुठे हवं, कसं हवं याची रोज चर्चाच सुरू झाली. आईला अगदी तळमजला नको होता तर आजीला जिन्याचा त्रास नको होता. केतनला खेळायला छानसं अंगण हवं होतं; तर बाबांना शक्यतो काकाच्या घराजवळ जागा हवी होती. आईबाबांनी घरं बघायला सुरुवात केली. त्यांनी जाहिरातच दिली होती. शिवाय मित्रांना, नातेवाईकांनाही सांगून ठेवलं होतं. त्यामुळे बऱ्याच घरांची माहिती मिळत होती. मग काय, जागा बघायला जाणे हा एक उद्योगच सुरू झाला. पण कुठे पाण्याचा त्रास तर कुठे

लगत झोपडपट्टी. एखादी खूप लांब तर एखादी चौथ्या मजल्यावर.

अशा तऱ्हेने एक के बाद एक करत सगळ्या जागा बाद होत होत्या. केतन हिरमुसला होत होता. त्याला केवढी हौस वाटत होती नव्या घराची! त्याला मित्रांना पार्टी द्यायची होती- वक्तृत्व स्पर्धेत बक्षीस मिळालं होतं त्याला. पाठोपाठ विज्ञान निबंध स्पर्धेतही पहिला क्रमांक मिळाला होता. मग आता छानशी पार्टी नव्या घरातच करू, जास्त मजा येईल. सगळे मित्र अगदी खुश होतील... असे बेत केतन करत होता. पण कसचं काय!

आता नवा फ्लॅट घ्यायचा म्हणजे तसा वेळ लागणारच एवढं त्याला कळत होतं. दुकानात जाऊन टीव्ही किंवा फ्रीज आणण्याइतकं ते सोपं नाही. तरी पण... इतके दिवस? पुढच्या वर्षी केतनची दहावी. पण दहावीच्या अभ्यासाला घरात त्याला धड जागाही नव्हती. बरेचदा तो मित्रांकडेच अभ्यासाला जायचा. आता मोठी जागा घेतली म्हणजे आपल्या घरीही मित्रांना बोलावता येईल- पण जागेचं जमणार तरी कधी?

असेच दिवस चालले होते अन् अचानक एका छान जागेची माहिती समजली. हा फ्लॅट सगळ्यांनाच पसंत पडला. त्या बाबतची बोलणी, चौकशा, फोनाफोनी सुरू झाली, अन् अशातच एके दिवशी अचानक बनूमावशी उगवल्या. बनूमावशी म्हणजे आजीची दूरची बहीण. चुलतआते की मावसमामे बहीण. त्यांच्या कानावर ही बातमी पडली मात्र, बनूमावशींनी एकदम कपाळालाच हात लावला.

''अगोबाई! कुठलं घर शोधलंय हे? अग, भुताटकीची विहीर बुजवून त्याच जमिनीवर घर बांधलंय ते. मला माहीत आहे. आमच्या शेजारच्या वेणूताईंची मुलगीच राहात होती ना तिथं-'' बनूमावशी सांगू लागल्या.

''बरं, मग?'' आजीनं विचारलं.

''मग काय? तिला त्या घरात काय अन् किती त्रास झाला म्हणून सांगू! आधी एकेकाची दुखणी, मुलगा नापास झाला, नवऱ्याला अपघात, एक की दोन! शेवटी त्यांनी ती जागा एजंटाला विकून टाकली. माझं ऐका. ती अपशकुनी जागा आहे. तुम्ही घेऊ नका!'' बनूमावशींनी सल्ला दिला. ''अगं मावशी, तेव्हा फ्ल्यूची साथच होती. आजारपणामुळे मुलाचा अभ्यास झाला नाही म्हणून तो नापास झाला. तोही चाचणी परीक्षेत. अन् त्याच्या वडलांना अपघात झाला ना, तो अगदी म्हणजे अगदी किरकोळ होता. मी सगळी माहिती काढलीय.'' बाबांनी बनूमावशीला खरं काय ते सांगितलं.

पण बनूमावशीच्या बोलण्याची आजीनं इतकी काही धास्ती घेतली की बस! ती मुळी काही ऐकायलाच तयार होईना. म्हणाली, ''कशाला विषाची परीक्षा पाहा?'' आणि मग, केवळ आजीच्या इच्छेखातर, त्या फ्लॅटचा विचार बाबांनी सोडून दिला.

शाळेतून आल्यावर केतनला हे सगळं कळलं. ऐकून तो थक्कच झाला. आजच्या काळात माणसं भुता-खेतांवर विश्वास ठेवतात तरी कशी? मावशीचं किंवा आजीचं सोडून द्या. पण बाबांनीसुद्धा आजीच्या हो ला हो करायचं? छे. काहीतरीच. बाबांनी खरं तर आजीला नीट समजावून सांगायला पाहिजे. अन् असं करत बसलं तर घराचं कधी जमायचं? कसं जमायचं?

पण लौकरच तो योग आला. सुंदर जागा. गावापासून फार लांब नाही, किंमतही वाजवी. थोडी वापरलेली होती, सहा सात वर्षं. म्हणजे तशी नवीच म्हणायची! सोयी खूप छान होत्या. त्या घराला एकच जिना, दोन बाल्कन्या अन् एक गच्चीसुद्धा होती. पश्चिमेला मोठीच्या मोठी खिडकी. केतन जाम खुश झाला. ''काय बंडोबा, आवडली का जागा?'' असं आईनं विचारलं तेव्हा, ''हो ऽऽ! खू ऽऽप!'' असं म्हणत तो आनंदानं उड्याच मारू लागला.



आता हे जमण्यात काही अडचण येणार नाही असं सगळ्यांना वाटत होतं. मग पक्कं करण्यापूर्वी सगळ्यांना घर दाखवायचं ठरलं. आई, बाबा, आजी, केतन, काका, काकू, झालंच तर काकूची चिंगुली.

अन् सल्लागार म्हणून बाबांचे इंजिनीअर मित्र शरदकाका. सगळा लवाजमा निघाला. घर काका-काकूला एकदम पसंत पडलं. घराचं

बांधकाम उत्तम आहे. माल चांगला वापरलाय असा शरदकाकांनी निर्वाळा दिला. इतकंच काय, इतका चांगला फ्लॅट सहजी मिळणार नाही, ही संधी हातची सोडू नकोस असाही सल्ला दिला. आता काहीच अडचण नव्हती.

पण, पण मध्येच आजीला काही तरी शंका आली. ती बाबांना म्हणाली-

''अरे, ही दक्षिण तर नाही ना?''

''का? काय झालं?'' बाबांनी विचारलं.

''अरे, घराचं तोंड चक्क दक्षिणेला आहे! शिवाय दारात विजेचा खांब.'' आजी.

''अगं, मग बरंच झालं! रात्री येता जाता छान उजेड मिळेल अनायासे.'' बाबा हसत हसत म्हणाले.

''अरे, दारात विजेचा खांब नसावा असं शास्त्र आहे.'' आजीच्या बोलण्यावर बाबा एकदम गंभीर झाले. काका काकू नुसतेच बघत उभे राहिले. केतन क्षणभर घुटमळला पण मग म्हणाला, ''आजी, हे मात्र काही तरीच तुझं शास्त्र हं! कसल्यातरी शंका. अगं, वीज अन् विजेचे खांब पूर्वी होते तरी का? कुणी काढले हे नियम?'' तो तावातावानं बोलला. ''पण घराचं तोंड दक्षिणेला नसावं. दक्षिण दिशा तरी पृथ्वीच्या जन्मापासून आहे ना?'' आजीचा प्रतिप्रश्न.

''आजी, या गोष्टींना आपण आता किती महत्त्व द्यायचं? जगात हजारो घरं दक्षिणेकडे तोंड करून असतात. जगातलं सोड, अगदी आपल्या भारतातसुद्धा अशी किती तरी घरं असतील!'' केतन आजीची समजूत घालू लागला. अन् त्याच्या धिटाईमुळे बाबा, काका अन् शरदकाकाही चकित झाले. तेही आजीला म्हणू लागले, शहरात एवढी निवड करायला वाव तरी असतो का? उजेड आणि शुद्ध हवा मिळवणं हे अधिक महत्त्वाचं नाही का? वगैरे वगैरे.

आजी सगळं ऐकत होती, पण हो काही म्हणत नव्हती! अन् इकडे बाबांची नुसती चलबिचल. आजीचं बोलणं मनाला, बुद्धीला पटत नव्हतं. पण आईला नाराज तरी कसं करायचं? मागच्या वेळी असंच झालं होतं. अन् आजीला वाटत होतं, वास्तू सुलक्षणी असावी, नाही तर तिथं राहणाऱ्याला त्रास होतो. ते घर वर येत नाही. मग कशाला घ्यायचं ते?

आता दोघी सुना पुढे सरसावल्या. केतनची आई म्हणाली,

‘‘सासूबाई, तुम्हाला माहीत आहे का? अहो, पहिल्या मालकाचं इथं सगळं चांगलं झालं. त्यांची मुलगी डॉक्टर झाली. मुलगा इंजिनीअर झाला.’’

‘‘ते सगळे, त्यांची पोरंबाळं अगदी सुखात, आनंदात आहेत.’’ काकूनं पुस्ती जोडली.

‘‘त्यांनी आता बंगला बांधलाय ना, म्हणून त्यांना हा फ्लॅट विकायचाय.’’ बाबांनी खुलासा केला.

सगळं ऐकून आजी थक्कच झाली! चष्म्याआड तिचे डोळे लुकलुकले. हनुवटीवर बोट ठेवत ती म्हणाली, ‘‘अगबाई! खरं की काय?’’ ती आता विचारातच पडली. तेवढ्यात केतननं अगदी लाडात येऊन विचारलं,

‘‘आजी, मग घ्यायचं ना हे घर?’’

‘‘अंऽ, म्हणजे, पहिल्या मालकाचं जर इतकं सगळं चांगलं झालं असेल तर हरकत नाही! आपणही घेऊ या!’’ आजी म्हणाली.

‘‘पण, ते दक्षिणेला तोंड...’’ केतननं वाक्य अर्धंच सोडलं.

‘‘त्याला काय झालं? चालेल!’’ आजी हसत उत्तरली.

‘‘आजी! माझी छान छान आजी!’’ केतननं आजीला मिठीच मारली.

आजीच्या शंका-कुशंका फिटल्या होत्या. तिला एक नवीच दिशा दिसली होती. पण त्यासाठी आपल्या केतन-बाबूनंच प्रथम प्रयत्नाला सुरुवात केली होती!

आणि बाबांनी निःशंकपणे ते घर घ्यायचा निर्णय पक्का केला.



ऑनलाइन वाचकांसाठी सुवर्णसंधी

मेहता मराठी ग्रंथजगत

Digital Edition

DIGITAL EDITION

'मेहता मराठी ग्रंथजगत'चा अंक
आता डिजीटल स्वरूपात

- इलेक्ट्रॉनिक स्वरूपात असल्यामुळे हवा तिथे पाहू शकता.
- तुमच्या मोबाईलवरही वाचू शकता.
- वाचण्यासाठी मेहता पब्लिशिंग हाऊस ॲप मार्केटमध्ये मोफत उपलब्ध.

आमच्या पुस्तकांवर वर्गणीदारांसाठी सवलत	तीन वर्षांना	पाच वर्षांना
	२५%	३०%

वर्गणी	३ वर्षांची वर्गणी	५ वर्षांची वर्गणी
	₹३००	₹४००

वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टद्वारा खालील पत्त्यावर पाठवावी.

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.

मेहता मराठी ग्रंथजगत, द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४

RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:PCW/086/2015-2017/ Posted at Marketyard Pso, Pune
Publishing Date : 11 February. 2015 Posting Date : 11 February. 2015

आमची वाचनीय पुस्तके





BOOK POST
Printed Matter

मेहता मराठी ग्रंथजगत
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.